


रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, ५ नोव्हेंबर २०२३


# सरकारची शिष्टाई: विरोधकांची दांडगाई!

महाराष्ट्रात मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी १९८० पासून आंदोलन सुरु होते. पण काँग्रेस व राष्ट्रवादी सरकारने मराठा समाज्याच्या प्रश्नाकडे कधीच गांभिर्याने पाहिलेले नाही. गल्ली ते राज्य ते दिल्लीपर्यंत समाजाचे गब्बर नेते आहेत! पण त्यांना समाजाच्या समस्या लक्ष दिले नाही. त्यामुळे मराठा समाजाच्या आरक्षणाचे आंदोलन करण्याची वेळ आली. महाराष्ट्रात सर्वाधिक काळ मराठा समाजाचे मुख्यमंत्री होते. ते मराठा आरक्षण देवू शकले नाहीत. राज्यात ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी ६० समाजाच्या मतावर राजकारण करत आले. त्यांनी समाजाला न्याय दिला काय. मराठा समाज शूर, संयमी आहे. शेती व्यवसायावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो! पण निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यावर अनेक संकट येत गेली. बँकेचे कर्ज घेवून शेती व्यवसाय करणे आर्थिकदृट्या न पडणारे झाले आहे. देशातील मराठा समाज खुल्यावर्गात मोडतो. त्यात आरक्षण पध्दतीमुळे शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरीत संधी मिळेत नव्हती. यात गुणवत्ता असूनही आरक्षणामुळे नोकरीत संधी मिळत नसल्याने तरुणात निराशा वाढत चालली होती. महाराष्ट्रात विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रात शेती व्यवसाय करणारा 'कुणबी ओबीसी म्हणून ओळखला जातो. तर १८७२ मध्ये ब्रिटिश सरकारच्या पहिल्या जनगणेत मराठा व कुणबी असा उल्लेख आहे,असे सांगितले जात आहे. राज्यातील सरसकट मराठा हा कुणबी नाही, असे, सांगितले जाते. महाराष्ट्र सरकारने १९६० पासून याबाबत सर्वेक्षण केले नाही. त्यामुळे राज्यातील ७० टक्के मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळत नव्हते, त्यात मराठा समाज हा मागसलेला नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने निकालात म्हंटलेले आहे. त्यामुळे राज्य सरकारसमोर मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत घटनात्मक आणि कायदेशीर अडचणी येत होत्या. आरक्षण हे अवघड जागेचे दुखणे' होवून बसले.




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


राज्यात २०१४ मध्ये भाजपाची सत्ता आली, त्यावेळी मराठा आरक्षण मागणीने जोर धरला. समाजाने राज्यात ५६ अतिशय शांततापूर्ण मोर्चे काढून समाजाची ताकद व एकजूट दाखविली. पण काही मराठा नेत्यांनी त्यावेळेस मुख्यमंत्री फडणवीस असल्याने त्यांना व कुटुंबाला लक्ष्य केले होते. यातून मराठा विरध्द ब्राह्मण वाद निर्माण केला गेला.यास राष्ट्रवादी नेते आघाडीवर होते. वास्तविक ब्राह्मण समाजाचा मराठा समाजाला विरोध केला नाही. त्यावेळेस मुख्यमंत्री फडणवीस यांनी संयम ढासळू दिला नाही. त्यांनी माजी न्यायमूर्ती एम.जी गायकवाड यांची राज्य मागासआयोगासाठी नियुक्ती केली. या आयोगाने राज्यात सर्वेक्षण करुन शासनाला अहवाल सादर केला. त्याआधारे फडणवीस सरकारने २०१७ मध्ये मराठा समाजाला १६ टक्के आरक्षणास मंजूरी दिली. यात राज्य सरकारने दिलेले आरक्षण उच्च न्यायालयाने मान्य केले होते. राज्यात मराठा समाजाला ३७ वर्षानंतर कायद्याच्या चौकटीत आरक्षण देणारे फडणवीस हे पहिले मुख्यमंत्री. पण मराठा समाजाच्या नेत्यांनी कधी अभिनंदन केले नाही! परंतु कायदेतज्ज्ञांनी फडणवीस मात्र त्यांचे कौतूक केले. फडणवीसांना श्रेय दिले तर समाज आपणाला 'तुम्ही काय केले, असे विचारेल?याची त्यांना भीती होती. त्यानंतर २०१९ मध्ये महाराष्ट्रातील जनतेने भाजपा व शिवनेच्या बाजूनेच कौल दिला, पण महाराष्ट्रात भाजपा व फडणवीस यांचे सरकार व मुख्यमंत्री नको! त्यातून ज्येष्ठ नेते शरद पवार व शिवसेना खासदर राऊत यांच्या मदतीने सत्तेची खेळी खेळली. उध्दव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदाचे डोहोळे लागले होते! हे दोन माहित होते. ते या नेत्यांनी ठाकरे यांना हेरले. त्यांनी ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली. ठाकरे यांनी जनाधाराचा अनादार करुन काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस संगत करत मुख्यमंत्री झाले! पण राज्याची सूत्रे पवारांच्या हाती होती! यात राष्ट्रवादी व शिसेनेच्या नेत्यांनी 'लूटगिरी' चालू होती. त्यात हे सरकार मग्न होते. त्यावेळी मराठा आरक्षण सर्वोच्च न्यायालयात गेले होते. या सरकार याची चिंता नव्हती. त्यामुळे महाविकास आघाडी सरकार न्यायालयात बाजू मांडण्यात कमी पडले. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण रद्द झाले. तरीही राज्यातील मराठा नेत्यांनी तोंड उघडले नाही. ते गप्प बसले होते.राज्यात शिंदे व फडणवीस या सरकार कामाचा सपाटा लावला होता. त्यात अजित पवार साथ मिळाली. ते शिंदे व फडणवीस सरकारमध्ये सहभागी झाले. राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना पक्ष कमजोर झालेला आहे. त्यात २०२४ मध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुकीत पवार व ठाकरे या नेत्यांना राजकीय भविष्य अंधारात होते? देशात पुन्हा मोदी व भाजपाची सत्तेत येईल, असे जाणकारांचे मत व्यक्त करत होते.तेंव्हा विरोधी पक्षाने मोदी व भाजपाच्या विकास प्रश्नाला छेद देण्यासाठी जातीय जनगणना आणि आरक्षणाचे षडयंत्र सुरु केले. या दरम्यान

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात आठवड्यापासून पेटलेले मराठा समाजाचे आंदोलन तूर्त मागे घेतले आहे. मनोज जरांगेंनी आरक्षण मिळाल्याशिवाय उपोषण सोडणार नाही, असा पण केला. त्यामुळे शिंदे सरकारसमोर पेच निर्माण झाला.पण शिंदे सरकारने 'ईगो' न करता कायदेतज्ज्ञांचे आणि मंत्र्यांचे शिष्टमंडळ जरांगे यांचेकडे पाठविले. या शाष्टमडळांनी घटनात्मक व कायदेशीर बाजू जरागेना समजावून सांगतली. तसेच कायदेतज्ज्ञांनी आरक्षण देण्याची घाई केली, तर ते टिकणार नाही,असे स्पष्टपणे सांगितले. तेव्हा 'सोनाराने कान टोचल्या'नंतर जरांगेच्या लक्षात आले. त्यांनी दीर्घ चर्चेनतर मुदत वाढ देत उपोषण मागे घेतले. ज्या मराठा नेत्यांनी समाजाला ३७ वर्षे अंधारात ठेवले! तेच नेते आगीत तेल टाकून आंदोलन भडकवत होते. कारण राज्यात शिंदे व फडणवीस सरकार विरोधी वातारण व्हावे, हे षडयंत्र रचत होते. पण आंदोलन स्थगित झाल्याने त्यांच्या मनसुब्यावर पाणी फिरले!**

राज्यात मराठा नेत्यांनी म्यानात ठेवलेले आंदोलनाचे शस्त्र बाहेर काढले. जालना जिह्यातील अंतरवाली सराटी येथे मनोज जरंगे पाटील यांचे नेतृत्व उदयास आले. त्यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी आमरण उपोषण सुरु केले. शिंदे व फडणवीस सरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्यास सकारात्मक आहे, असे म्हणत चाळीस दिवसाचे आश्वासन दिले. त्यामुळे जरांगे यांनी प्रथम उपोषण मागे घेतले. शिंदे सरकारने दिलेली मुदत संपत आली. तेव्हा दसऱ्या मेळाव्यात मुख्यमत्री शिंदे हे भाऊक झाले! मी पण मराठा आहे, त्यांनी आरक्षणासाठी छ. शिवरायांची शपथ घेतली. तसेच त्यांनी शरिरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मराठा आरक्षणासाठी प्रयत्न करेन, असे वचन सभेत दिले. पण जरांगे यांनी शिदे यांचे शपथेला किंमत दिली नाही, त्यांनी सभेत एकतर 'आरक्षणाची विजयी यात्रा निघेल, नाही तर' माझी अंतयात्रा निघेल'असे म्हणत पुन्हा आमरण उपोषणाला सुरु केली. दिवसें-दिवस यांची प्रकृती खालवत होती.तेंव्हा जिल्हा प्रशासन व पोलिस अधिकाऱ्यांनी जरांगे यांना वैद्यकीय उपचार घेण्याचा विनती करत होते! पण ते ऐकत नव्हते,त्यावरुन संघर्ष सुरु झाला. तेथे उपस्थित लोकांनी पोलिसांवर दगडफेक केली, यातून पोलिसांनी लाठीमार केला. त्यामुळे मराठा समाजात संताप अनावर झाला, याच वेळी शरद पवारांनी पोलिसांना लाठीमाराचे आदेश मंत्र्यांनी दिले, अशी पुडी सोडली! त्यांनीच शिंदे व फडणवीस सरकारच्या विरोधात समाजाच्या भावना भडविल्या. पण कायद्यानुसार कायदा व सुव्यवस्था हताळताना पोलिसांनी बळाचा वापर म्हणून लाठीमार व गोळीबार वापर करण्याचे अधिकार आहेत. त्यासाठी राज्य सरकारच्या परवानगी घेण्याची गरज नसते! हे पवारांना माहित आहे. मग गोवारी समाजावर लाठीमार व मावळचा गोळीबार झाला, तेव्हा मंत्र्यांनी आदेश दिले होते काय? पोलिसांनी बळाचा चुकीचा वापर केला, हे चौकशीत निष्पन्न झाल्यानंतरही, पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाते. मुंबईच्या रमाताई आंबडेकरनगर प्रकरणावरुन जो गोळीबार केला गेला.त्यात पोलिस अधिकाऱ्यावर कारवाई झाल्याचे उदाहरण आहे. विरोधी पक्षांनी मराठा समाजाची सहानुभूती मिळावी, म्हणून लाठीमाराचे राजकारण सुरु केले! त्यावेळी गृहमंत्री फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी केली. तेव्हा मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस व दादा एकत्रित आले, तेंव्हा दादांनी या लाठीमाराबाबत कोणी मंत्र्यानी आदेश दिल्याने सिध्द करुन दाखवावे, आपण राजकारण सोडून देऊ, असे शरद पवारांना आव्हान दिले. त्यानंतर पवारांनी यावर तोंड उघडले नाही. लाठीमाराच्या प्रकरणाचे चौकशीचे आदेश दिल्यानंतर राज्याचे गृहमंत्री फडणवीस यांनी माफी मागितली. त्यांच्या या उदारवृत्तीमुळे पोलिसदलाचे मनोधर्ये खच्चून जाईल, हे लक्षात कसे काय आले नाही. यात पोलिस लाठीमाराचे समर्थन होत नाही, पण चौकशीनंतर पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करता येते. यात राज्य सरकारने घाईने केली. त्यामुळेच शिंदे सरकार हे मराठा आंदोलनावर दडपशाही करत आहे! असा संदेश राज्यभर पसरला गेला. यात शिंदे सरकारचा अतिशहाणपणा अडचणीचा ठरला! जरांगे यांचे नेतृत्वाखाली मराठा समाज एकवटा व आंतरवाली सराटी येथे त्यांचे सभेला मराठा समाज मोठ्या संख्येने जमला होता. तेव्हा मराठा नेत्यांचे चेहरे पडले! हा समाज आपल्या हातातून जात आहे. हे राजकीय नेत्यांचे लक्षात आले! जरांगे प्रारंभी आंदोलनात राजकीय नेत्यांना पाऊल टाकू दिले नाही. नंतर विरोधी पक्ष नेते जरांजना भेटून पाठिंबा देत होते. जरांगे भेटीसाठी नेत्यांनी रीघ लागत होती. कारण राजकीय नेत्यांना जरगें चिंता नव्हती, समाजाच्या व्होट बँकवर डोळा होता. नेते शरद पवारांना जरांगे जाऊन भेटावे लागले.पण मराठा नेत्यांनी समाजाचा विश्वासघात केला, हे लोकांना माहित होते. त्यामुळे आंदोलनाला समाजाचे स्वरूप आले. शिंदे सरकारसमोर प्रश्न कसा सोडावा? या संकटात होते. जरांगे यांनी पाणी पिणे बंद केले. त्यामुळे त्यांची प्रकृती खालावत चालली होती. ते वैद्यकीय उपचार घेण्यास नकार देत होते. तेंव्हा राजकीय नेते त्यांना जरांगे यांना प्रकृतीची काळजी घ्या? पाणी तर पीत जा ! असे विनंती करत होते! शिंदे सरकार व प्रतिनिधी त्यांची भेट घेवून मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला, पण जरांगे मात्र हट्टाला पेटले! राज्य सरकारला आरक्षण द्यावेच लागेल व ते आम्ही घेवू दाखवू! शिंदे सरकार हे तात्काळ आरक्षण देऊ शकते. पण ते वेळकाढूपणा करत आहे. असा समज पसविला गेला. पण तेव्हा शिंदे सरकार या विषयावर घटना व कायदेशीर अडचणीत आहेत, हे स्पष्टपणे सांगत नव्हते!कारण मराठा समाज नाराज होईल! याची त्यांनी भीती होती ! याच दरम्यान पंतप्रधान मोदी महाराष्ट्र दौऱ्यावर येवून गेले, पण त्यांनी राज्यात मराठा आरक्षण आंदोलन चालू असताना त्यावर काहीही भाष्य केले नाही. तेंव्हा पवार व ठाकरे नेत्यांनी मोदीवर टीका केली. भाजपा व पंतप्रधान मोदी हे मराठा समाजाच्या विरोधात आहे. असाच गैरसमज पसरावयाचा होता! त्यात जरांगेनी तोच सूर काढला. वास्तविक आरक्षण देण्याचा अधिकार राज्याच्या कक्षेतील विषय आहे! त्यात घटनात्मक तरतूदी व सर्वोच्च न्यायालयाच्या निकाल, यावर देशाचे पंतप्रधानाने जाहीरपणे बोलणे, अथवा आश्वासन देणे हे उचित ठरले नसते. तो न्यायालयाचा अवमान ठरला असता. याचा अर्थ पंतप्रधान मोदींना हे प्रश्न माहित असे नाही. मग सर्व पक्षीय नेत्याच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान भेट का घेतली नाही. काँग्रेसला ५५ वर्षात करता आले नाही, ते मोदी का करत नाहीत? असा सोडवत नाहीत. असा प्रश्न विचारात याचे आश्चर्य वाटते! तसेच शरद पवार यांना समाजाला कधी भले करावे, असे वाटले नाही, ते मोदीकडे बोट दाखवित आहेत. मोदींनी २०१८ मध्ये १०२ वी घटनादुरुस्ती केली. त्यानुसार राष्ट्रीय मागास आयोगाला घटनात्मक दर्जा दिला. तसेच १०५ वी घटनादुरुस्तीने आरक्षणाचा अधिकार राज्य सरकारला प्राप्त झालेला आहे. याचे ज्ञान नसलेले मराठवाड्यातील नेते केंद्रातील घटना दुरुस्तीची मागणी करत होते.


या आंदोलनात राजकारण सुरु झाले. मुख्यमंत्री शिंदे व फडणवीस!दादा नेत्यांच्या विरोधात घोषणा देणे पुतळे जाळणे! शिव्या देणे! गाढवाच्या गळ्यात त्यांचे छायाचित्र लटकविणे, असे प्रकार सुरु झाले. यात विरोधी पक्ष राज्यात भाजपा विरोधात वातावरणाला खतपाणी घालतच होता. विरोधी पक्ष या आंदोलनाचा वापर करत आहे, हे जरांगेच्या लक्षात आले नाही. त्यामुळे आंदोलनाला हिंसक वळण लागले. मग लोकप्रतिनीधींच्या वाहनावर दगडफेक करणे! त्यांचे घरावर हल्ले होणे! जाळपोळ करणे हे घटना घडल्या.आंदोलनात तरूणवर्ग भावनिक होतो,त्यामुहे तरुणांच्या आत्महत्यचे सत्र सुरु झाले! जरांगे यांनी विनंती करुन ते थांबत नव्हते! राज्यातील कायदा व सुव्यवस्था हाताबाहेर जात होती. विरोधी पक्षांनी राज्यपालांची भेट घेतली होती.इकडे राज्य सरकार आडमुठे भूमिका घेत आहे,असे म्हणायचे दुसरीकडे सरकार जरंगेची मनधरणी करत होते.या आंदोलनात मार्ग निघत नव्हता. यात मराठी मिडीया तर कहर केला! ते आंदोलक समर्थक काम करत होते! छायाचित्राला जोडे मारणे, गाढवाला गळ्यात फोटो घातलेले वृत्त दाखविणे याचे तारताम्य पत्रकारांनी पाळले नाही. इतकेच नव्हे, जाळपोळ, तोडफोड, आंदोलन मीडियाच्या दाखविले होते! म्हणजे मिडीयाला पूर्व सूचना देत आंदोलन केले जात होते! असा संशय येवू लागला. जरांगेच्या उपोषणमागे घेतल्यानंतर मुख्यमंत्री शिंदे व फडणवीस यांनी बैठक घेतली. त्यांनी कायदेतज्ज्ञांचे एक शिष्टमंडळ पाठविले त्यांची ही शिष्टाई कामी आली. या शिष्टमडळात निवृत्त न्या. मारोतराव गायकवाड, न्या. सुनील शुक्रे,वकील हिमांशू सचदेव,यांनी सुमारे तीन तास जरांगेशी मराठा आरक्षणावर घटनात्मक व कायदेशीर चर्चा केली व अडचणी सांगितल्या! यात आरक्षण देण्याची घाई केली तर आरक्षण टिकणार नाहीअसे, स्पष्टपणे सांगितले गेले. यासाठी राज्य सरकारला वेळ देणे आवश्यक आहे, असे सांगितले. या प्रश्नी सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार सुनावणीच्यावेळी योग्य मांडली गेली तर मराठा आरक्षण मिळू शकते, हे सांगितले. हे सर्व थेट मराठी वृत्त वाहिनीवर महाराष्ट्र बघत होता! यावेळी जरांगे यांनी सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र का दिले जात नाही? असा प्रश्न केला होता निवृत्त न्या. शिंदे समिती ही राज्यातील पुरावे व कागदपत्रांची तापासणी करत आहे.यात 'मराठा कुणबी' चा उल्लेख असल्याचे पुरावे आढळत असल्याचे सांगितले गेले. फण त्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी लागेल, असे सांगितले गेले. त्यानंतर राज्याचे मंत्री व लोकप्रतिनिंधीचे शिष्टमंडळ चर्चेसाठी आले.यात धनजंय मुंढे उदय सावंत, संदीपान भुमरे, अतुल सावे, बच्चूकडू होते. त्यांनीही जरांगेशी चर्चा केली. शेवटी "अधिक ताणले तर तुटते' हे मनोज जरांगे पाटील यांचे लक्षात आले व ते उपोषण सोडण्यास तयार झाले! त्यांनी समितीला दोन जानेवारीपर्यंत मुदत दिली गेली आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी राज्यात १३ हजार ५१४ कुणबी नोंदीच्या पुरावे सापडले असून त्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. पुढील दोन महिन्यात राज्य सरकार शिंदे समितीमार्फत जलद गतीने काम पूर्ण करीन! ज्य सरकार मराठा समाज कायद्याच्या चौकटीत व टिकणारे आरक्षण देण्यास वचनबध्द आहे, मुख्यमंत्री शिंदे सांगितले आहे. इतकेच नव्हे ,त्यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेऊन कामाला सुरुवात केली. तेंव्हा त्यांचेवर विश्वास ठेवला पाहिजे. त्यांनी कायदेतज्ज्ञ व मंत्री शिष्टमंडळ व जरांगेचे आभार मानले! त्याचबरोबर राज्यातील विरोधी पक्षाचे आभार मानले.हा त्यांचा मनाचा मोठेपणा! लोकशाहीत आपल्या हक्कासाठी आदोलन करण्याचा अधिकार आहे.त्यात कोणतेही सरकार आदोलनाशिवाय सहज काही देत नाही. महाराष्ट्रातील जनता लढवय्या आहे. महाराष्ट्राचा आंदोलनाचा इतिहास आहे. संयुक्त महाराष्ट्रासाठी १०७ जणांनी बलिदान दिले शेतकऱ्यांनी आपल्या हक्कासाठी छातीवर गोळ्या झेलल्या आहेत. पण आंदोलन हिंसक होणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे, या आंदोलनात बळी गेले ,सार्वजनिक मालमत्तेचे कोट्यवधीचे नुकसान झाले,त्याची भरपाई कोण देणार? याप्रश्नाचे उत्तर मिळणार नाही.

आजचा दिवस माझा हा २०१३ चा राजकारणावर चित्रपट आहे. यात मुख्यमंत्र्यांना अंध गायक कलाकरांचा अवमान केल्याचे वाटते! ते रागात गायकावर भडकतात! पण नंतर त्यांच्या चूक लक्षात येते! त्यावीळी अंध गायकाची शासकीय फ्लॅटची मागणी असते. तेव्हा मुख्यमंत्री एका रात्रीत फ्लॅट देण्याचे धडपड सुरु करतात! त्यात लोकप्रतिनिधी व प्रशासनाचा वाद दाखवाला गेला. पण अखेर त्या अंध गायकाला मुख्यमंत्री न्याय देतात.तेंव्हा राज्यात मराठा समाजासाठी मुख्यमंत्री शिंदे हे प्रामाणिक- पणे प्रयत्न करताना दिसत आहेत! ते कधी अंहकाराने वागलेले नाहीत. त्यांच्या प्रामाणिकतेवर, नीतीवर शंका घेणे योग्य नाही. कारण शिंदे हे राज्याच्या मुख्यमंत्री असले तरी आधी हाडाचे कार्यकर्ते आहेत. त्यामुळे त्यांना सामान्य जनतेचे व सामाजाचे दुःखाची व प्रश्नाची जाणीव आहे. हे सरकार सामान्याचे सांगितले जात असले तरी गरिबांचे गाऱ्हाणे त्यांच्या कानापर्यंत जातच नाही. एक घटना अशी की, नांदेड (हळदा) येथील शेतकऱ्याचा दोन कर्ते मुले मृत्पू पावली,शेतकरी प्रशासनाकडे खेटे मारतो आहे, ना! प्रशासन व ना ! शिंदे सरकार मदतीला धावून आलेले नाही. राज्य सरकारचे निर्णय व मदत सामान्य माणसापर्यंत, गरिबांपर्यंत पोहचतच नाही.ही वस्तुस्थिती आहे. यात उपमुख्यमत्री देवेंद्र फडणवीस अभ्यासक नेते आहेत?तर अजित दादा हे सरळ मनाचे नेते व धाडसी व स्पष्टवक्ते आहेत!त्या त्रिसूत्री नेत्यामुळे.जरांगे उपोषणाचा मार्ग निघाला!यात जरांगे यांनी निःस्वार्थपणे समाजासाठी प्राणपणाला लावले. त्यांनी राज्य सरकारला वेळ देण्याचा निर्णय घेतला. भविष्यात शिंदे सरकारच मराठा समाजाचा प्रश्न सोडवू शकते, असा विश्वास आहे. पण राज्यातील इतर समाजाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होता कामा नये!या ची काळजी सरकारला घ्यावी लागेल. पण आरक्षणाचे आंदोलन हे भाजपा व शिंदे, फडणवीस विरोधी आहे,असे दिसत होते! नेते शरद पवार तसेच माजी मुख्यमंत्री, काँग्रेसच्या नेत्याविरोधात आंदोलकांनी 'ब्र 'शब्द काढलेला नाही. हे विशेष!

पुढे दिवाळी हा सण आहे. या सणात राज्यात कटूता येणार नाही. गोडवा निर्माण होईल, त्यासाठी शिंदे, फडणवीस व अजितदादा यांचे सरकारची शिष्टाई यशस्वी झालेली आहे. महाराष्ट्रातील जनतेची दिवाळी आनंदात साजरी होणार आहे.



मांडणी व सजावट
अतुल खंडगावकर




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

हंपीत शिरताना मुख्य रस्त्यावर दोन्ही बाजूला दोन विशाल शिळांची कमान झालेली आपल्याला दिसते.
यांना जुळ्या बहिणी असे म्हटले जाते. त्या जणू हंपी शहराचे संरक्षण करतात ! देशी परदेशी पर्यटकांची प्रचंड गर्दी हे शहर पाहण्यासाठी नेहमीच असते. युनेस्कोने हंपीचा समावेश जागतिक वारसा स्थळांच्या यादीत केला आहे.
इ.स. १३३६ ते १५६५ या काळातील विजयनगर हे भारतातील अत्यंत वैभवशाली असे साम्राज्य होते. हरिहर आणि बुक्क या पराक्रमी आणि कर्तृत्वान बंधूंनी हे शहर वसवले होते. त्या काळात आशिया खंडातील सर्वात श्रीमंत आणि वैभवशाली शहरांपैकी हे एक असावे. कृष्णदेवराय या  सम्राटाच्या काळात म्हणजे साधारणपणे इ.स, १५०३ ते १५३० हा कालखंड म्हणजे या नगरीचा सुवर्णकाळ मानला जातो. या भारतातील शहराची ख्याती अगदी इराण इराक पर्यंत पोहोचली होती.
विविध देशातून हजारो मैलांचा प्रवास करून व्यापारी आणि पर्यटक या नगरात येत असत. अब्दुल रझाक या पर्शियन प्रवाशाने हंपीबद्दल लिहिताना म्हटले आहे, ' माझ्या नेत्रांनी हंपी इतके अप्रतिम शहर कुठेही पाहिले नाही किंवा ऐकले नाही. अनेक टेकड्यांवर वसलेल्या या शहराला एकामागोमाग एक अशा वर्तुळाकार बांधकाम केलेली सात कोटांची तटबंदी आहे. भर बाजारात दिवसाढवळ्या सोने, चांदी, हिरे, मोती, पाचू इ चे ढीग विक्रीसाठी उघड्यावर ठेवले आहेत. परदेशी व्यापाऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी खरेदीसाठी येतात. या राज्याचा विस्तार ओरिसापासून ते केरळपर्यंत होता. राजाजवळ सात ते आठ लाख एवढे प्रचंड खडे सैन्य जय्यत तयार होते. चलनामध्ये सोन्याची नाणी वापरली जात होती. अत्यंत वैभवशाली अशा या राज्याची १५६० नंतर दुर्दशा होत गेली. १५६५ ला या नगरीवर बहामनी राजांनी आक्रमण केले. त्यात तालिकोट ( राक्षसतागडी ) येथे झालेल्या घनघोर युद्धात विजयनगरचा पराभव झाला.






## आनंदी पहाट

## आनंदप्राप्तीद्वारेच यशप्राप्ती शक्य

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

मानसिक स्वास्थ्य हे आपल्या भावनात्मक, मानसिक आणि सामाजिक बाबींशी निगडीत असतं. आपण कसा विचार करतो, अनुभवतो आणि कृती करतो ? यावर ते अवलंबून असतं. अनेकदा नकळत आपल्या अंतर्मनावर ताण येत असतो, तो जाणवत नाही आणि म्हणूनच कळतही नाही. अशावेळी आपल्या क्रिया आणि प्रतिक्रिया अनावधानानं बदलत जातात. त्यामुळे घेतलेले निर्णय आणि त्या दरम्यान इतरांशी होणारे आपले संवाद काहीवेळा विपरीत परिणाम करणारे ठरू शकतात. यासाठीच जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर अगदी बालपणापासून वृद्धार्पणापर्यंत मानसिक स्वास्थ्य महत्वाचं आहे. आपल्या जीवनात आपण मानसिक स्वास्थ्यविषयक समस्यांचा सामना करत असतो. त्यामुळे आपली विचारसरणी, अंतर्मनाची भावना आणि वागणूक ह्या सर्वांवर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो. मानसिक स्वास्थ्यासाठी समस्या निर्माण करणारे नकारात्मक विचार, जरी ते सामान्य आहेत असं वाटत असलं, तरीही सकारात्मक विचारांच्या माध्यमातून आपण निश्चितच परिवर्तन घडवून आणू शकतो. आनंदाची गोडी अवीट असते, त्यामुळे आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही. आनंदाची प्राप्ती करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन, व्यवहाराची गरज असते. त्यायोगेच सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ शकते. आनंदाची निर्मिती आपल्याच अंतरंगांत करावी लागत असते. आनंद प्राप्ती म्हणजेच खरी यशप्राप्ती असते; हे ज्या व्यक्तीला समजतं, त्याच व्यक्तीला त्याच्या जीवनातलं सार कशांत आहे, हेही कळू शकतं. आपल्या अंतर्मनातील आनंद निर्माण करण्याची बाब ही जितकी महत्वाची असते तितकंच सौंदर्याला देखील महत्व असतं. आपण आपल्या जीवनात सौंदर्याचा शोध घेत असतो तेव्हा ते अधिकाधिक कसं मिळवता येईल ह्यासाठीच प्रयत्नशील असतो.

## भेट...

आधुनिक केसरी

भेट हा शब्द खूपच जिव्हाळ्याचा आहे. भेटीतून अनेक फायदे होतात. समज गैरसमज दूर होतात. भेटीतून ओळखी होतात. भेटीतून वागणं, बोलणं, दिसणं ,असणं या साऱ्या गोष्टी कळतात .प्रत्येकालाच भेटीची ओढ असते. कोणत्या का निमित्ताने होईना पण भेट होणं फार महत्त्वाचं असतं. आई मुलांची भेट ही तर खूपच हृदयस्पर्शी असते .मित्र मैत्रिणीची भेट ओढ लावणारी असते .मुलं कुठे दूर देशी असतील तर कधी एकदा त्यांना भेटू असं होतं. आता आपण व्हिडिओ कॉल करून जरी भेटत असलो तरी प्रत्यक्ष भेट ही काही औरच असते. प्रत्यक्ष डोळ्यासमोर जेव्हा आपली मुलं आई वडील मित्र मैत्रिणी प्रिय व्यक्ती दिसतात तेव्हा त्यांना डोळ्यात किती साठवावं असं होतं. पुन्हा पुन्हा या व्यक्तींना भेटावं वाटतं. कोणी आजारी असेल तर त्या व्यक्तींना भेटून शुभेच्छा दिल्या जातात. लग्न समारंभ इतर कार्यक्रमाच्या वेळी पाहुण्यांची भेट ही खूप महत्त्वाची असते. भेट दिली की आपले कर्तव्य पार पडले असे यजमानांना वाटते. भेट ही वस्तुरूपातही दिल्या जाते. एखाद्याला वस्तू देतात तेव्हा त्याला भेटवस्तू म्हणतात. भेटीदरम्यान दिलेली वस्तू ती भेटवस्तू. भेटीचे प्रतीक भेटवस्तू... वाढदिवस, लग्नसमारंभ यावेळी सुद्धा भेट कार्ड तयार करून भेट दिल्या जाते. त्या भेटकार्डावर आपल्या भावना  व्यक्त होतात. मग त्यावर छान संदेश लिहितात. किती प्रिय व्यक्ती आहे त्यानुसार त्याची सजावट करतात. भेट दोनच अक्षरी शब्द !! पण जगाची ओळख करून देतो. धार्मिक स्थळे, गाव, पर्यटन स्थळांना जेव्हा आपण भेटतो तेव्हा मनाला होणारा आनंद, ज्ञानात पडणारी भर खूप काही देऊन जाते. एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीला भेटण्याची काहींना हौस असते.  काहींना अनाथ आश्रम, रुग्णालय ,वृद्धाश्रमांना भेट देण्याची ओढ असते. बरेच लोक फोन, पत्र याद्वारे सविस्तर बोलत नाही. प्रत्यक्ष भेटीतच जास्त बोलतात. अशी ही अनमोल भेट सगळ्यांना भेट मिळो ....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.२३




## निरूपण

आधुनिक केसरी

जो भगवंताचा भक्त ।तो जन्मापासून मुक्त ।
ज्ञानबळें बिरक्त ।सर्वकाळ ॥५२॥
ऐशा गर्भवासीं विपत्ती ।निरोपिल्या येथामती ।
सावध होऊन श्रोतीं ।पुढें अवधान द्यावें ॥५३॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
जन्मदुःखनिरूपणनाम समास पहिला ॥१॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज


ज्ञान योगी पद श्रेष्ठ है, सर्व सुशोभित मान ।
कथन गहन सब एक है, अचल अमोलिक ज्ञान ।।५३।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल प्रथम अध्याय) ०२/०१/५३

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ज्ञान योगीचे पद श्रेष्ठ, पूजनीय सर्व सुशोभित आहे, कारण कथनी आणि व्यवहार (बोलणे आणि वागणे) दोन्ही एकच आहे. तसेच त्यांचे ज्ञान दृढ अलौकिक आहे. म्हणून ज्ञानयोगीचे पद आणि ज्ञान श्रेष्ठ, सर्वपूज्य आहे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## संत मुक्ताबाई

आधुनिक केसरी



त्यामुळे त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले. तिचा हिरमुसलेला चेहरा बघून ज्ञानेश्वरांनी योगबळाने त्यांची पाठ तापवून मुक्ताबाईला पाठीवर मांडे भाजण्यास सांगितले. तो चमत्कार पाहून विसोबा ज्ञानेश्वरांना शरण आले. त्यांनी मुक्ताई ने भाजलेले मांडे प्रसाद म्हणून खाण्यासाठी धावतच झडप घातली. त्यावर मुक्ताईने त्यांना खेचर पक्षी असे म्हटले. तेव्हापासून विसोबांनी तेच नाव धारण केले आणि ते विसोबा खेचर बनले. मुक्ताबाईंवर गोरक्षनाथांच्या कृपेचाही वर्षाव झाला होता. त्यानंतर त्यांना अमृत संजीवनीची प्राप्ती झाली.
संत मुक्ताबाईंचे ताटीचे अभंग संत मुक्ताबाईंनी रचलेले ताटीचे एकूण ४२ अभंग प्रसिद्ध आहेत. या अभंगांमध्ये त्यांनी आत्मक्लेशामुळे दरवाजा बंद करून बसलेला आपला भाऊ ज्ञानदेव यांनी दरवाजाची ताटी उघडावी म्हणून विनवणी केली आहे. तिने ज्ञानेश्वरांना, आदिनाथांपासून गहीणीनाथांकडे आणि त्यांच्याकडून निवृत्ती, ज्ञानदेवाकडे आलेल्या नाथसंप्रदायाची आठवण करून दिली. घराण्याच्या मोठेपणाचे, योगीपणाचे स्मरण दिले. जो जनांचे अपराध सहन करतो तो योगी. अवघे विश्व जरी आपल्यावर रागावले तरी जलासारखे थंडपण घेऊन त्या क्रोधाग्निला विझवायचे. लोकांच्या शब्दरूपी शस्त्राने जरी त्रास झाला तरी चांगला उपदेश मान्य करायचा. अशा शब्दात समजावताना मुक्ताच्या शब्दांचे अभंग झाले तेच ताटीचे अभंग.

**योगी पावन मनाचा | साहे अपराध जनांचा**
**विश्व रागे झाले वन्ही | संती सुखे व्हावे पाणी**
**शब्दशस्त्रे झाले क्लेश | संती मानावा उपदेश**
**विश्वपट ब्रम्हदोरा | ताटी उघडा ज्ञानेश्वरा**

समजवताना ती म्हणते, आपलाच हात आपल्याला लागला तर त्याचे दुःख करू नये. आपली जीभ आपल्या दाताखाली आली म्हणून लगेच काही आपण दात पडून टाकत नाही. ब्रह्मपदाला पोहोचायचे तर लोखंडाचे चणे खावे लागतात, अपेष्टा सहन कराव्या लागतात,
हात आपुला आपणा लागे | त्याचा करू नये खेद

**जीभ दातांनी चाविली | कोणे बत्तीशी पाडिली**
**चणे खावे लोखंडाचे | मग ब्रह्मपदी नाचे**


समजवण्याच्या सगळ्या मार्गांनी जाऊनही ज्ञानदादा काही ताटीचे दार उघडेना. तेव्हा हळवी झालेली मुक्ता म्हणते,

**लडिवाळ मुक्ताबाई | जीव मुद्गल ठायीचे ठायी**
**तुम्ही तरुण विश्व तारा | ताटी उघडा ज्ञानेश्वरा**

## भवसागर तरून जाण्यासाठी नाम हेच साधन

आधुनिक केसरी

नाम हे स्वतःसिद्ध आहे म्हणूनच ते अत्यंत उपाधिरहित आहे. नाम घेताना आपण पुष्कळदा त्याच्या मागे उपाधी लावतो; उदाहरणार्थ आपण ऐहिक सुखाच्या प्राप्तीकरिता नाम घेतो; किंवा मी नाम घेतो ही अहंकाराची भावना बाळगतो. या उपाधीमुळे आपल्या प्रगतीला बरेच अडथळे येतात. म्हणून नामाकरिताच नामस्मरण करावे आणि तेही सदगुरूच आपल्याकडून करवून घेतात या भावनेने करावे. त्या योगाने अहंकार नष्ट होऊन शरणागती येईल. शरणागती यायला रामनाम हाच रामबाण उपाय आहे. तो आपण करावा. नामाचा महिमा वाचेने सांगणे अशक्य आहे पण हे सांगण्याकरिता तरी बोलावे लागते इतकेच. मनुष्यप्राणी भवसागरात गटांगळया खातो आहे; समुद्रातून तरून जाण्यासाठी जशी नाव तसे भवसागरातून तरून जाण्यासाठी भगवंताचे नाम आहे. फक्त एकच दक्षता घेणे जरूर आहे ती ही की नावेत समुद्राचे पाणी येऊ देऊ नये नाहीतर नावेसकट आपण बुडून जाऊ; त्याप्रमाणे संसाररूपी समुद्राचे पाणी नामरूपी नावेत येऊ देऊ नये. म्हणजे कोणत्याही प्रापंचिक अडचणीमुळे नामात



व्यत्यय येऊ देऊ नये. तसेच नामाचा उपयोग संसारातल्या अडचणी दूर होण्याकरिता व्हावा ही बुद्धी न ठेवता नामाकरिताच नाम घ्यावे म्हणजे नावेत पाणी न शिरता सुखरूपपणे पैलतीराला म्हणजे भगवंतापर्यंत पोहोचता येते. कोणतीही गोष्ट अभ्यासानेच साध्य होत असते. देह केव्हा जाईल याचा नेम नाही मग म्हणून म्हातारपणी नामस्मरण करू असे म्हणू नये. अगदी उद्यापासून नामस्मरण करू म्हटले तर उद्याची खात्री आहे का ? आयुष्य क्षणभंगुर आहे ही खात्री प्रत्येकाला आहे म्हणून तर प्रत्येकजण आयुष्याचा विमा उतरवतो. लग्नाला आलेल्या पाहुण्याला लग्न कसे पार पडेल ही काळजी नसते पण घरातल्या माणसाला फार काळजी वाटते. आपल्या प्रपंचात आपण पाहुण्यासारखे वागू या. देहादिक सर्व रामाला अर्पण करून निश्चिंत होऊ या. सोन्यामोत्याचे दागिने घालणारी श्रीमंताची बाई असू द्या बेताचे लहान दागिने घालणारी मध्यम स्थितीतली बाई असू द्या किंवा चांदीची जोडवी आणि नुसते मंगळसूत्र घालणारी अगदी गरिबाची बाई असू द्या त्या सर्वांना कुंकू ज्याप्रमाणे सारखेच असते त्याप्रमाणे कसलाही भेद न ठेवता नाम हे सर्वांना सारखेच साधन आहे. सूर्य हा फक्त प्रकाश देतो पण त्यामुळे अंधार आपोआप नाहीसा होतो. तसेच नाम हे भगवंताचे प्रेम वाढविते; मग आपले दोष आपोआपच नाहीसे होतात. भगवंताचे अस्तित्व आपल्याला जास्त पटत चालले किंवा भगवंताच्या कर्तृत्वाची साक्ष जास्त जास्त अनुभवास येऊ लागली की परमार्थामध्ये आपली प्रगती झाली असे समजावे.

रविवार, ५ नोव्हेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ९०
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SAUNDAY 5 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-90 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5


# आता न्या. शिंदे समितीची व्याप्ती राज्यभर

## पालकमंत्र्यांनी दिली मनोज जरांगे यांना शासन निर्णयाची प्रत

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यातील मराठा समाजास मराठा कुणबी, कुणबी मराठा जात प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्यासाठी निवृत्त न्यायमुर्ती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीची व्याप्ती आता संपूर्ण राज्यभरासाठी करण्यात आली आहे. तसा शासन निर्णय दि.३ नोव्हेंबर रोजी निर्गमित झाला आहे. या निर्णयाची प्रत आज शासनाच्या शिष्टमंडळाने मनोज जरांगे पाटील यांना प्रत्यक्ष भेटून दिली. तसेच त्यांच्या प्रकृतीची विचारपूसही केली. जरांगे पाटील यांनी या शासन निर्णयाबाबत समाधान व्यक्त केले आहे.**



उपोषण संपल्यानंतर जरांगे पाटील हे येथील गॅलक्सी रुग्णालयात उपचार घेत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संदिपान भुमरे, गृहनिर्माण मंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे, आ. नारायण कुचे, मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी मंगेश चिवटे यांच्या शिष्टमंडळाने आज मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण करणारे मनोज जरांगे पाटील यांची शनिवारी घेतली. गॅलक्सी रुग्णालयात हे शिष्टमंडळ जरांगे पाटील यांना भेटले. शासनाने दि.३ रोजी जारी केलेल्या समितीची व्याप्ती राज्यभर वाढविण्यासंदर्भातील शासन निर्णयाची प्रत जरांगे पाटील यांना दिली.

जरांगे पाटील यांनी या शासन निर्णयाबाबत समाधान व्यक्त केले. शासन आमच्या मागणीसंदर्भात गांभिर्याने काम करीत आहे. समितीची व्याप्ती संपूर्ण राज्यासाठी झाल्याने राज्यभरातील समाज बांधवांना न्याय मिळेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. आपली प्रकृती आता चांगली असून मी लवकरच बरा होईन, असेही त्यांनी सांगितले. पालकमंत्री संदिपान भुमरे म्हणाले की, ' मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शासनाने तातडीने या समितीची व्याप्ती राज्यभर करण्याचा शासन निर्णय निर्गमित केल्याने विश्वास वाढला आहे. न्यायमूर्ती शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीचे कामकाज सुरु आहे. मराठा समाजाला लवकरात लवकर न्याय देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. त्यादृष्टीने समितीही कामकाज करीत आहे. शासनाच्या निर्णयाबाबत मनोज जरांगे पाटील हे सुद्धा समाधानी आहेत. त्यांनी आता आपल्या प्रकृतीची काळजी घ्यावी, असे आवाहन भुमरे यांनी केले.

**शासन निर्णयाबद्दल :** सामान्य प्रशासन विभागाच्या या शासन निर्णयानुसार, मराठवाड्यातील मराठा समाजास मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यक ते अनिवार्य दस्ताऐवज, पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी करण्याबाबत तसेच तपासणीअंती पात्र व्यक्तिंना तसे जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धतीविहित करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती . त्या समितीची व्याप्ती संपूर्ण राज्यासाठी वाढविण्यात आली आहे . तसेच या समितीने आपला अहवाल दि .२४ डिसेंबर २०२३ पर्यंत शासनास सादर करावा असे नमूद केले आहे .



# माकडाची शिकार करणे बिबट्याला भोवले

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शिकारीसाठी माकडाच्या मागे लागलेल्या बिबट्याला नाहक आपला जिव गमवावा लागल्याची घटना चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यात घडली आहे. सिंदेवाही वन परिक्षेत्रात येणाऱ्या खातगाव भेंडारा येथे बंदराची शिकार करताना डीपीवर चढलेल्या बिबट्याचा जिवंत वीज प्रवाहाचा स्पर्श झाल्याने मृत्यू झाल्याची घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. शिकारीच्या शोधात असलेल्या बिबट्याला डिपी वर माकड बसलेले दिसले. बंदराने डिपीवर चढून शिकार करण्याच्या प्रयत्नात माकडाला व बिबट्यालाही जिंवत विद्यूत प्रवाहाचा स्पर्श झाला आणि यात शिकार करायला गेला बिबट आणि सावज असलेले माकड दोघांचाही जिव गेल्याची दुर्दैवी घटना घडली. गावकऱ्यांना हे दृश्य दिसताच त्यांनी एकच गर्दी केली. वनकर्मचाऱ्यांना माहीती दिली. घटनेची माहीती मिळताच वन परिक्षेत्र अधिकारी व वन कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. सिंदेवाही पशुधन विकास अधिकारी डॉ. विनोद सुरपाम, डॉ. शालिनी लोंढे यांच्या उपस्थितीत मृत बिबट्याची पाहणी करण्यात आली. वनविभागाने पंचनामा केला. मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर, सिंदेवाही तहसीलचे वन परिक्षेत्र अधिकारी विशाल साळकर, क्षेत्र सहाय्यक दीपक हटवार, वन कर्मचारी, विद्युत विभागाचे कर्मचारी, पोलीस विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# स्वर्गाच्या झाडावर भानामती!

## पोलीस प्रशासनाकडून मात्र बघ्याची भूमिका

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यातील ग्रामीण भागात अजूनही भूतबाधा, भानामती, जादूटोणा, यासारखे प्रकार सुरूच आहेत. बुध्दीहिन अश्या अशिक्षित, अज्ञानी लोकांमुळे रस्त्यालगत व शासकीय वनपरिक्षेत्रातील अनेक वृक्ष जादूटोण्याच्या या प्रकाराला बळी पडत आहेत. राज्यात जादूटोणा विरोधी कायदा लागू झाला तरीहि असे प्रकार होत असतील तर त्याविरुद्ध थेट पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद केला जातो. पण जिल्ह्यातील वाशी शहरातील पोलीस प्रशासन मात्र या भानामती, जादूटोणा याबाबत बघ्याचीच भूमिका घेत असल्याचे दिसून येत आहे. दरवर्षी जास्तीत जास्त वृक्ष लागवड उद्दिष्ट ठेवून वर्षाला वृक्ष लागवडीसाठी व जाहिरातीवर अमाप खर्च केला जातो. तर इकडे धाराशिव जिल्ह्यात परिस्थिती मात्र वेगळीच आहे. बुवाबाजी करणाऱ्या विकृत वृत्तीच्या लोकांमुळे महामार्गावरील राज्य मार्गावरील वन क्षेत्रामधील ठराविक वृक्षांचे जीव धोक्यात आले आहेत. रस्त्याच्या कडेने संबंधित विभाग किंवा एखाद्या सामाजिक संस्था कडून लावलेली वृक्षाची झाडे यातील एक वृक्ष म्हणजे 'आयलान्थस एक्सेलसा' सामान्यतः स्वर्गाचे झाड म्हणून ओळखले जाणारे आणि भारत आणि श्रीलंकेमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळणारे एक पर्णपाती वृक्ष आहे. तमिळमध्ये याला त्याच्या अप्रिय गंधामुळे 'पीनारीमारम' असेही म्हणतात. या वृक्षाचा उपयोग सीमा चिन्हांकित करण्यासाठी आणि मातीची धूप रोखण्यासाठी शेतात आणि नद्यांच्या काठावर होतो.

**आयुर्वेदामध्ये खूप महत्त्व :** डिंक आणि कडू, सुगंधी पानांमध्ये औषधी गुणधर्म असल्याने झाडाचे



औषधात अनेक उपयोग आहेत . झाडाची साल एक ज्वर आहे आणि दमा, ब्रॉंकायटिस आणि आमांश वर उपचार म्हणून वापरली जाऊ शकते .प्रसूतीनंतर वापरल्या जाणाऱ्या शक्तिवर्धक म्हणून पाने आणि साल देखील चांगली प्रसिद्ध आहेत . पानांचा रस आणि ताज्या सालाचा वापर नंतरच्या वेदनांवर उपाय म्हणून केला जातो . निसर्गात एवढे विशेष महत्त्व असणाऱ्या या झाडाला सडलेल्या बुद्धीच्या, भोंदूगिरी करणाऱ्या व्यक्तीकडून झाडांवर हजारोंच्या संख्येने मोठे-मोठे खिळे मारून त्यावर लिंबू, बिबा हे लटकवले जात आहे . विशेष म्हणजे वर्दळीचा रस्ता असून त्यात रस्त्यावर भले मोठे असणारे हे स्वर्गाचे झाड आणि त्यावर हजारो खिळे, मोठया सुया ठराविक दिवस वार वेळ ठरवून मारल्या जातात .

**जादूटोणाविरोधी कायदा काय आहे?**

राज्यात जादूटोणा विरोधी आणि अंधश्रद्धा निर्मूलन कायदा लागू झाला आहे, या कायद्यानुसार मांत्रिक किंवा अन्य एखाद्या व्यक्तीमार्फत अघोरी उपचार करणे, भानामती करणे, काळी जादू करणे असे प्रकार निदर्शनास आल्यास त्याविरुद्ध गुन्हा नोंद होत होतो .

आयुर्वेदात अत्यंत उपयुक्त असणाऱ्या तसेच शेतीसाठी व नदीकाठी ही त्याची योग्य भूमिका साकारणाऱ्या या वृक्षाचे जतन होणे गरजेचे आहे .
**डॉ .श्याम डोके, वरिष्ठ प्राध्यापक, वनस्पती शास्त्र विभाग**

# खा. अशोक नेतेंच्या वाहनाला भीषण अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** गडचिरोली-चिमूरचे खासदार अशोक नेते यांच्या वाहनाला भरधाव टिप्परने धडक दिली. मात्र, 'सीटबेल्ट'चा वापर केल्याने वेळीच 'एअरबॅग' उघडले आणि खासदार नेते, चालक व सुरक्षारक्षक बचावले. नागपूरजवळील विहिरीगाव जवळ हा अपघात घडला.

खासदार अशोक नेते हे ३ नोव्हेंबरला मध्यरात्री मुंबईतून नागपूरला पोहोचले. नागपूर येथील शासकीय विश्रामगृहात मुक्काम करून ४ नोव्हेंबरला सकाळी ते गडचिरोलीला जाण्यासाठी निघाले. विहिरीगावजवळ त्यांच्या वाहनासमोर अचानक टिप्पर आले व समोरासमोर जोराची धडक झाली. यावेळी खासदार नेते यांच्यासह चालक, दोन सुरक्षारक्षक व अन्य एक असे पाच जण वाहनात होते. खासदार नेते हे समोरील सीटवर होते. त्यांच्यासह चालकाची एअरबॅग उघडली, त्यामुळे त्या दोघांसह आतील इतर तीन प्रवासी सुखरूप बचावले. यानंतर मोठी गर्दी झाली. पोलिसांनी धाव घेत पाहणी केली.




# सांस्कृतिक विभाजन



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**जागतिक इतिहासामध्ये संस्कृतीच्या अंगाने विचार करताना आपणास प्रामुख्याने दोन गोष्टी स्पष्ट होतात. समाजाचा एक मोठा वर्ग ज्या संस्कृतीवर आधारित असतो अशी ती कृषी संस्कृती आणि या कृषी संस्कृतीला दुय्यमत्व देऊन मात्र त्यावर आधारितच अशी परपोषी संस्कृती. संस्कृतीच्या इतिहासात यादोन्ही संस्कृतीमधील द्वंद्व आजपर्यंत पाहत आलो आहोत आणि भविष्यात देखील पहावयास मिळेल. कारण कृषी संस्कृतीची निर्मिती ज्या व्यापक हेतूने आणि सहानुभवातून झाली तीच रीत मात्र परपोषी संस्कृतीची नाही. समाजातील परिवर्तनवादाच्या प्रत्येक लढ्यामागे या दोन संस्कृतींची आपापली बाजू लावून धरणे आणि त्यासाठी निकराचा लढा उभारणे हा भाग असतो.**



## क्षितिजापल्याड

भारतापुरता विचार केला तरी भारतातील वर्णाश्रम व्यवस्थेमधून आपणास वर्णाश्रम धर्माची जी संस्कृती पहावयास मिळते त्यातही हे दोन घटक ठळकपणे अधोरेखित करता येतील. गुणकर्मानुसार व्यवस्थेचे विभाजन करताना त्रैवर्णीकांची संस्कृती भिन्न आणि ब्राह्मणी संस्कृती भिन्न असेही विवेचन आपण पाहतो. यात मग प्रथम आणि दुय्यम कोण असाही वाद चालू असतो. यातूनच पुढे अभिजन संस्कृती आणि बहुजन संस्कृती नामक संस्कृतीचे विश्लेषण मोठ्या प्रमाणावर करण्यात येते. व्यवस्थेमधील सत्ता, संपत्ती, पद, प्रतिष्ठा आणि एकूणच उत्पादनाचा लाभांश तोही तितक्याच आदराने कोणत्या वर्गाकडे जातो यावर संस्कृतीची मदार अवलंबून असते. वैदिक संस्कृती आणि श्रमण संस्कृती असाही एक भेद आपण करत असतो. भगवान गौतम बुद्धाने पहिल्यांदा वैदिक संस्कृतीचा अव्हेर करण्याच्या पाठीमागे केवळ इथली कर्मकांड व्यवस्था किंवा उच्चनीचपणा हाच भाग महत्त्वाचा नव्हता तर एकूण व्यवस्थेच्या केंद्रस्थानी सामान्य माणसाचे नसलेपण अधिक ठसठशीतपणे त्यांना जाणवल्यामुळे एका वेगळ्या संस्कृतीची निर्मिती आपल्या कृती आणि उक्तीतून करण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न हा जगाच्या इतिहासातील पर्यायी संस्कृतीचा पहिला प्रयत्न होता, असे म्हटल्यास वावगे ठरवू नये. काही मंडळींनी वैदिक संस्कृतीचा अव्हेर करून श्रीकृष्णाने भागवत धर्माची स्थापना केल्यामुळे स्त्री शुद्रांना देखील भागवत धर्मात महत्त्वाचे स्थान आहे असेही विश्लेषण केले आहे. परंतु ज्या भागवत धर्माचा पायाच मुळात वैदिक संस्कृती हा अप्रत्यक्षपणे का असत नाही पण तो तसा असल्यामुळे भागवत धर्म आणि वैदिक धर्म हे पूर्णपणे भिन्न आहेत असे म्हणता येणार नाही. स्त्री शुद्रांना श्रेष्ठत्व बहाल करण्याची काही उदाहरणे आपणास श्रीकृष्ण चरित्रात किंवा त्यांच्या विश्लेषणात आढळत असली तरी एकूण व्यवस्थात्मक बांधणीचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा ती वैदिक संस्कृतीला पर्यायी संस्कृती नव्हती तर वैदिक संस्कृतीतील ज्या काही उणिवा काळानुरूप दृश्यमान होत होत्या त्या दूर सारण्याचा आणि वैदिक संस्कृतीची पुनर्स्थापना करण्याचा केलेला प्रयत्न होय, असेच म्हणावे लागेल. ब्राह्मण आणि श्रमण संस्कृती हे विभाजन म्हणजे आजच्या काळातील अभिजन आणि बहुजन संस्कृतीचे पूर्वकालीन रूप म्हणूनही आपण त्याकडे पाहू शकतो. वेद किंवा उपनिषदे याबद्दलचा दुराग्रह नसला तरी त्याबद्दलची उत्सुकता मात्र किंवा आत्मोद्धार, स्वर्ग, नरक आणि त्यासाठीचे मानवी प्रयत्न या कोणत्याच गोष्टी बहुजन समाजातील संस्कृतीमध्ये आपणास विश्लेषित करता येणार नाहीत. बहुजन संस्कृतीचा मूळ उद्गाता म्हणून आपण बुद्धाकडे पाहू शकतो. गौतम बुद्धाने केलेली क्रांती ही एक प्रकारे समाज क्रांतीच होती. या समाज क्रांतीच्या केंद्रस्थानी आपणास सामान्य माणसाचे असणे स्पष्टपणे दाखवता येऊ शकते. कदाचित वैदिक संस्कृतीने बौद्ध संस्कृतीला पर्याय म्हणून आपल्यात काही बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने भागवत धर्म म्हणून जी संस्कृती पुढे आणली ती बहुजन संस्कृती की अभिजन संस्कृती हा प्रश्न आणि या प्रश्नाच्या अनुषंगाने शोध घेणे महत्त्वाचे ठरते. काळानुरुप समाजात होणारे बदल वैदिक संस्कृतीने हेरले आणि त्यात बहुजनांना सामावून घेणारी मूल्य व्यवस्था अंतर्भूत करून एक नवीन संस्कृती उदयास आणण्याचा, प्रचलित करण्याचा प्रयत्न केला. तो बराचसा यशस्वी सुद्धा झाला. त्याचे कारण असे की मध्ययुगातील एकूण संत परंपरेने ज्या भागवत धर्माची पताका आपल्या खांद्यावर घेऊन बहुजन समाजाला उपदेश केला त्यातील अमुक बाब भागवत धर्माची आणि तमुक गोष्ट वैदिक धर्माची अशी स्पष्ट विभागणी आपणास करता येत नाही. संत तुकाराम जेव्हा वेदांचा तो अर्थ, आम्हासीच ठावा, येरांनी वाहवा, भारमाथा, असे म्हणतात तेव्हा ते वैदिक धर्म आणि भागवत धर्म या दोन्हींचेही प्रतिनिधी ठरतात. म्हणजेच वेदवाङ्मयातील, वैदिक संस्कृतीतील मूल्य व्यवस्था काल सुसंगतरीत्या बहुजन



समाजात पेरण्याचा किंवा ती मूल्य रुजवण्याचा संतांकडून झालेला हा प्रयत्न सांस्कृतिक मिलाप ठरतो. कोणत्याही काळामध्ये सांस्कृतिक कट्टरता जेव्हा संस्कृतीमध्ये रुजली जाते त्यावेळेस ती संस्कृती हळूहळू अस्तंगत होण्याच्या मार्गावर मार्गक्रमण करत असते, हे इतिहाससिद्ध आहे. म्हणून भागवत धर्माने वैदिक संस्कृतीतील कट्टरता कमी करून बहुजन वर्गाला रुचेल, पचेल आणि दैनंदिन जीवनात उपयोगी पडेल अशी मूल्यात्मक बांधणी आपल्या वाङ्मयातून करून ही संस्कृती रुजवण्याचा यथाशक्ती आणि यथामती प्रयत्न केलेला आहे. या ठिकाणी बौद्ध संस्कृती श्रेष्ठ की भागवत संस्कृती श्रेष्ठ हा भाग महत्त्वाचा नसून बौद्ध संस्कृतीने वैदिक संस्कृतीला काळानुरुप आपल्यात बदल करून घेण्यास भाग पाडले हे महत्त्वाचे ठरते. म्हणूनच आपणास भागवत धर्मात जसे वैदिक संस्कृतीचे पुरावे सापडतात तसेच बौद्ध संस्कृतीतील मूल्यात्मक जाणिवा अनेक संतांच्या अभंगातून स्पष्टपणे दाखवता येऊ शकतात. हीच सांस्कृतिक एकात्मता आधुनिक काळात महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या वक्तव्यांमधून, त्यांच्या विचारातून आणि कार्यातूनही स्पष्टपणे अधोरेखित करता येतात. आपण आस्तिक आहोत की नास्तिक किंवा आपण अभिजन आहोत की बहुजन किंवा आपण पितृसत्ताक कुटुंब व्यवस्थेचे समर्थक आहोत की मातृसत्ताक कुटुंब व्यवस्थेचे पाईक, आपण सश्रद्ध आहोत का अश्रध्द या गोष्टी बाजूला सारून एकूण समाजाचा विचार करत असताना कालसुसंगत मूल्यव्यवस्था टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने काही एक समाजभान आपण निर्माण करत आहोत का? हा प्रश्न मात्र महत्त्वाचा आहे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# मोबाईलचा अतिवापर धोकादायक




बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आधुनिक केसरी

**मोबाईलवर जास्त वेळ बोलल्याने मेंदूमध्ये बनलेले काही रसायने निष्क्रिय होतात, ज्यामुळे झोपेचा त्रास होतो. जे लोक मोबाईल फोनवर जास्त वेळ बोलतात त्यांना मेंदूच्या कॅन्सरचा धोका जास्त असतो. मोबाईल कानाजवळ ठेवून बोलत असताना त्यातून निघणारे इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन टिश्यूज शोषून घेतात. त्यामुळे कॅन्सरचा धोका वाढतो. ब-याचदा लहान लहान मुलं तासनतास मोबाईलमध्ये घुसलेली असतात. हल्ली तर अभ्यास, मित्रमैत्रीणींसोबत संवाद आणि खेळ देखील मोबाईलमध्येच होतात. पण पालकांना हे माहित असणं फार गरजेचं आहे की मोबाईलच्या अतिवापराने मुलांना कोणते आजार होऊ शकतात आणि मोबाईल वापरणं किती धोकादायक आहे.**

सध्याच्या मुलांना लहानपणापासून एक वेगळीच सवय लागते. त्यांच्या हातात मोबाईल असल्याशिवाय ते जेवायलाच बघत नाही. कार्टून बघत, गाणी बघत किंवा गेम खेळत जेवण करण्याची ही सवय अतिघातक आहे. अर्थात ही सवय लागण्याला पालक सुद्धा तितकेच जबाबदार असतात. लहान असताना तो जेवत नाही हे पाहून पालक त्याला मोबाईल दाखवून जेवण भरवायला सुरुवात करतात. तर मुलांना इथून पहिली मोबाईलची सवय लागते आणि मग पुढे पुढे जस जसे ते मोठे होत जातात ही सवय इतकी वाढते की त्या मुलांना मोबाईल शिवाय दुसरं काही सुचत नाही.
सतत २४ तास त्यांच्या हातात मोबाईल असतो. वेळीच पालकांनीही आवर न घातल्याने मूल सुद्धा मग ऐकून घेत नाही आणि नाईलाजाने पालकांना त्याचा हट्ट पुरवावा लागतो. पण मंडळी ही सवय अतिशय वाईट आहे. एवढ्या लहान वयात मोबाईलचा अतिवापर तुमच्या मुलाभोवती अनेक आजारांचा विळखा घालण्यास कारणीभूत ठरू शकतो. आज आम्ही तुम्हाला या विशेष लेखातून हेच सांगणार आहोत की असे काय आजार आहेत जे मोबाईलच्या अतिवापरामुळे तुमच्या मुलाला त्रस्त करू शकतात. जर मुलांना लहान वयातच मोबाईलची सवय लागली तर सगळ्यात पहिलं ते शिकतात मेसेज टाईप करायला. आपल्या आई वडिलांना पाहून त्यांना सुद्धा मेसेज पाठवण्याची सवय पडते. जस जसे मोठे होत जातात तस तशी चॅटिंगची सवय सुद्धा



त्यांना लागते. पण यामुळे त्याला टीन टेंडोनाइटिस हा विकार होऊ शकतो. या विकाराला टीटीटी असेही म्हणतात. यात चुकीच्या स्थितीत बसून मोबाईल वापरल्याने बोटे, हात, पाठ आणि मानेत खूप वेदना होऊ शकतात. याला वेळीच आवर न घातल्यास पुढे अजून गंभीर समस्या निर्माण होऊ शकते. याशिवाय यामुळे नजर सुद्धा प्रभावित होते. आजकाल मोबाईल वापरणे हे लोकांचे प्रतिष्ठेचे लक्षण झाले आहे. एकसे बढकर एक भारी भारी मोबाईल आजची तरुणाई खरेदी करताना दिसत आहे.पण हल्लीच्या लोकांना एक दिवस जरी मोबाईल नसेल ना तरी बेचैन होत आहे. कुठेही जावा मोबाईल त्यांच्यासोबत असणारच.एवढे भयानक मोबाईलचे व्यसन आजच्या युवा पिढीला जडले आहे. सांगायचा मूद्दा काय तर या मोबाईलच्या व्यसनामूळे बरेच जण मनोरुग्ण होत आहेत. आजची तरुणाई मोबाईलची पक्की गुलाम झाली आहे. जेवताना मोबाईल, झोपताना मोबाईल व चार चौघात बसले तरीही मोबाईल हाताळताना आमची युवा पिढी दिसत आहे.लोकांमध्ये बसल्यावर लोक काय बोलतात याकडे लक्ष न देता मोबाईलमध्ये रममाण होणारी आजची तरुणाई आहे.या मोबाईलच्या जमान्यात आपूलकी, जिव्हाळा व प्रेम कमी झाले आहे आणि दुरावा वाढला आहे. कारण आजकाल कोणीच कोणासाठी वेळ द्यायला तयार नाही. मोबाईलमूळे लोकांना माणसात बसणे आवडत नाही.उलट एकटे दूकटे राहायला आवडत आहे. यात मूली व महीला सुध्दा मोबाईलच्या आहारी गेल्या आहेत आणि आतातर मोबाईलमध्ये भारी भारी गेम्स आल्यामूळे मोबाईलच्या जमान्यात साधे खेळ व मैदानी खेळ नामशेष झाले आहेत. त्यामध्ये बरेच वेगवेगळ्या प्रकारचे गेम्स आहेत. जेकी आमची तरुणाई मोबाईलमध्ये तोंड खूपसून गेम खेळत बसते. मी असेही म्हणत नाही की लोकांनी मोबाईल वापरु नये. मोबाईल तर गरजेचा आहेच हो पण त्यालाही काही तरी टाईम टेबल व मर्यादा असली पाहिजे. परंतू मोबाईल जेवढा चांगला आहे तेवढाच वाईट पण आहे. त्याचा फायदा करुन घ्यायचा कि तोटा हे आपल्याच हातात आहे. शाळकरी मुले व महाविद्यालयीन मुले अभ्यासाच्या नावाखाली आईवडिलांकडून रट लावून मोबाईल घेतात आणि त्याचा दुरूपयोग करतात.तेव्हा पालकांनाही माझी कळकळीची नम्र विनंती आहे की,आपल्या मुला मुलींना मोबाईल जरुर घेऊन द्या पण तो खरंच मोबाईलचा सदूपयोग करतो का दुरुपयोग करतो हेही तपासायला हवे. नाहीतर अभ्यासाच्या नावाखाली उगाच मोबाईल घेऊन देवू नका. त्याची अगोदर शहानिशा करा आणि मग मोबाईल द्या.नाहीतर मोबाईलचा अति वापर विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरू शकतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# स्पर्धात्मक जगात गुणवत्ता व ऑनलाईन विक्रीवर भर द्यावा

## अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील : भव्य विक्री व प्रदर्शनीचे उद्घाटन; महिला बचतगटांचे ३५ स्टॉल्स

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सध्याचे जग हे स्पर्धात्मक असुन बचतगटातील महिलांनी तयार केलेल्या वस्तूंची विक्री करतांना वस्तूची गुणवत्ता कशी सर्वोत्तम असेल यावर व ऑनलाईन माध्यमातुन वस्तूंची विक्री करण्यावर भर द्यावा असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांनी भव्य विक्री व प्रदर्शनीच्या उदघाटन प्रसंगी केले.

चंद्रपूर शहर महानगरपालिकेतर्फे दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाअंतर्गत दि.३ ते ७ नोव्हेंबर दरम्यान महिला बचत गटांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थांची विक्री व प्रदर्शनी ज्युबली शाळेजवळ असलेल्या कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित केली गेली असुन या भव्य विक्री व प्रदर्शनीचे उदघाटन अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांच्या हस्ते ३ नोव्हेंबर रोजी करण्यात आले. महिला बचत गटांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थांची विक्री व प्रदर्शनी हा नाविन्यपुर्ण उपक्रम असुन याचा ज्यास्तीत ज्यास्त महिलांनी लाभ घ्यावा. महिलांनी अधिक चांगल्या प्रकारच्या वस्तु,पदार्थ तयार करावे व केवळ ५ दिवसांच्या विक्री व प्रदर्शनीवर न थांबता वर्षभर विविध वस्तुंच्या विक्रीद्वारे आर्थिक नियोजनावर भर देण्याचेही त्यांनी सांगितले. सकाळी ११ ते रात्री १० पर्यंत सुरु असणाऱ्या या विक्री व प्रदर्शनीत ३५ स्टॉल्स असुन नागरिकांना स्वस्त दरात मुबलक खाद्य पदार्थ व वस्तु घेता येणार आहे. यात दिवाळी सणानिमित्त महिला बचत गटांनी तयार केलेले चकली, चिवडा, लोणचे, फराळी वस्तूंचा आस्वाद घेता येणार आहे तसेच कापडी बॅग, दिवे, मातीच्या वस्तु अश्या अनेक वस्तुही विक्रीस राहणार आहेत. सदर विक्री व प्रदर्शनी ३ ते ७ नोव्हेंबर पर्यंत असल्याने नागरिकांना भेट देण्यास ५ दिवस मिळणार आहे. तसेच सकाळी ११ ते रात्री १० पर्यंत सुरु असल्याने सर्व वयोगटाच्या व्यक्तींना भेट देता येणार आहे. शहरातील नागरिकांनी महिला स्वयंसाह्य बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुंची खरेदी करून बचत गटातील महिलांना व्यवसाय करण्याकरिता हातभार लावावा तसेच बचतगटांनी तयार केलेल्या चविष्ट व्यंजनांचा आस्वाद घेण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

याप्रसंगी उपायुक्त मंगेश खवले, सहायक आयुक्त सचिन माकोडे, विधी विभाग प्रमुख अनिलकुमार घुले, शहर अभियान व्यवस्थापक रफीक शेख, रोशनी तपासे, चिंतेश्वर मेश्राम,खडसे, लोणारे, मुन, करमरकर उपस्थीत होते.





# सर्वसामान्य कुटुंबातून उदयास आलेले प्रेरणादायी नेतृत्व मनोज जरांगे पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**लोणीखुर्द :** येथे सर्कल मधील 22 गावांचे मराठा आरक्षणासाठी गेल्या दहा दिवसांपासून साखळी उपोषण सुरु होते. आज या उपोषणाची सांगता महाराज जैन यांच्या कीर्तनाने झाली. यावेळेस अर्चना पाटील साळुंके यांचे अमरण उपोषण तहसीलदार के.के.कुलकर्णी जैन महाराज यांच्या हस्ते सोडण्यात आले.

यावेळेस बोलतांना महाराज म्हणाले कित्येक वर्षांपासूनचा आरक्षणासाठीचा लढा आहे. कित्येक मराठा मुख्यमंत्री झाले. आमदार झाले. पण मराठा समाजाला आरक्षण देण्याची त्यांची भावना कधीच राहिली नाही. मनोज जरांगेंसारखं निस्वार्थ निष्काम कर्मयोगी नेतृत्व मराठा समाजाला आज लाभलंय त्यांच्या पाठिमागे भक्कमपणे उभे रहा, असे आवाहन पारनानाथ महाराज जैन यांनी केले. यावेळी संदिप पाटिल औताडे, दिपक पवार, अजय पाटील साळुंके आतुल निकम प्रमोद जिवरग नंदु जाधव नितिन जाधव यांनी मराठा आरक्षण याविषयावर व्याख्यान झाले. यावेळेस लोणीखुर्द येथील मराठ आरक्षण समन्वय समितीच्या वतीने सांगण्यात आले की जरांगे पाटील यांनी दिलेल्या मुदतीत आरक्षण देण्यात येत नाहीत तोपर्यंत लोणीखुर्द परिसरातील 22 गावातील सकल मराठा समाजबांधवांनी पाठिंबा दिला आहे. जोपर्यंत मराठा आरक्षणमिळत नाही तोपर्यंत राजकीय नेत्यांना गावात प्रवेश बंदी करत गावातील सर्व निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय सकल मराठा समाजाच्या वतीने साखळी उपोषण सुरू आहे. त्याला पाठिंबा असल्याचे लोणीखुर्द परिसरातील भागातील सकल मराठा समाजाच्या वतीने सांगण्यात आले.त्यानंतर मसठा आरक्षण मिळावे म्हणून समाजासाठी बलिदान दिलेल्या विरांना तसेच बाबा महाराज सातारकर यांना श्रध्दांजली वाहुन राष्ट्रीगीताने सांगता करण्यात आली.

**सगळ्याच पक्षांनी मराठ्यांवर अन्याय केला . अजय पाटील साळुंके**
75 वर्षांपासून सगळ्याच पक्षांनी मराठ्यांवर अन्याय केला . त्यामुळे आता कोणत्याच पक्षावर मराठ्यांचा विश्वास राहिलेला नाही . त्यामुळे आता तारखांमागे तारखा दिल्या, सरकाने दिरंगाई करुन समाजाची दिशाभूल केली तर होणार्या उद्रेकाला सामोर जाण्याची तयारी सरकाने ठेवाव असं अजय साळुंके म्हणाले

**मनोज जरांगे पाटील आश्वासक चेहरा दिसतोय . संदिप औताडे**
कित्येक वर्षांपासूनचा आमचा आरक्षणासाठीचा लढा आहे . कित्येक मराठा मुख्यमंत्री झाले . आमदार झाले . पण मराठा समाजाला आरक्षण देण्याची त्यांची भावना कधीच राहिली नाही . मनोज जरांगेंसारखं निस्वार्थ नेतृत्व मराठा समाजाला आज लाभलंय . आज आमच्या मराठा समाजाला तेवढा एकच आश्वासक चेहरा दिसतोय ."

**मराठा आरक्षणासाठी कुणीही आत्महत्या करू नका . .दिपक पवार**
मराठा आरक्षणाची लढाई आता अंतिम टप्प्यात आली असून कुठल्याही मराठा बांधवांनी आत्महत्या करू नये असे आवाहन दिपक पवार यांनी लोणी खुर्द येथे साखळी उपोषणाच्या वेळी बोलतांनी सांगीतले .

# ४६ हजार २३५ विद्यार्थ्यांची शासन दरबारी नोंदच नाही

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** जिल्ह्यात जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिकेसह खासगी प्राथमिक शाळांमध्ये ४ लाख ३८ हजार ९७६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. परंतु यातील सुमारे ४६ हजार २३५ विद्यार्थ्यांची शासन दरबारी विद्यार्थी म्हणून नोंदच नसल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या विद्यार्थ्यांवर शासकीय योजनांपासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. आधारकार्डविना नोंदणी झाली नसल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे. शिक्षण विभागाने ही नोंदणी करून घेणे आवश्यक असताना संचमान्यतेमध्ये या विद्यार्थ्यांचा समावेशच करण्यात आलेला नाही. शिक्षक बदल्यांपासून ते शाळा व विद्यार्थ्यांची संख्या ऑनलाईन करण्यात आली आहे. शिक्षक पद निर्धारणासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी शासनाकडून केली जाते. विद्यार्थ्यांना अनेक शासकीय योजनांचादेखील लाभ दिल्या जातो. परंतु त्याकरीता संबधित विद्यार्थ्यांची शासनदरबारी नोंद असणे गरजेचे आहे. संच मान्यतेकरीता शासनाकडून विद्यार्थ्यांचे आधारकार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. अशातच जिल्ह्यात काही विद्यार्थ्यांचे आधारकार्ड नसणे, ते लिंक न होणे, तर अद्यापही काही शाळांनी विद्यार्थ्यांच्या आधारची नोंदच घेतली नाही, असे विद्यार्थी संचमान्यतेमधून वगळण्यात आले आहेत. म्हणजेच ते विद्यार्थी असूनदेखील त्यांची नोंद शासनदरबारी नाही. एकीकडे शाळाबाह्य विद्यार्थी शोधण्याची मोहीम राबविली जात असताना दुसरीकडे शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची नोंदच घेतल्या जात नसल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.

Contoura Vision
चष्मा नको ?
चष्मा घालवा कायमचा.
डॉ.कांकरिया यांचे
साई सूर्य नेत्रसेवा,अहमदनगर तर्फे
लेसर नेत्र शस्त्रक्रिया शिबीर
'कॉन्टूरा व्हिजन' जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञान
मोतीबिंदू ,काचबिंदू , तिरळेपणावर उपचार
दि.१९ नोव्हें.२३, हॉटेल रविराज,बाबा पेट्रोल पंपाजवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)-(सकाळी १० ते १२),
दि.२५ नोव्हे.२३, हॉटेल अन्विता, बीड (सकाळी १० ते १२),
दि.२५ नोव्हे.२३, हॉटेल पार्थ, लातूर (दुपारी ४ ते ६).
विशेष सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया केल्या जातील. नोंदणी फिस रु.१००
9112288611
8888982222

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बँक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

CAFÉ ROCKSTARZ EAT . CHILL . REPEAT
11:11 ELEVEN ELEVEN
Where Dishes come true..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# भारत-श्रीलंका : भक्कम आर्थिक सहकार्याचा नवा रामसेतू



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**श्रीलंका या शब्दाचा अर्थ समृध्द किंवा संपन्न भूमी असा होतो. परंतू रावणाने उभारलेली हरी सोन्याची लंका आता उध्वस्त होत आहे. येथील लोकांचे जीवन संपन्न व सुखी करण्यासाठी भारताने पुढाकार घेतला आहे.भारत हा श्रीलंकेचा सर्वात जवळचा मित्र आहे. आमचे भाग्य एकमेंकाशीजोडले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सुत्र आहे, त्यानुसार विकासाच्या प्रत्येक क्षेत्रात भारत-श्रीलंकेला भरघोस आर्थिक सहाय्य करत आहे. अर्थमंत्री यांचा श्रीलंका दौरा या सुत्राचा एक भाग होय.**


भारत आणि श्रीलंका या दोन शेजारी राष्ट्रांमध्ये प्राचीन काळापासून सांस्कृतीक सहकार्याचे भक्कम शेतू उभारण्यात आले होते. प्रभू रामचंद्राने सितेचा शोध घेतांना पहिला राम शेतू उभारला होता. हे आता अमेरीकेतील नासा या अंतराळ संस्थेने केलेल्या सादरी छायाचीत्रामुळे सिध्द झाले आहे. 1 नोव्हेंबर रोजी भारताचे अर्थमंत्री श्रीमती निर्मला सितारामन यांनी श्रीलंकेला दोन दिवसाची भेट दिली. या शिखर परिषदेमध्ये भारत – श्रीलंका आर्थिक सहकार्याचा नवा शेतू उभारण्यात आला आहे. दोनशे वर्षापुर्वी तमीळ लोकांनी श्रीलंकेत प्रवेश केला. त्यांची दोनशे वर्षे साजरी होत आहे. या निमीत्ताने श्रीलंकेतील सर्व धार्मीक स्थळावर श्रीलंकेतील बौध्द, हिंदू अशा सर्व धार्मीक स्थळावर सौर ऊर्जा प्रकल्प उभा राहण्याच्या प्रकल्पाचा प्रारंभ करण्यात आला आहे. शिवाय पडत्या काळात श्रीलंकेला भक्कम आर्थिक सहकार्य करण्याच्या नव्या योजनाही आखण्यात आल्या आहेत.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :** भारत- श्रीलंका दरम्यानआजचे द्विपक्षीय मैत्रीपूर्ण संबंध हे प्राचीन काळापासून अस्तित्त्वात आहेत. रामायण काळापासून हे संबंध तेथील प्राचीन अवशेष व पुरातत्वीय साधनाच्या आधारे स्पष्ट होतात. शिवाय सम्राट अशोकाच्या काळात त्यांचे पुत्र महेंद्र आणि संघमित्रा यांनी श्रीलंकेला भेट देवून तेथील बोधी वृक्ष्राचे रोपटे लावण्यात आले. बौध्द धर्माच्या प्रसारास दमदार पाऊल टाकले. पारंपारिक दृष्टिने बौध्द धर्माचा श्रीलंकेत प्रसार राजा देवानाम प्रिया किस्सा यांच्या कारकीर्दीत, सम्राट अशोकाच्या काळात इ. स. पुर्व 4 थ्या शतकात बौध्द धर्माचे पाऊल टाकले. या काळात अनेक बौध्द स्तूप, विहार व चैत्यालये स्थापन करण्यात आली. यापैकी ईसुरमुनी विहार आणि वेसगिरी विहार हे आजही बौध्द अवशेषांची आठवण करून देतात. श्रीलंकेतील बौध्द स्थापत्याचा व त्यावर पडलेल्या भारताच्या प्रभावाचा पुरातत्त्वीय अभ्यास केला पाहिजे. त्यामुळे अनेक पाली ग्रंथ तसेच मौखिक परंपरा यांचा नव्याने शोध घेता येईल. श्रीलंकेला भारतानंतर सर्वात प्राचीन प्रदीर्घ आणि अखंड असा बौध्द धर्माचा सांस्कृतिक विकास आहे. चवथ्या शतकामध्ये बौध्द विचार श्रीलंकेत पोहोचला. तेथील धर्मग्रंथ, तसेच मठांची रचना संघाची संपर्क व्यवस्था याबाबतीत नव्याने अभ्यास करण्याची गरज आहे. 2600 वर्षापासून आखलेल्या श्रीलंका– भारत सांस्कृतीक भारताचे नवे आकलन करण्यात आले. दोनशे वर्षापासून श्रीलंकेतील सिंहली बौध्द लोकांसमवेत भारतीय तमिळ लोकही गुण्यागोविंदाने राहत आहेत. श्रीलंकेच्या राष्ट्रीय उभारणीत तमिळ लोकांचाही मोठा वाटा आहेत. त्याला दोनशे वर्ष पुर्ण होत आहेत. 1980 च्या दशकात तमीळ वाघ आणि स्थानिक लोक यांच्यात गृहयुध्द झाले. तेव्हा भारताने थोरल्या भावाची भूमीका घेवून हस्तक्षेप केला आणि शांतता प्रस्थापित केली. राजीव गांधी व प्रेमदासा यांच्यातील करार हा या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल म्हटले पाहिजे.

हिंद प्रशांत क्षेत्रातील चीनच्या वाढत्या हालचालींना प्रतिशह देण्यासाठी भारताने श्रीलंकेबरोबरचे सुरपक्षा संबंध मजबुत केले आहे . भारताने नौदल प्रशिक्षण करार केला आहे. तसेच अणुउर्जा करारावर सहया करण्यात आलेल्या आहेत.

श्रीलंकेच्या भावी सर्वांगीण विकासासाठीभारताने पुढाकार घेतला आहे आणि चीनला प्रतीशह दिला आहे. त्यानंतर कोविड- 19 साथीने धुमाकुळ घातला भारताने मानवतावादी दृष्टीने भरघोस सहकार्य केले तेथील अडचणी लक्षात घेउन भारताने 3.8 अब्ज युएस डॉलरची मदत केली. शेजारी प्रथम या धोरणानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी श्रीलंकेत अनेक प्रकल्प राबविले. भारताच्या एक्सिम बँक आणि स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी अत्यावश्यक वस्तुच्या आयातीसाठी 1.5 अब्ज डॉलरच्या निर्यात कर्ज पुरविण्यात आले. भारताने श्रीलंकेला परकीय चलन साठा सुधारण्यासाठी मदत केली. त्यामध्ये त्याची दसलक्ष डॉलर मदतीच्या करारावर सह्या करण्यात आल्या. भारताने श्रीलंकेच्या परिवहन विभागाला 500 अत्याधुनिक बस सेवापुरविल्या आहेत. कोविड-19 महामारीच्या काळात निशेष अनुदान सहाय्य म्हणून 500,000 पुरवठा केला. साथीच्या रोगाच्या तीसऱ्या लाटेचा सामना करण्यासाठी श्रीलंकेला 150 टन ऑक्सीजन मोफत पाठवण्यात आला. जुलै -2023 मध्ये श्रीलंकेचे अध्यक्ष रानील विक्रमसिंगजी यांना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विशेष भेट घेतली. तेव्हा सागरी सुरक्षा व विकास, जलवायु संवर्धन, सागरी सौरउर्जा व अणुउर्जा तसेच संगणक नेटवर्क सेवा बळकट करण्यासाठी नवे करार करण्यात आले. पर्यटन क्षेत्रालाही चालना देण्यात आली. पंतप्रधानयांच्या भेटी दरम्यान जे संकल्प करण्यात आले होते, त्याचा आढावा घेऊन त्या सर्व क्षेत्रात नव्याने प्रगतीच्या नव्या दिशा शोधणे. निर्मला सितारमन यांच्या श्रीलंका दौऱ्यामुळे शक्य होत आहे. उभय राष्ट्रातील सहकार्याची नवी क्षेत्रे त्यामुळे उजेडात आली आहेत. मंदीच्या फटक्यामुळे हैरान झालेल्या श्रीलंकेला आर्थिक भागीदारीची गरज आहे. चीनी ड्रगनपासून श्रीलंकेला दूर ठेवण्यासाठी भारत श्रीलंकेला उर्जा, व्यापार, उच्च शिक्षण, व कौशल्य विकास या क्षेत्रात भरघोस सहाय्य करत आहे तसेच वीज, ग्रीड जोडण्यासाठी आणि पेट्रोलीयन पाईप टाकण्यासाठी पूल बांधण्याची जी व्यवहार्यता तपासून पाहिली जात आहे. परस्पर व आर्थिक व सहकार्य मुक्त व खुला व्यापार यासाठी पुन्हा नव्याने वाटाघाटी करण्यास या दौऱ्यामुळे नवा उजाळा मिळत आहे. भविष्यकाळात परस्पर सहकार्याच्या अनेक नवीन योजना त्यामुळे दृष्टीपठात येत आहे.

**श्रीलंकेची भावी वाटचाल :**
श्रीलंकेची भावी वाटचाल कशी असणार आहे. अंधारातून प्रकाशाकडे जाण्यासाठी भारताची कशी मदत होईल. याचा विचार करणे आवश्यक आहे. युरोपीयन वसाहतवाद्याच्या अस्तानंतर श्रीलंका हे स्वतंत्र राष्ट.बनले. परंतू त्याला अनेक संकटाला सामोरे जावे लागले. प्राचीनकाळी श्रीलंकेवर एका सम्राटाचे किंवा अनेक राज्याचे वर्चस्व होते. तसेच प्राचीन काळात दक्षीण भारतातील चोल, पांडय ईत्यादी घराणे आक्रमण करून आपले वर्चस्व




स्थापन करत असत. पारंपारीक श्रीलंकेचा इतिहास हा संघर्ष व युध्दाने भरलेला होता. परंतू बौध्द धर्माच्या प्रभावमुळे चौथ्या शतकानंतर अशोकाच्या धम्म कल्पनेच्या प्रभावाकडून श्रीलंकेस शांतता व सौख्य लाभले. पुढे श्रीलंकेतून थायलंड व ब्रम्हदेशात सुध्दा बौध्द धर्माचा प्रसार झाला आणि श्रीलंका हे महायान बौध्द धर्माचे केंद्र बनले. तेथे बौध्द कला व स्थापत्यांचा विलक्षण प्रभाव पडला. त्यातून समृध्द संस्कृतीक जीवन आकारास आले. एकोणिसाव्या शतकात बौध्द धर्मात काळानूरूप बदल झाले. परंतू 2000 वर्षापासून श्रीलंकेने बौध्द परंपरा टिकवून ठेवली आहे. अरब बौध्द धर्माची जन्मभूमी असल्यामूळे अरब–श्रीलंका संबंध हे संस्कृतीक पायावर भक्कमपणे आधारलेले आहेत. तेथील लोकसंख्येपैकी 75 टक्के लोक सिंहली बौध्द आहेत. ते भारतीय वंशाचे असून इ. स. पू. 543-246 या काळात भारतातून त्यांनी श्रीलंकेच्या बेटावर स्थलांतर केले. पुढे सामान्य लोकसुध्दा राहू लागले ज्यांचे प्रमाण 25 टक्के आहे. काही परंपरा 2000 वर्षापासून श्रीलंकेत द्रवीड लोकांची वस्ती होती असे मानतात. संपल्यानंतर गेल्या दोन दशकापासून टेहली व तामीळ लोकांचे संबंध सुधारले आहेत.अर्थमंत्री निर्मला सितारामन यांची श्रीलंका भेट महत्त्वाची ठरते.

**आर्थिक सहकार्याचा पाया :** भारत- श्रीलंका संबंधाचा आर्थिक सहकार्यहा पाया आहे. श्रीलंका SAARK तसेच BINSTECया संघटनांचा सदस्य आहे. अलीकडे परराष्ट्रमंत्री जे. शंकर यांनी श्रीलंकेला सिंध प्रशांत संघटनेचे अध्यक्ष हे पद दिले आहे. आणि भारत उपाध्यक्ष आहे.भारत- श्रीलंका व्यापार 2004 पर्यंत 12 टक्केनी वाढला आणि 2006 पर्यंत चौपट झाला आहे. म्हणजे 2.6 अब्ज अमेरीकन डॉलरपर्यंत पोहोचला आहे. 2004 मध्ये भारताची श्रीलंकेत होणारी निर्यात 11.3 टक्केनी वाढली आहे. म्हणजे ती 6.18 दसलक्ष वरून 1319 दसलक्ष पर्यंत वाढली आहे. ही वाढ 342 टक्केनी जास्त आहे. 44 लसलक्ष वरून 194 दसलक्ष पर्यंत निर्यात वाढली आहे. श्रीलंकेच्या जागतीक आयातीमध्ये भारताच्या निर्यातीचा वाटा 14 टक्के आहे. श्रीलंकेच्या मालासाठी भारत हे पाचवे सर्वात मोठे निर्यात गंतव्य आहे. ही निर्यात 3.6 टक्के आहे. आता दोन्ही राष्ट्रे आयात-निर्यात वाढवून दक्षिण आशियाई मुक्त व्यापार करार चालना देण्याचा प्रयत्न करत आहे असा करार झाला तर मजबूत व्यावसायीक संबंध तयार होतील. असा मुक्त व्यापारी श्रीलंकेतील कॉर्पोरेट उद्योगात गुंतवणूक वाढविण्यासाठी उपयुक्त ठरेल. 2010 या वर्षात पहिल्या 7 महिन्यात भारतातील निर्यातीत 4.5 टक्कयांनी वाढ झालेली आहे. भारताने NATIONAL THERMAL POWER CORPORATION रामपूर मध्ये स्थापन करून 500 मेगा वॅट औष्णीक उर्जा निर्मिती प्रकल्प स्थापन करण्यास गती दिली आहे. ही योजना कृतीत आल्यास भारत-श्रीलंका संबंध नव्या उंचीवर पोहोचतील. भारत श्रीलंकेचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. उभय देशातील संबंध सुधारल्यामुळे निर्यातवाढीस उत्तेजन मिळत आहे तसेच श्रीलंकेच्या आर्थीक पुनरुत्थानात नवीन गती लाभत आहे.

**समारोप :** असे मासेमारीचा वाद अद्याप मिटला आहे. दोन्ही देशांचा विकास सहकार्यावर भर आहे. श्रीलंकेच्या सर्वांगीण विकासासाठी भारत मदत करीत आहे. सुमारे एकशष्टांश कर्ज भारताने दिले आहे. भांडवली वस्तु, ग्राहोपयोगी वस्तू सल्लागार सेवा, खाद्यपदार्थ व गव्हाचा पुरवठा पेट्रोलियम खरेदीसाठी खर्च यामुळे भारताने श्रीलंकेच्या मनात विश्वास तयार केला आहे. किंवा कोलंबो मातारा रेल्वेच्या बांधणीसाठी 100 दसलक्ष डॉलर कर्ज देवू केले आहे. भारत अनेक विकास प्रकल्प राबवत आहे. भारताचे श्रीलंकेला बजेट 28.2 कोटीने वाढलेले आहे. तसेच लघूउद्योग प्रकल्प माफीमारांना प्रगत उपकरणे ग्रामीण शहरांना सौरउर्जा प्रकल्प संगणक शिक्षण हे प्रकल्प भारताच्या वतीने राबविले जात आहेत. हंबनतोफा व पेट्रोल येथेआधुनिक रुग्णवाहिका 1500 लोकांसाठी मोतीबिंदू शस्त्रक्रिया कार्यक्रम राबवला आहे. आणि शस्त्रक्रिया केंद्र आधुनिक बनवण्यासाठी सहाय्य केले आहे. बिकोया येथे 50 खाटाचे रूग्णालय बांधण्यात आले. विनकोमानी येथे रुग्णालयाचे आधूनिकीकरण करण्यात आले कोलंबो येथे अद्वयावत कर्करोग रुग्णालय उभारण्यासाठी 7.5 लक्ष डॉलरचे अनूदान दिले. शेत कामगारांना शिष्यवृत्ती देण्यात आली. नवी योजना आखण्यात आली. 465 पोलीस अधीकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी दरवर्षी उच्च पोलीस अधिकाऱ्याना प्रशिक्षण देण्यात येत आहे. दोन्ही देशातील धार्मीक पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. सामाजिक पर्यटन उद्योगाला गती देण्यासाठी विविध प्रयत्न केले जात आहेत. भारतातून क्वचित कोलंबो दरम्यान क्रुजसेवा प्रुव्ह करण्यासाठी विचार चालू आहे. पर्यटकांना कमी खर्चात अधिक चांगली सेवा देण्याचा दोन्ही देशाचा प्रयत्न आहे. प्रक्षा क्षेत्रामध्ये दोन्ही देश परस्पारांना सहकार्य करत आहेत. चीनच्या वाढत्या दबावाला प्रतीशह देण्साठी भारत श्रीलकेला विविध आर्थीक सहकार्य करत आहेत.

परराष्ट्र मंत्री जे. शंकर यांनी म्हटल्याप्रमाणे भारत श्रीलंकेच्या विकासात सक्रीय भागीदार असून प्रत्येक क्षेत्रात भरघोस सहकार्य करतो. भारत हा पुढे गेला आहे. भारत आणि श्रीलंका दरम्यान जमीनीवर सागरमार्गे नवा पुल बांधण्याचा विचार संकल्प करण्यात आला आहे. हे एक मैत्री व सहकार्याचे नवे युग म्हटले पाहिजे.

# हॅप्पी बर्थडे किंग कोहली !



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**क्रिकेटचा किंग, चेस मास्टर, विक्रमवीर, रन मशिन यासारखी अनेक बिरुदावली ज्याच्या नावापुढे लागली आहेत तो भारताचाच नव्हे तर जगातील सर्वोत्तम फलंदाज, भारताचा कोहिनूर विराट कोहलीचा आज ३५ वा वाढदिवस. किंग कोहलीला वाढदिवसाच्या सर्वप्रथम हार्दिक शुभेच्छा! क्रिकेट या खेळाने जगाला अनेक महान खेळाडू दिले. सचिन तेंडुलकर हा त्यापैकीच एक महान खेळाडू. क्रिकेटमधील दैदिप्यमान कामगिरीने तो क्रिकेटचा देव बनला. जवळपास दोन तप त्याने क्रिकेटवर अधिराज्य गाजवले.**

भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले. २०१३ साली त्याने निवृत्ती स्वीकारली. निवृत्ती स्वीकारण्यापूर्वी त्याने विक्रमांचे एव्हरेस्ट गाठले. तो निवृत्त झाल्यावर त्याच्या इतक्या क्षमतेचा खेळाडू पुन्हा भारताला मिळेल का ? असाच प्रश्न संपूर्ण क्रिकेट विश्वाला पडला होता. ज्या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नव्हते त्या प्रश्नाचे उत्तर खुद्द सचिनकडे होते. सचिनला जेंव्हा प्रश्न विचारण्यात आले की तुझा विश्वविक्रम कोणता खेळाडू मोडेल असे तुला वाटते तेंव्हा त्याने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिले 'विराट कोहली' सर्वांना त्यावेळी ही अतिशोक्ती वाटली पण सचिनने विराटची गुणवत्ता हेरली होती. निवृत्त होण्यापूर्वी चार पाच वर्ष तो आणि विराट एकत्र खेळले होते त्यामुळे विराट कोणत्या क्षमतेचा खेळाडू आहे आणि तो काय करू शकतो हे सचिनला माहीत होते त्यामुळेच सचिनने आपला वारसदार म्हणून विराटची निवड केली होती. विराटने सचिनचे म्हणणे अवघ्या दहा वर्षात खरे करून दाखवले आणि सचिनचा विश्वास सार्थ ठरविला. आज विराट देखील सचिन प्रमाणे विक्रमांचे इमले चढत आहेत इतकेच नाही तर सचिनचे अनेक विक्रम त्याच्या दृष्टिक्षेपात आले आहेत. सचिनच्या एकदिवसीय शतकांच्या विक्रमाची बरोबरी करण्यासाठी त्याला अवघ्या एका शतकाची गरज आहे. कदाचित आज तो हा विक्रम करून आपला वाढदिवस साजरा करू शकतो. केवळ एकदिवसीयच नव्हे तर सचिनच्या १०० शतकांचा विक्रमही विराट लवकरच आपल्या



नावे करेल यात शंका नाही कारण आज त्याच्या नावे ७८ शतके आहेत. कसोटीत त्याने २९ शतके झळकावली आहेत तर एकदिवसीय सामन्यात ४८ शतके त्याच्या नावावर आहेत. टी २० सामन्यातही त्याचे एक शतक आहे. आज तो ३५ वर्षाचा होत आहे. त्याचा फिटनेस जबरदस्त आहे. वीस वर्षाचा खेळाडू देखील त्याच्यासमोर फिका पडेल असा त्याचा फिटनेस आहे त्यामुळे तो आणखी चार - पाच वर्ष सहज खेळू शकतो. त्यामुळे तो हा विक्रम सहज मोडेल. विशेष म्हणजे त्याच्या जवळपास जगातील दुसरा कोणताच खेळाडू नाही. विराट केवळ विक्रमवीर नाही तर तो आज जगातला महान फलंदाज बनला आहे. उत्तम खेळाडू ते महान खेळाडू बनण्यापर्यंतचा त्याचा प्रवास अचंबित करणारा आहे. अवघ्या दहा वर्षात तो आज जगातला महान खेळाडू बनला आहे. त्याने धावांची टांकसाळ उभारली आहे. प्रत्येक सामन्यात तो खोऱ्याने धावा काढत आहे. त्याची बॅट म्हणजे जणू धावांची मशिन, त्याच्या बॅट मधून धावांची बरसात होत आहे म्हणूनच आकाश चोप्रा त्याला विराट द रन मशिन कोहली असे म्हणतो. त्याने काढलेल्या शतकांपैकी ९५ टक्के शतके भारताच्या विजयास कारणीभूत ठरली आहेत यावरून त्याच्या शतकांचे मोल लक्षात येते. धावांचा पाठलाग करताना तर त्याने सर्वाधिक शतके झळकावली आहेत म्हणूनच त्याला चेस मास्टर असेही म्हंटले जाते. विराटने शतक झळकावले म्हणजे भारत विजयी झाला असेच समीकरण बनले आहे. केवळ शतकच नव्हे तर त्याच्या अनेक छोट्या मोठ्या खेळी भारताला विजय मिळवून देणाऱ्या ठरल्या. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले आहेत. मागील वर्षी झालेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेतील पाकिस्तान विरुद्धचा सामना आठवा. आपण तो सामना केवळ विराटमुळे जिंकू शकलो. हातातून गेलेला सामना त्याने ज्याप्रकारे खेचून आणला ते पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. तशी खेळी फक्त आणि फक्त विराटच खेळू शकतो ती खेळी म्हणजे फक्त एक उदाहरण आहे. तशा प्रकारच्या अनेक खेळी करून त्याने भारताला अनेक अशक्यप्राय विजय मिळवून दिले आहेत. कठीण समय येता विराट कामी येई.... असे उगीच क्रिकेटप्रेमी म्हणत नाहीत. आता त्याने भारताला विश्वचषक मिळवून द्यावा अशीच क्रिकेटप्रेमींची त्याच्याकडून अपेक्षा आहे. तो या विश्वचषकात तुफान फॉर्मात देखील आहे. भारताकडून सर्वाधिक धावा देखील त्यानेच काढल्या आहेत. आता उपांत्य आणि अंतिम फेरीत त्याने अशीच अविश्वसनीय खेळी करून भारताला विश्वविजयी करावे आणि क्रिकेटप्रेमींची दिवाळी गोड करावी हीच त्याच्याकडून देशातील १४० कोटी जनतेची अपेक्षा आहे.

# श्रवण



कविता शिंगणे गायधनी
संपर्क क्र. 7588181500

आधुनिक केसरी


**या संसार चक्रात जगताना माणसाला अंतर्बाह्य झगडावे लागते. यात झगडण्यात तरुन जाण्यासाठी भगवंताने हा देह बनवताना माणसाला काही शक्ती आतून दिल्या तर काही शक्ती बाहेरून दिल्या आहेत. ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, तरी बुद्धी आणि मन चित्त, अहंकार हन हे चतुर्विध चिन्ह अंतःकरणाचे अर्थात बुद्धी, मन, चित्त आणि अहंकार हे अंतकरणाचे चतुर्वेद चिन्ह आहेत. अर्थातच जगताना ह्या चिन्हांचा आपण पुरेपूर वापर करत असतो तसेच बाह्य त्वचा श्रवण । चक्षु रसना घ्राण । हें पंचविध जाण । इंद्रियें गा ॥ ४९९ ॥ (अंत:करणाच्या बाहेर) त्वचा, कान, डोळे, जिव्हा व नाक ही पाच प्रकारची ज्ञानेंद्रिये आहेत, असे समज. ॥१८-४९९॥ भगवंताने इतकी मोठी शक्ती आपल्याला दिल्यानंतर आपण त्या शक्तीचा योग्य वापर करत नाही. आणि हे दिलेले दान आपणास कोणी दिले आहे .याची जाणीवही ठेवत नाही म्हणून संत शिरोमणी नामदेव महाराज म्हणतात,**

**शब्दांचे सुख श्रवणाचेनि द्वारे । माझिया दातारें ऐसें केलें ॥१ ॥**
**स्पर्शाचे सुख, त्वचेचेनि द्वारे । माझिया दातारें ऐसें केलें ॥२ ॥**
**रूपाचे सुख नेत्राचेनि द्वारे । माझिया दातारे ऐसें केलें ॥ ३ ॥**
**रसाचे ते सुख रसनेचेनि द्वारे । माझिया दातारे ऐसें केलें ।। ४ ।।**
**गंधाचें सुख नाकाचेनि द्वारे । माझिया दातारें ऐसें केलें ॥ ५ ॥**
**नामा म्हणे ऐसें जयाचे उपकार । तयासी गव्हार विसरले ॥६ ॥"**

आपण अगदी पहिल्या ओळी पासून सुरुवात करू ते म्हणजे शब्दांचे सुख श्रवणाचेनि द्वारे माझी या दातारे ऐसे केले... श्रवण... श्रवण म्हणजे कान अर्थात कानाद्वारे ऐकू येणारा शब्द.... असंख्य शब्द आपण ऐकत असतो. त्यात चांगले वाईट सर्वच ऐकत असतो. पण ह्या शब्दांचे सुख आपण श्रवणाद्वारे घेतो. मग काय श्रवण करावे हे सगळ्यात महत्त्वाचे. ज्ञानेश्वर माऊली पहिल्याच अध्यायात सांगतात त्र्यलोक्यामध्ये जे जे पूजनीय आहे त्यात गीता भगवद्गीता अग्रभागी आहे म्हणून भक्तांनी ते श्रवण सुख लुटावे. समर्थ रामदास स्वामी म्हणतात,

**श्रोते पुसती कोण ग्रंथ | काय बोलिलें जी येथ | श्रवण केलियानें प्राप्त | काय आहे||१||** हा कोणता ग्रंथ आहे? याचे नाव काय? यात प्रामुख्याने काय सांगितले आहे? हा ग्रंथ ऐकून मला काय मिळणार आहे? लगेच पुढच्याच ओवीत समर्थ या प्रश्नाचे उत्तर देतात, **ग्रन्था नाम दासबोध | गुरुशिष्यांचा संवाद | येथ बोलिला विशद | भक्तिमार्ग ||२|| अर्थात भक्ती मार्ग समजण्यासाठी तो आधी ऐकायला हवा म्हणजेच श्रवण करायला हवा.** नवविधा भक्तीमध्ये श्रवण भक्ती ही पहिली भक्ती सांगितली आहे.

**श्रवणं कीर्तनं विष्णोः हो स्मरणं पादसेवनम्। अर्चनं वंदन दास्य सख्यमात्मनिवेदनम् ॥ ७/५/२३** जन्मानंतर अगदी बोलणे, चालणे याही आधी श्रवण सुरू होते. अगदी जन्मवेळच्या नऊ महिने आधीपासून श्रवण चालू असते. आईचे स्पंदन बाळाच्या हृदयाशी निगडित असते. बाळ आईच्या स्पंदनाने जन्मानंतर आईला लगेच ओळखू शकते. हे स्पंदन तो ऐकूनच शिकलेला असतो. आई जे काही बोलते जो काही विचार करते ते ऐकूनच बाळ मोठे होत जाते. म्हणून इतके महत्त्वाचे इंद्रिय श्रवण हे आपल्याला सांभाळून ठेवायला हवे त्याचा योग्य वापर करायला हवा.. पण समाजात काही माणसं अशी असतात की जी प्रत्येक



गोष्टीत काहीतरी वाईट शोधत असतात. जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात

**कुचराचे श्रवण । गुणदोषांवरि मन ॥१ ॥**
**असोनियां नसे कथे । मूर्ख अभागी ते तेथे ॥२ ॥**

अर्थात कुचर श्रोत्यांचे मन वक्त्याच्या गुणदोषांकडे असते अशा प्रकारचे मूर्ख अभागी श्रोते ज्या कथेमध्ये असून नसल्यासारखेच असतात. अर्थात देह बुद्धीमुळे ते हितशून्य झालेले असल्याने त्यांचे वाटोळेच होते. गुड लिसनर अशी एक संज्ञा इंग्लिश मध्ये प्रचलित आहे अर्थात जो मनुष्य स्वतःचेच घोडे पुढे न दामटता दुसऱ्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतो. तो गुड लिसनर असतो हेही श्रवण यासाठी अत्यंत गरजेचे असते. एक दृष्टांत सांगते एका शाळेत शिक्षणाधिकारी जातात ते मुलांना प्रश्न विचारत असतात. टेबलवर काही फळे ठेवलेली असतात. त्यात पेरू असतात. चार पेरू ते सगळ्या मुलांना दाखवतात आणि एका मुलाला उभं करून विचारतात एकूण किती पेरू आहेत...? त्यांच्या हातात पेरू असतात चार आणि उभा राहिलेला मुलगा सतत सांगत असतो पाच पेरू आहेत. पाच पेरू आहेत .ते विविध पद्धतीने त्याच्याकडून उत्तर जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. पण तो पाचच्या पलीकडे जात नाही .तेव्हा ते चिडतात आणि मुलाला सांगतात एकेक करून मोज. चार पेरू मोजून झाल्यावर तो आपल्या खिशातला एक पेरू काढून देतो आणि सांगतो बघा हे पाच पेरू आहेत. सांगितलेली गोष्ट योग्य पद्धतीने न ऐकल्यामुळे असाही गोंधळ होऊ शकतो. आणि म्हणून श्रवण करताना समजून श्रवण करणे त्यातून कुठलाही गैरसमज न करून घेणे हेही तितकेच महत्त्वाचे असते.

काही चुकीचे श्रवण केल्यामुळे देखील खूप नुकसान होऊ शकते जसे की आपल्याला दशरथ महाराजांची शब्दवेधी कथा माहिती आहे की जे त्यांनी चुकीचे श्रवण केल्यामुळे रामायण घडले. अर्थात जेव्हा श्रावण बाळाने भांड्याने पाणी काढले तेव्हा महाराजांना वाटले तेथे एखादा प्राणी पाणी पीत असावा ते शब्दवेधी होते आवाज आलेल्याच्या दिशेने त्यांनी बाण मारला आणि तो श्रावण बाळास लागला. अर्थात चुकीचे श्रवण करू नये किंवा ऐकलेल्या गोष्टीचे अर्थ समजून श्रवण करावे. असा श्रवणाचा महिमा योग्य श्रोता होऊन तुम्ही योग्य प्रमाणे श्रवण केला म्हणजे श्रवणाचा आनंद घेतला म्हणून मनःपूर्वक धन्यवाद.

# संताच्या नावाखाली पंताचे विचार



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**आज मनोज जरांगे यांच्या मुळे आरक्षणा बद्दल मराठा समाज समोर येऊन छातीठोकपणे आम्ही कुणबी आहोत आणि कुणबी म्हणून आम्हाला आरक्षण पाहिजे असे सांगत आहेत. मनोज जरांगे यांनी आरक्षणा बद्दल सकारात्मक विचार मराठा समाजाच्या डोक्यात टाकले. आरक्षणाचे महत्त्व कळून सर्व काही सोडून मराठा समाज मनोज जरांगे यांच्या सोबत फक्त उभाच राहीला नाही तर जरांगे म्हणतील तीच पूर्व दिशा आहे एवढा विश्वास मनोज जरांगे यांच्यावर टाकला. मनोज जरांगे यांनी जेव्हा मराठ्यांना कुणबीचे प्रमाणपत्र देऊन ओबीसीमध्ये आरक्षण द्यावे अशी मागणी केली परंतु सरकारने ही मागणी मनावर घेतली नाही तेव्हा जरांगे यांनी संविधानीक मार्गाने कलम क्रमांक एकोनीस नुसार शांततेच्या मार्गाने आंदोलन करून सरकारला आपल्या मागणीवर लक्ष केंद्रीत करायला भाग पाडले. जरांगे यांनी जेव्हा जेव्हा आंदोलन केले तेव्हा तेव्हा त्यांनी फक्त मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देऊन आरक्षणाचा प्रश्न मार्गी काढावा एवढेच बोलुन आपली बाजु मांडली.**

त्यांनी कधीच कोणत्याही पक्षावर, राजकीय नेत्यावर वा कोणत्याही समाजावर वैयक्तिक टिका टिप्पणी केली नाही. एखाद्या व्यक्तीने वैयक्तिक आंदोलनाबद्दल मत व्यक्त केले तर तेव्हाच त्याचे वैयक्तिक नाव घेऊन जरांगे यांनी त्याला प्रतित्युर दिले. म्हणजे या आंदोलनामधुन कोणाच्याही वैयक्तिक, राजकीय वा सामाजिक भावना दुखणार नाही याची काळजी जरांगे यांनी घेतली. म्हणुनच जरांगे यांच्या आंदोलनाला सर्व सामाजिक स्थरावरून पाठिंबा मिळायला सुरवात झाली. परंतु जरांगे व जरांगेच्या आंदोलनाला गालबोट लागुन सामाजिक तेढ निर्माण व्हावी या हेतुने सोशल मिडियावर अनेक रिकामटेकडे लोक चुकिच्या पद्धतीने मांडणी करून, विशिष्ट समाजाला टार्गेट करून मराठा आरक्षणाच्या नावाखाली चुकिचे शब्दांचा वापर करत आहेत. अर्थातच जरांगे व त्यांचे समर्थक यांचा व या रिकामटेकड्या लोकांचा काहीच संबध नाही परंतु मराठा आरक्षणाचे नाव घेऊन सामाजिक तेढ निर्माण होईल असे वक्तव्य ते करून सोशल मिडियावर शेअर करत आहेत. मनात येईल ते बरगळून स्वतः ला विद्वान समजणारे स्वतः चे अज्ञान दाखवतात हे त्यांच्या लक्षात येत नाही. बर हे काम करताना एखादा मुद्दा जरी बरोबर मांडला असता तर आपण समजू शकलो असतो. परंतु सर्वच्या सर्वच चुकीचे आणि तेही स्वतः ला कीर्तनकार समजणाऱ्या पोटभरू लोकांनी असे बोलणे म्हणजे त्यांचे वैचारिक व बौद्धिक दारिद्र्याचे प्रदर्शन होय. किर्तनाच्या माध्यमातून समाजात शांतता, समता, बंधुभाव प्रस्थापित करून वैचारिक प्रबोधन करणे ही संताची परंपरा आहे. आहे हे करताना लोकांकडून पैसा गोळा करू नये हि संत तुकाराम महाराज यांची शिकवण आहे. परंतु संताच्या परंपरेला व विचाराला पायदळी तुडवून स्वतः ला किर्तनकार समजणारे लोकच सामाजिक द्वेष पसरवून सामाजिक तेढ निर्माण करत असेल तर यांना किर्तनकार म्हणायचे का? आज किर्तनाच्या नावाखाली केवळ मनोरंजन सुरू आहे तो भाग वेगळा परंतु डोक्यात अज्ञान आणि विषमतेची घाण असलेल्या लोकांचे पालन पोषण करून संरक्षण कोण देते हेही लक्षात घेणे आवश्यक आहे. कवडीचे ज्ञान नसलेले लोक लोकांना चुकीची माहिती देऊन समाजाची दिशाभूल करत आहेत. एक जन म्हणतो आरक्षणामुळे ज्यांनी म्हशी राखायला पाहिजे ते नोकरी करतात आणि ज्यांनी नोकरी करायला पाहिजे ते म्हशी राखतात. म्हणजे त्या किर्तंनकाला अजूनही असच वाटतं म्हशी राखणाऱ्यांच्या पोरांनी म्हशीच राखाव्या अशा अज्ञानी लोकांना एकच सांगणे आहे कोणतेही काम कोणत्याही व्यक्ती वर बंधनकारक नाही. आणि हि जी माणसिकता आहे विषमतेची हि मानसिकता बदलून म्हशीवाल्यांना देखील अधिकारी होता येते याच साठी आरक्षण आहे. जर आरक्षण नसते तुमच्या सारख्या निच माणसिकतेच्या लोकांनी गुणांची कदर न करता त्याला म्हशीच राखायला लावल्या असत्या. दुसरी गोष्ट त्या किर्तनकाराला हे माहिती नाही की अनेक मराठा कुटुंबातील तरुण कुणबी प्रमाणपत्रावर ओबिसी आरक्षाणाचा फायदा घेऊन नोकरी करत आहेत.

मग ज्या मराठ्यांकडे अगोदरच कुणबीचे प्रमाणपत्र आहे आणि आरक्षणाचा फायदा घेतला त्यांनी ही म्हशीच राखायला पाहिजे होत्या का? कुणबी सोडून ईतर माळी,साळी, कोळी, कुंभार, सुतार,धनगर अशा लोकांना पण आरक्षण आहे त्यांनी सुद्धां म्हशीच राखायला पाहिजे का? आपण काय बोलतो याचा अभ्यास तरी अगोदर केला पाहिजे. या किर्तनकारच्या बोलण्यातून केवळ एकच समाज टार्गेट होतो एवढी निच मानसिकता किर्तनकाराची असु नये. दुसरा एक जन म्हणतो आम्ही दोन रुपये किलो गहु तीन रूपये किलो तांदुळासाठी आंदोलन करत नाही. अस बोलुन त्या किर्तनकाराला नेमका काय संदेश द्यायचा हेच कळत नाही. दोन रूपये आणि तिन रुपये किलोचे अन्न जात बघून नाही तर गरीबी बघून दिल्या जाते. आणि गावातील प्रत्येक जातीत त्याचे लाभार्थी आहेत. मग जे लाभार्थी आहेत त्यांना काही मानसन्मान आहे का नाही? अन्नाची रूपयात किंमत सांगुन त्याला हिन समजून मनाची श्रीमती दाखवता येत नाही. उलट गरीबीची टिंगलटवाळी करून तुम्ही मोठेही होऊ शकत नाही. ज्यांना गरीबीची आणि पोटाच्या भुकेची किंमत नाही त्याला माणूस तरी कस म्हणावं हाच मोठा प्रश्न नाही. बर मराठा समाजा बद्दल चुकीच्या गोष्टी पसरवून कळवळा येणाऱ्या किर्तनकाराने खऱ्या गोष्टी पण लोकांना सांगून प्रबोधन करावे. मराठा आमदार खासदारांनी लोकांचा निधी स्वतः कडे वळवून लोकांना गंडविले,



पुजा, होम हवन, च्या नावाखाली पुजाऱ्याने लुटले, किर्तनाच्या नावाखाली किर्तनकाराने लुटले. मग लोकांकडे राहिल तरी काय? यावर किर्तनकार का बोलत नाहीत? पैसा घेणारा व देणारा दोघही दोषी आहेत हे तुकाराम महाराजांचे विचार लोकांना का सांगत नाहीत? म्हणजे हे किर्तनकार संताच्या विचाराने नव्हे तर पंताच्या विचाराने वागतात. आणि हेच समाजासाठी घातक आहे. सामाजिक द्वेषाचे बोलुन सामाजिक तेढ निर्माण करून यांना नेमके काय साध्य करायचे आहे. ज्याला समान नागरी कायद्याचे स पण माहिती नाही असे लोक म्हणतात आम्हाला आरक्षण नाही तर कोणालाच नाही. अरे भाऊ असे जरांगे यांनी म्हणले का? जरांगे ची ही मागणी आहे का? मग मराठा आरक्षणाचे नाव घेऊन स्वतः चे घाण विचार कशाला मांडतोय? मराठा आरक्षणासाठी जरांगे हे जिवाची बाजी लावत आहेत त्यांचे विचार शेअर करा. स्वतः चे निच विचार शेअर करायला जरांगेचे नाव घेऊ नका. समान नागरी कायद्याने आरक्षण बंद होणार तर ज्यांच्या कडे जमीनी आहेत त्यांच्या जमीनी भुमीहींनाना देणार का? ज्यांच्या कडे अनेक घर बंगले आहेत ते बेघर लोकांना मिळणार का? ज्यांच्या कडे पैसा आहे तो गरीबांना मिळणार का? ज्यांना पुजा विधी येतो त्यांना मंदीरात पुजारी होता येईल का? समान नागरी कायदा काय हे अगोदर अज्ञानी लोकांनी समजून घ्यावे मगच दाखले द्यावे. अशा पोटभरू किर्तनकार जर आरक्षणामुळे जास्त मार्क मिळवणारा म्हशी राखतो आणि कमी मार्कवाला नोकरी करतो. याला जर त्यांच्या च पद्धतीने उत्तर दिले तर सामाजिक तेढ निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. जसे आरक्षणामुळे गुणवत्ता ढासाळली तर लाखों रुपये भरून नोकरी मिळवली तर याला काय म्हणायचे? गरीबाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना डावलून पैशाच्या जोरावर नोकरी मिळवलेले कितीतरी लोक आहेत. यावरही प्रबोधन होणे गरजेचं वाटत नाही का? जो माणसाचे प्रबोधन करून माणसाला जागृत करतो तो किर्तनकार असतो. परंतु हजारो लाखों रुपये घेऊन समाजात विषमता आणि द्वेष पसरवून स्वतः चे पोटभरणाऱ्यांना लुटारूंनी लुटच केली. आणि आज पर्यंत लोकांची लुटच झाली म्हणून समस्या वाढत आहेत राजकीय नेते, देवा धर्माच्या नावाखाली पुजारी आणि सामाजिक कार्यक्रमाच्या नावाखाली किर्तनकाराने लुटच केली. आणि जनतेला समस्या ग्रस्त केले. किर्तनकाराने एक गोष्ट लक्षात ठेवायला पाहिजे तुम्हाला जस बोलण्याचा अधिकार संविधानाने दिलेला आहे तसाच बोलण्याचा अधिकार सर्वांना आहे. तुम्ही बोलण्याचा अधिकाराचा दुरुपयोग करून चुकीचे बोलत आहात परंतु बाकीच्या लोकांनी जर सत्य बोलायला सुरुवात केली तर तुमची दुकानदारी बंद होईल. म्हणून जरा अभ्यास पुर्ण बोलायला पाहिजे. आता कुठे केवळ लोकांच्या हिताचा मुद्दा घेऊन जरांगे आंदोलन करत आहेत तर त्यांना गालबोट लावण्याचा प्रयत्न हा पंतांच्या लोकांकडून होत आहे. हे आपण ओळखुन पंताच्या लोकांना आवर घालणे आवश्यक आहे. पंताच्या लोकांनी अशीच चुकीच्या पद्धतीने तरुणांची माथी भडकवली तर महाराष्ट्रात अराजकता माजेल आणि जरांगेच्या आंदोलनाला गालबोट लागुन जरांगे व समर्थक बदनाम होतील. म्हणून अशा माथे भडकावू लोकां पासून सावध राहणे आवश्यक आहे.

# जळो माझे कर्म वाया केली कटकट



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**महान विचार आणि महापुरुषांची संगत सर्वकाळ अनमोल असते! एका क्षणाचा कुविचार किंवा कुसंगती माणसाचा कपाळमोक्ष घडवून आणते. त्यासाठी महापुरुष त्यांच्या कृती, लेखन, विचाराने कालातीत असल्यामुळे त्यांची संगती नितांत गरजेची आहे. ते नित्य आपल्या सोबत ठेवल्याचे जीवनात अनंत लाभ आहेत. काळ सदैव आव्हानात्मक असतो. सावधान! माणसाला षड्विकार रसातळाला नेतात. क्षणात भावनिक होणे माणसाला प्रचंड महाग पडते. त्याचे बरेच दिवस परिणाम भोगावे लागतात. त्यासाठी माणसाला स्वतःच्या मनावर आणि त्यातल्या त्यात भावनेवर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक आहे. एक हंडाभर दुध लिंबाच्या एका थेंबाने नासते, अगदी तसेच माणसाने शंभर सत्कर्म केले आणि भावनावेगात एक जरी चूक झाली तर भूतकाळातील संपूर्ण शंभर सत्कर्म पाण्यात जातात. त्यासाठी माणसाने क्षणाक्षणाला सावध राहून आणि भावनेवर नियंत्रण ठेवून वर्तन आणि कर्म करायला हवेत! त्यासाठी तुकोबांच्या एकेका अभंगाची अनमोल साथ कामी येते.**

**तुकारामनीती**
**भाग -७१**

जगद्गुरू तुकोबांच्या अभंग गाथ्यातील क्रमाने एकएक प्रकरण अभ्यासताना पुढे 'भूपाळी अभंग' हे प्रकरण येते. सुदैवाने वर्तमानात कार्तिक महिना चालू आहे. गावोगाव सगळीकडे पहाटे मंदिरावर काकड आरती भजन मोठ्या उत्साहात सुरु आहे. काकड आरती अभंग हा स्वतंत्र चिंतन-लेखनाचा विषय आहे. काकड आरतीचे अभंग म्हणजे संतांचा देवाशी अपरोक्ष संवाद! त्याच्या जोडीनेच काकड आरती अभंगांमध्ये संत आत्मसंवादी सुद्धा होतांना दिसतात. तसं पाहिलं तर आत्मसंवाद आणि ईश्वर संवाद ह्या दोन्ही गोष्टी एकच! याच न्यायाने संत तुकोबाराय भूपाळी प्रकरणातील

जळो माझे कर्म वाया केली कटकट | झाले तैसे तट नाही आले
अनुभवा ||१||
आता पुढे धीर काय देऊ या मना | ऐसे नारायणा प्रेरीले ते
पाहिजे || धृ ||
गुणवंत केलो दोष जाणायासाठी | माझे माझे पोटी बळकट
दुषण ||२||
तुका म्हणे अहो केशीराजा दयाळा | बरवा हा लळा पाळीयेला
शेवटी ||४|| (शा.अ.गाथा अ.क्र. १२५५)

या अभंगात आपल्याला भूतकाळात झालेल्या संसारिक दुःख आणि तत्संबंधाने झालेला त्रास याबद्दल श्री विठ्ठलाशी संवाद साधतात. वयाच्या सतराव्या वर्षी संपूर्ण संसाराचे ओझे खांद्यावर पडलेले युवा तुकोबा अनेक खडतर प्रसंगांना सामोरे गेले. अनेकवेळा अनेकांचा मार झेलून ते मनाने खंबीर झालेले दिसतात. आपले म्हणणे मांडण्यासाठी अभंग लिहिणारे तुकोबाराय तत्कालीन प्रस्थापितांना आव्हान करतांना कोणत्याही प्रकारचा प्रतिकार करत नाहीत. त्या उलट अशा प्रकाच्या अभंगातून ते आपली व्यथा देवाला सांगतांना संसाराचा संपूर्ण भार देवावर सोपवून ते निश्चिंत होतात. एवढे बेडर आणि देवांवर निष्ठा असणारे संत विरळा! त्यात तुकोबाराय अग्रस्तानी आहेत.

प्रस्तुत अभंगात जगद्गुरू तुकोबाराय आपण आत्तापर्यंत केलेले कार्य काहीही कामाचे नसून ती केवळ आणि केवळ एक कटकट होती. असे लिहिण्याचे कारण म्हणजे भक्ती, भजन किंवा कीर्तन केल्यानंतर जीवनातील-संसारातील दुःखं कमी होतील असे त्यांना अपेक्षित होते, परंतु तसे काही झाले नाही. या अनुभूतीतून हा अभंग लिहिला असावा. इथे तट या शब्दांचे अनेक अर्थ होतात. तट म्हणजे किनारा, संरक्षण, तटबंदी, किंवा एखाद्या वस्तूचे दोन भाग. यापैकी संत तुकाराम महाराजांना तट म्हणजे किनारा किंवा संरक्षण असा अपेक्षित आहे. परंतु त्यांना याच्या उलट अनुभव आलेले दिसतात. आपल्याला वाटणारी आपली सत्कर्मे आपले संरक्षण करतीलच असे नाही. तसा त्यांना अनुभव आल्यामुळे पुढे जाऊन आपण आपल्या मनाला कसे समजवायचे? कसा धीर द्यायचा? असे एक ना अनेक प्रश्न त्यांना पडतात, परंतु तरीही तुकोबाराय खचत नाहीत, तुटत नाहीत. पुन्हा ताकदीने नैराशातून बाहेर येऊन "आपल्या मनाला धीर देण्यासाठी हे नारायणा तूच मला प्रेरणा दे!" असे आव्हान करून संघर्षासाठी पुन्हा तयार होतात. स्वतः माणूस म्हणून तुकोबाराय स्वतःतील सकारात्मक, प्रेरक बाजूंना जाणून घेतात आणि लढायला तयार होतात. या आत्मसंवादी लढ्यात तुकोबांना फक्त आणि फक्त शब्द आणि देवावरील असलेली नितांत श्रद्धा याचाच काय तो आधार होता! यातूनच पुढे जाऊन आपण गुणवंत असून मला माझ्यातील दोष जाणवू लागले आहेत. माझ्या अधोगती अथवा प्रगतीला मीच कारणीभूत असून मी त्यासाठी कुणालाही दोष देत नाही. आपल्यातील दूषण म्हणजे माणूस म्हणून असणारे विकारच माझ्या या संसारिक अवस्थेला कारणीभूत असल्याची तुकोबाराय जाहीर कबुली देतात. असे असले तरी त्यांची श्री विठ्ठलावरील श्रद्धा तसूभरही ढळलेली दिसत नाही. प्रचंड निष्ठा आणि ओतप्रोत भक्तीने वाहणारे तुकोबांचे जीवन-विचार त्यांना कधीही एकाकी सोडत नाही. त्यातूनच शेवटी तुकोबाराय आपली ईश्वरावरील निष्ठा प्रकट करतांना ईश्वर हा प्रेमळ, दयाळू असून माणसाला खचू अथवा तुटू देत नाही. त्यासाठी प्रस्तुत अभंगाच्या शेवटी तुकोबाराय ईश्वराचे मनोमन आभार व्यक्त करतात. आपला लडिवाळ, लेकरांसाखा संबंध ते ईश्वराशी जोडून घेतात. ईश्वराचा लळा म्हणजे आई सारखे प्रेम तुकोबांना पुन्हा पुन्हा भजन, अभंग आणि कीर्तनातून बळ देऊन जाते. त्यातूनच तुकोबाराय पुनः पुन्हा नव्या उमेदीने, अभंगाद्वारे आपल्याला भेटत असतात.

माय-बाप वाचकहो, मला क्षमा करा! क्षमा मागण्याचे कारण म्हणजे मी तुकोबांच्या अभंगांचे 'तुकाराम नीती' अंतर्गत मला सुचणाऱ्या, कळणाऱ्या कुवतीप्रमाणे विश्लेषण करत आहे. एका शब्दाचे, काव्यातील एका ओळीचे अनंत अर्थ अभिप्रेत असतात. ज्याच्या त्याच्या वैचारिक परिपेक्षात त्या काव्य किंवा कलाकृतीचे अर्थ जन्म घेत असतात. याच न्यायाने मी सार्वकालिक विचार करूनच तुकोबांच्या अभंगांचे वर्तमानात आपल्याला उपयोगी आणि पथदर्शी होईल असेच विश्लेषण



करण्याचा प्रयत्न म्हणजेच हमाली करत आहे. तुकोबांच्या गाथ्यातील विविध प्रकरणातील अभंग वाचक-चिंतकांना सातत्याने नवनवीन विषयावर चिंतन-मंथन करायला लावतात. त्यापैकी भूपाळी प्रकरणातील हा एक अभंग. आज आपण स्वतंत्र भारतात लोकशाहीची पंचाहत्तरी ओलांडून पुढे जात आहोत. काळ झपाट्याने बदलला आहे. माणसांची सगळीकडे धावपळ सुरु आहे. का? कशासाठी एवढा अट्टाहास? या प्रश्नांच्या मुळाशी भौतिक गरजा आहेत. भौतिक गरजांची पूर्तता करण्यासाठी माणूस धडपडत असतांना दुर्दैवाने मानसिक, वैचारिक आणि भावनिक अवस्थेवर जेवढे लक्ष असावे तेवढे दिसत नाही. यासाठी महान, त्यागी, कृतीशील महापुरुषांच्या ग्रंथांचे आणि विचारांचे चिंतन होणे काळाची गरज बनली आहे. त्यासाठी तुकोबांचे आदर्श चरित्र आणि लेखन आपल्याला नित्य पथदर्शी व्हावे या न्यायाने हा तुकाराम नीतीचा लेखन प्रपंच सुरु आहे. जगद्गुरू तुकोबाराय सरळ देवाशी संवाद साधतांना आपल्या मनाशी सुद्धा तेवढ्याच शक्तीने बोलतात. त्यासाठी तुकोबाराय ईश्वराशी गुज बोलतात. आज आपण सर्वांनी एकमेकांशी संवाद साधतांना गुज बोलले पाहिजे. तसाच संवाद देवाशी होणे सुद्धा नितांत गरजेचे आहे. आज आपण सर्वजण आपापल्या प्रार्थना स्थळी प्रार्थना किंवा दर्शन घ्यायला गर्दी करतो. मंदिर म्हणजे मांगल्य, दिव्यता आणि ऋजुता याचा त्रिवेणी संगम! ही तीन महान ऊर्जादायी तत्वे जिथे जिथे नित्य नांदत असतात तिथे तिथे मंदिराचे अस्तित्व असते. त्यासाठी प्रत्येक घरच काय प्रत्येक माणूस, प्रत्येक हृदयच मंदिर होणे अपेक्षित आहे! असे झाल्यानंतर माणसाला शांती, सुख, समृद्धी बाहेर शोधण्याची गरज पडणार नाही. त्यासाठी हे सगळे अभंग आपण सर्वांनी पुन्हा पुन्हा वाचून त्यावर विचार करणे काळाची गरज बनली आहे. एवढे खडतर अनुभव आणि आव्हानात्मक जीवनानुभव आपल्याला सहज उपलब्ध झाले असतांना आपण छोट्या मोठ्या आव्हानांना सहजतेने सामोरे गेले पाहिजे. समाजाच्या सोबत वर्तन करतांना लोक स्वभाव गृहीत धरूनच आपण स्वतः मजबुतीने जीवन जगणे काळाची गरज आहे. दिवसेंदिवस आपल्याला नवनवीन आव्हाने पेलतांना अनेक प्रसंग समोर उभे ठाकतात. त्यासाठी जगद्गुरू तुकोबांचे जीवन आणि नित्य पथदर्शी अभंग अनमोल ठरतात. त्यासाठी महाराष्ट्रातीलच काय देशातील तमाम माणसांनी संत तुकोबांच्या अभंगांचे वाचन करायला हवे. ज्याप्रमाणे तमिळनाडूतील थिरुवल्लुवर या तमिळ संतांचे 'कुरल' किंवा 'थिरूकुरल' ग्रंथाचे जगभर वाचन होते. कुरल हा ग्रंथ अनेक भाषेत अनुवादित झाला असून त्या प्रमाणेच तुकोबांच्या गाथ्याचे विविध भाषेत भाषांतर होऊन जगभरातील लोकांनी हा गाथा जीवन जगण्यासाठी आणि उच्चतम वर्तन करण्यासाठी आदर्श ग्रंथ म्हणून समोर ठेवल्यास जीवनातील अनेक कठीण प्रसंगी तुकोबांचा हा ग्रंथ आपल्याला मार्ग दाखवल्याशिवाय राहणार नाही. सर्वांनी सर्वकाळ नित्य नित्य एकतरी अभंग वाचून आणि तुकोबांचे चरित्र समजून घेऊन आपले जीवन समृद्ध करावे! सतराव्या शतकात सोन्यासारखे तावून सुलाखून निघालेले हे गाथा रुपी सोने तुमच्या माझ्या जीवनाला झळाळी आणल्याशिवाय राहणार नाही! असे होणे म्हणजे तुकोबांच्या अक्षरवाङ्मयाला धुमारे फुटले म्हणणे वावगे ठरणार नाही! याच न्यायाने त्यांची तुकाराम नीती नव्याने लोकप्रवाही झाल्याशिवाय राहणार नाही!

**(टीप: लेखक हे व्याख्याता, कवी, किर्तनकार, समीक्षक, योग-प्राणायाम प्रशिक्षक आहेत.)**

# अव्यक्त राहण्यासाठी ज्ञान लागतं

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

मनात येईल ते बोलण्यासाठी फार विद्वत्ता असण्याची गरज नाही. जे मानत आलं ते कोणालाही बोलता येत पण गुणवत्तेचा कसं लागतो तो अव्यक्त राहण्यासाठी अव्यक्त कोणालाही रहायला जमत नाही त्यासाठी ज्ञान लागतं.मौन हि शक्ती साधना आहे हि साधना सहजासहजी अर्जित करता येत नाही त्यासाठी अध्यात्मिक ज्ञान वृत्ती आणि ज्ञान असणं गरजेचं आहे.उतावीळ होणं मोठेपणाच लक्षणं नसुन त्याच प्रदर्शन देखील उचित नाही. स्वतःला संयमित ठेवता आलं पाहिजे .सृष्टी वरील सगळ्याच बाबी आपल्याला पाटतील योग्य वाटतील अस नाही . तशी अपेक्षा करणं देखिल योग्य नाही पण त्याच बरोबर आपल्या जीवनाशी निगडित बाबींचा देखिल तसंच आहे.आपल मन हे नेहमीच उंचबळून येत असत .ते उंचबळून येण देखील स्वाभाविक आहे.पण मन उंचबळून येऊन देखिल अव्यक्त राहण्यासाठी ज्ञान लागतं.बोलण म्हणजे ज्ञान नाही अव्यक्त राहण्यासाठी ज्ञान लागतं. जगात बोलता कोणालाही येत असत मौन राहण्यासाठी सामर्थ्य लागत .हे सामर्थ्य सहजासहजी मिळत नाही. इतरांच्या बदल चांगलं बोलण्यासाठी प्रयत्न खुप करावे लागतात. परंतु इतरांच्या बद्दल अशोभनीय भाषा तोंडुन सहज निघते अगदी प्रयत्न केले तरी देखील कळत न कळत आपण इतरांच्या बदल काहीतरी बोलून जातोच हा एक सर्वसाधारण सवयी चा भाग म्हटलं तरी हरकत नाही. खुप कमी अपवादात्मक लोक या सवयींपासून स्वतः ला अलिप्त ठेवण्यात यशस्वी होत असतात .तसं या सवयी पासुन स्वतःला दुर ठेवणं वाटत तितकं सहज सोपं नसतं. करणं समाज व्यवस्था आणि आपण मिळुन सगळेच अशा युगात वावरतोय कि जिथ स्वतः ला वगळता इतर बदल च मत स्थिर नसुन ते वारंवार आणि परस्थिती नुसार नेहमीच बदलत असतं.मनात विचारांचे वादळ वेळ काळ परस्थिती नुसार मनात काहुर निर्माण होतच असतं.पण मनातील काहुर काहीही नुकसान होणार नाही यासाठी ज्ञान खूप महत्वाचं आहे . उतावीळ होणं फार काही कठिण नसतं पण संयम ठेवण्यासाठी आणि संयम सुटणार साठी ज्ञान हेच सर्वतम साधन असतं . जास्त बोलणं म्हणजे ज्ञान हा हल्ली ट्रेंड निर्माण होत आहे पण हा ट्रेंड चुकीच्या पद्धतीने पुढे जात आहे वास्तविक वाणी अनियंत्रित होण्यासाठी फार काही कर्तबगारी असण्याची आवश्यकता लागतं नाही.खरी कर्तबगारी लागते मनातील विचारांचा वादळं थोपवता आलं पाहिजे. व्यक्त होण्या ऐवजी वेळ प्रसंगी काळानुरूप अव्यक्त राहण्यासाठी सामर्थ्य निर्माण करावं लागतं अन्यथा जे मनात येईल ते बराळण्यासाठी फार काही लागत नाही.आपण कशासाठी काय बोलतोय याचा नेमका आणि योग्य अर्थ बोलणाराला माहित नाही .हे अतिशयोक्ती नाही तर वास्तव आहे . वाणी आणि पाणी हे अगदी जपून वापरले पाहिजेत असे आपले धर्म संस्कार आणि धर्म शास्त्रानुसार सांगितले आहे. पण आपण नेमकं सध्या या मुख्य विचारांना बगल देऊन आचरण करतोय वागतोय .आपण काय व्यक्त होतोय हे खुप महत्व असतं . वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने आपल मत असु शकत .पण त्या मतांवर आपण कसा संयम ठेवून मार्ग काढायचा आहे हे आपल्याला समजलं पाहिजे.हि समज जीवनातील सर्व श्रेष्ठ ज्ञान आहे.महणुन मनात येईल ते व्यक्त होऊन या पद्धतीने आपण फार ज्ञानी आहेत हे सिद्ध होत नाही तरी हा वेडेपणा आपण करतोय म्हणजे आपण नेमकं कुठं आहेत .पण सध्याच्या युगात सत्याचा वाहक होण्यासाठी फार कोणीही तयार नसल्याने वरकरणी सगळं काही चालूं आहे.कारण आपला मोठे पण बोलण्यावरून नाही तर आपण किती संयमित आहेत त्या वरून ठरत असुन तो आपल्या कृतीतून आणि कर्तुत्वातून प्रकट होत असतो. शेवटी बोलणं आणि कृती करणं यामध्ये जमिन असमानच अंतर असतं .सुसंकृत बोलणं आणि टिंगल टवाळी म्हणून बोलण यामध्ये सुद्धा फरक असतो . सुसंस्कृत बोलणारा व्यक्ति कधीच अती प्रमाणात बोलत नाही.मौन हेचं सुसंकृत व्यक्तिमत्वच मुख्य लक्षण असतं. आपल्याला मध्ये एक उर्जा असते आणि हिच उर्जा वाणीतून बाहेर पडत असते .मग आपल्या मध्ये आपण कोणती उर्जा साठवतो तीच उर्जा बाहेर पडत असते. मनात सकारात्मक उर्जा निर्माण होऊन स्नेह भाव आदर, आनंद हर्ष निर्माण झालं पाहिजे . आणि बोलून चुकण्या ऐवजी मौन राहण हे कधीपण उत्तम असतं.

# दादांनो, गाड्या जपून चालवा हो...

आधुनिक केसरी



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

नव्या कोऱ्या रोडवर सगळे ड्रायव्हर आपले वाहन सुसाट वेगाने पळवत असतात. रोडवर धावणाऱ्या वाहनांचा वेग हा कमाल मर्यादेचा असतो. प्रचंड वेगाने वाहन चालवणे ड्रायव्हर लोकांनी एक जीवघेणी क्रेझ तयार केली असून आपले वाहन कधीच कमी वेगाने चालवायचे नसते अशी धारणा ड्रायव्हर लोकांनी करुन ठेवली आहे. बेदरकार धावणाऱ्या वाहनांच्या प्रचंड वेगामुळे दररोज असंख्य अपघात होत आहेत. या अपघातात मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. ही बाब अतिशय चिंताजनक आहे. जर ड्रायव्हर लोकांनी निष्काळजीपणे वाहन चालवणे बंद केले तर... रोजच्या अपघातात मृत्यू पावणाऱ्यांची संख्या आपोआप कमी होईल. गरज आहे ड्रायव्हर लोकांनी 'मनावर ब्रेक उत्तम ब्रेक'हे वाक्य मनात बिंबवण्याची!

खेड्यापाड्यातील अगदी लहान लहान मुले मोटारसायकल आणि ट्रॅक्टर चालवतात.शहरी भागातील शाळकरी मुले स्कुटी,बुलेट व कार ही वाहने चालवतात.ही मुले तरुण वयात वाहने कमी वेगाने कशी काय चालवतील?दोन चार मित्र पाठीमागे बसवून आपली बाईक अनियंत्रित वेगाने धूम स्टाईलने चालवणारे आपण नेहमी पाहतो. अशा मुलांच्या आईवडिलांना चांगल्या शब्दात सुनावले पाहिजे. जेणेकरुन ते आपल्या लहान मुलांना वाहने पुन्हा चालवायला देणार नाहीत. ट्रक, कंटेनर सारख्या अवजड वाहनांचे ड्रायव्हर तर आपले वाहन चालवताना फार निष्काळजीपणे चालवतात.'नजर हटी,दुर्घटना घटी!' आणि 'पुढे धोक्याचे वळण आहे वाहने सावकाश चालवा'असा फलक संदेश वाचूनही ड्रायव्हर बेफिकीर असतात.काही महाभाग तर दारु प्राशन करून गाडी चालवतात. काही ड्रायव्हर झोपमोड झालेली असली तरीही वाहन चालवतात. मग डुलकी लागली की अपघात होणारच आणि निष्पाप लोकांचा जीव जाणारच!

नवीन सिमेंट रोडवर कुत्रे,मांजर, डुक्कर आणि इतर प्राणी हे वाहनांच्या धडकेमुळे तर खूप मरत आहेत.त्या मुक्या प्राण्यांच्या मरणाचे दुःख कोणाला वाटणार आहे? जेथे माणसांच्या मृत्यूचे माणसाला काहीच वाटत नाही तेथे प्राण्यांच्या मरणाची काळजी कोण करणार आहे?रात्री फुटपाथवर झोपलेल्या कामगारांच्या अंगावरुन बेफाम वेगांचे ट्रक व कंटेनर जातात आणि त्या लोकांना चिरडून टाकतात. रस्त्यांच्या कडेला असणाऱ्या झोपडपट्टीत वेगाने धावणारी अवजड वाहने घुसतात आणि कैक जणांचे जीव घेऊन शांत होतात! विमान दुर्घटना आणि रेल्वे अपघातात आतापर्यंत अनेक प्रवाशी गतप्राण झाले आहेत. प्रवाशी जहाजे समुद्रात बुडून असंख्य लोकांना जलसमाधी मिळाली आहे. देवदर्शनाला जाताना कित्येक भक्तांच्या गाडीला अपघात होऊन असंख्य भक्त गतप्राण झाले आहेत. असे हे जीवघेणे अपघात व दुर्घटना ड्रायव्हर लोकांच्या निष्काळजीपणामुळे होतात हे वास्तव आहे. संपूर्ण जगाची दळणवळणाची गरज पूर्ण करणारे सगळ्या वाहनांचे ड्रायव्हर लोक वाहने चालवताना नेहमी सावध व दक्ष राहिले तर अपघात होत नाहीत. जे ड्रायव्हर अतिशय काळजीपूर्वक वाहने चालवतात, गाडीतील प्रवाशांची काळजी घेतात अशा ड्रायव्हर लोकांचे करावे तेवढे कौतुक कमीच असते. परंतु,ज्यांना वाहतुकीचे नियम नीट माहित नसतात,वाहन चालवण्याचे ट्रेनिंग मिळालेले नसते त्या लोकांनी अर्धवट ज्ञानाच्या जोरावर वाहने चालवू नयेत.

जाता जाता ड्रायव्हर लोकांना कळकळीची नम्र विनंती करावी वाटते की कोणतेही वाहन सुसाट वेगाने पळवू नका,ओव्हर टेक करुन वेगवान वाहनांच्या पुढे जाऊ नका.ड्रायव्हर दादांनो,एक कळकळीची नम्र विनंती की रात्र असो की दिवस असो आपली वाहने जपून चालवा.आपल्यामुळे कोणाचा मृत्यू होणार नाही याची खबरदारी घ्या!



# प्रशासकीय सेवेतील नैतिक मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी जपणारे सिव्हिल सर्जन डॉ. अनिल कावरखे

आधुनिक केसरी



वसंत खडसे
9373578429



जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून, काही महिन्यापूर्वी पदभार स्वीकारलेले डॉक्टर अनिल कावरखे हे एक अजब रसायन आहे. रुग्णसेवा, जनसेवा, समर्पण, निष्ठा, मेहनत व संघर्ष या पंचसूत्रीच्या बळावर प्रशासकीय सेवेतील नैतिक मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी अल्पावधीतच अवघ्या वाशिम जिल्ह्यात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. मराठवाड्यातील गोरेगाव येथील एका सधन व सुसंस्कृत परिवारातून आलेले डॉ. कावरखे यांनी राज्य शासनाच्या आरोग्य विभागात विविध पदावर आपली यशस्वी जबाबदारी पार पाडली आहे." रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा " हे ब्रीद घेऊन प्रशासकीय सेवेतील नीतीमूल्ये जपत सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सदैव गोरगरिबांच्या मदतीला अर्ध्यारात्री धावून जाणारे डॉ.अनिल आनंदराव कावरखे हे संपूर्ण जिल्ह्यात " देवदूत " म्हणून ओळखले जातात. वाशिम जिल्ह्यातील सर्वसामान्य गोरगरीब लोकांना आरोग्य सेवा देणाऱ्या जिल्हा सामान्य रुग्णालयाचा पदभार स्वीकारून रुग्णसेवेसोबतच समाजसेवा करणाऱ्या देवदूताच्या कर्तुत्वाचा आधुनिक केसरीने घेतलेला हा अल्पसा आढावा.

डॉ.अनिल कावरखे यांचे वडील श्री आनंदराव कावरखे हे जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक होते. जुन्या काळातील "गुरुजी" म्हटले की शिस्तप्रियता आणि वक्तशीरपणा हे समीकरण सर्वश्रुतच आहे. त्यामुळे आपसूकच वेळ आणि शिस्त याचंमहत्त्व डॉक्टर कावरखे यांच्या बालमनावर कायमच कोरल्या गेलं आहे. प्राथमिक शिक्षणाचे धडे जन्मभूमी असलेल्या गोरेगावात गिरवल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी हिंगोलीच्या आदर्श कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. सतत टॉपर लिस्ट मध्ये प्रथमस्थानी राहत, त्यांनी नांदेड येथून वैद्यकीय शास्त्रातील एमबीबीएस ही पदवी प्राप्त केली. 1996_ 97 सालात एमपीएससी मार्फत रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी म्हणून त्यांची नियुक्ती झाली. आणि खऱ्या अर्थाने येथूनच त्यांच्या समाजसेवेच्या व्रताची सुरुवात झाली. शासनाच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून रुग्णसेवा देत असताना सुद्धा, त्यांनी शिक्षणाची कास सोडली नाही. प्रशासकीय सेवेत कर्तव्य पार पाडत त्यांनी वैद्यकीय क्षेत्रातील महत्त्वपूर्ण असलेल्या भूल शास्त्राचा डिप्लोमा पूर्ण केला. त्यांचे अभ्यासातील कठोर परिश्रम व नवनवीन ज्ञान आत्मसात करण्याची वृत्ती पाहून शासनाने त्यांना सर्पदंशावर विशेष प्रशिक्षण घेण्यासाठी " ऑस्ट्रेलिया " साठी निवड केली होती. परदेशातून सर्पदंशाचे विशेष प्रशिक्षण घेऊन डॉक्टर अनिल कावरखे मायदेशी परतल्यानंतर, काही काळासाठी त्यांनी बुलढाणा येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा दिली. त्यानंतर वाशिम येथे त्यांनी प्रभारी सिविल सर्जन पदाची जबाबदारी पार पाडली. प्रभारी अधिकारी म्हणून कारभार सांभाळत असताना त्यांच्यातील कार्य कुशलता कर्तव्यनिष्ठा शिस्त आणि वक्तशीरपणाची झलक कौतुकास्पद होती.परिणामी वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयाचे कायमस्वरूपी जिल्हा शल्यचिकित्सक म्हणून शासनाने त्यांची नियुक्ती केली आहे.

बुद्धिमत्ता, विचारशक्ती आणि भावना असा त्रिवेणी संगम असलेले डॉ. कावरखे यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी या हेतूने, जिल्हा सामान्य रुग्णालयाचा चेहरामोहराच बदलून टाकला. येथे अत्यावश्यक असणाऱ्या सर्व वैद्यकीय सोयी सुविधा स्थापित केल्या. एवढेच नव्हे; तर सर्व कर्मचाऱ्यांना शिस्त, वक्तशीरपणा आणि आरोग्य तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांसोबत सौहार्द, सौजन्यपूर्ण वागणुकीचे धडे घालून दिले. परिणामी गोरगरिबांचा दवाखाना म्हणून जिल्हा सामान्य रुग्णालयाकडे कुच्छीत नजरेने पाहणाऱ्यांचा दृष्टिकोनच या " देवदूताने " बदलून टाकला. त्याचेच फलित म्हणून, सधन कुटुंबातील व स्वतःला प्रतिष्ठित घराण्यातील समजणारे लोकसुद्धा आज आरोग्य तपासणीसाठी सामान्य रुग्णालयाची वाट धरतात. हेच डॉ.अनिल आनंदराव कावरखे यांच्या समाजसेवेचे सर्वात मोठे यश असल्याचे जिल्ह्यातील सामान्य जनता बोलत आहे.

डॉ.अनिल कावरखे यांच्यासोबत कौटुंबिक मित्रत्वाचे घनिष्ठ संबंध असलेले त्यांचे मित्र रिसोड येथील शुभम पॅथॉलॉजी लॅबचे संचालक डॉ.हनुमान धोंडगे व दस्तऐवज लेखक गणेशराव पवार हे मोठ्या अभिमानाने सांगतात की, " प्रबळ राजकीय वारसा लाभलेल्या घराण्यातून आलेले डॉ.कावरखे यांचे काका नामदेवराव कावरखे हे हिंगोली बाजार समितीचे आजन्म सभापती राहिलेले आहेत. तरीसुद्धा कावरखे यांनी राजकारणाचा मोह धरला नाही. मुळातच मितभाषी व निर्गरविष्ठ असलेल्या या " देवदूताने " सामाजिक बांधिलकी जोपासत आपल्या वैद्यकीय क्षेत्राच्या माध्यमातून समाजसेवेचा मार्ग अवलंबला आहे. सर्व जाती-धर्मातील सर्वसामान्यांच्या शेतकरी, कामगार, कष्टकरी, शेतमजूर, दीनदुबळ्यांच्या मदतीला धावून जाणाऱ्या या " अवलिया " मित्राचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो..! अशा प्रशासकीय सेवेत उच्चपदस्थ अधिकाऱ्याची कर्तव्यनिष्ठा आधुनिक केसरीच्या सर्व वाचकांपर्यंत पोहोचावी या हेतूने घेतलेल्या आढाव्याचा हा अल्पसा प्रपंच.

# मराठ्यांना ओबीसी कोट्यातून आरक्षण मिळणार ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**मराठ्यांना आरक्षण मिळावे व व सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन आरक्षण देण्याची देण्याची मागणी करत जरांगे पाटलांच्या दुसऱ्या टप्प्यातील नऊदिवसांपासूनचे उपोषण अखेर मागे घेतले. उपोषणानंतर राज्यात अनेक ठिकाणी आंदोलनाला हिंसक वळण आल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा देखील प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे सरकारचं शिष्टमंडळ हे जरांगे पाटलांची भेट घेण्यासाठी अंतरवली सराटीमध्ये दाखल झाले. यावेळी त्यांनी मनोज जरांगे यांच्याशी चर्चा करुन त्यांचं उपोषण सोडलं. मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र देण्यासाठी राज्य सरकार पुढील दोन महिन्यांत युद्ध पातळीवर काम करून हा प्रश्न निकाली काढेल. त्यामुळे दोन महिन्यानंतर मनोज जरांगे यांना पुन्हा आंदोलन करण्याची वेळच येऊ देणार नाही,' असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे व्यक्त केला.**

तसेच, ''मराठा आरक्षणाची मागणी पुन्हा अभ्यास करून 'क्युरेटिव्ह' याचिकेमार्फत सर्वोच्च न्यायालयात जोरदारपणे मांडली जाईल,'असं मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटल.

मराठा समाजाला न्यायालयात टिकणारं आणि कायद्याच्या चौकटीतलं आरक्षण देण्यासाठी शासन कटिबद्ध असून त्यासाठी गांभीर्याने पावलं टाकेल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. याबाबतीत सरकार प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे मुखयमंत्र्यांनी स्पष्ट केले. व त्या दृष्टीने प्रशासनदेखील ॲक्शन मोडमध्ये आले असून राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांची एक बैठक सरकारने बोलावलेली आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांसोबत संवाद साधणार आहेत. मराठा आरक्षणासाठी नेमलेल्या शिंदे समितीच्या कामाचा आढावादेखील घेण्यात येणार आहे. कुणबी जातप्रमाणपत्र वाटपाच्या प्रक्रियेला राज्यभरात वेग देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी तातडीची बैठक बोलावल्याचे सांगितले जात आहे. म्हणजेच आता मराठ्यांना कुणबी जात प्रमाणपत्र देवून त्यांना ओबीसी कोट्यातून आरक्षण दिले जाणार आहे,असाच याचा अर्थ आहे. या पार्श्वूमीवर कुणबी जातप्रमाणपत्र वाटपाच्या प्रक्रियेला राज्यभरात वेग देण्यासाठी मुख्यमंत्र्यांची ही बैठक बोलावली आहे. जात प्रमाणपत्र वाटपाच्या प्रक्रियेत सर्व जिल्हाधिकाऱ्यांसोबत समन्वय राहावा




यासाठी एका आयएएस अधिकाऱ्याची देखील नेमणूक केली जाणार आहे. मनोज जरांगे पाटलांनी सरसकट आरक्षण देण्याची मागणी केलेली असली तरी सरकार नोंदींवर अवलंबून प्रमाणपत्र देणार असल्याचे मुख्यमंत्र्यांच्या गुरुवारच्या विधानावरुन दिसून येत आहे. मात्र सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यास ओबीसी समाजाचा विरोध आहे. महाराष्ट्रात मराठा-कुणबी किंवा कुणबी प्रमाणपत्र असल्यास ओबीसी कोट्यातून आरक्षण मिळतं. मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला. यानंतर आता मराठा समाज हा मुळतः कुणबीच आहे, असा दावा मनोज जरांगे-पाटील यांच्यासह अनेकजण करत आहे. यामुळे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र दिल्यास आरक्षण मिळताना ते ओबीसी कोट्यातून मिळणार का हा प्रश्न सध्या मोठया प्रमाणावर ऐरणीवर आला आहे.कारण मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्यात यावे. राज्यातील मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे. त्यासाठी ओबीसी प्रवर्गातील प्रगत जाती बाहेर काढाव्यात, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.. दर दहा वर्षांनी आरक्षण दिलेल्या ओबीसी बांधवांचा सर्व्हे करावा. तो अद्याप करण्यात आलेला नाही. हे सर्वेक्षण करुन ओबीसी प्रवर्गातील प्रगत जाती बाहेर काढाव्यात. याशिवाय, मराठा समाजाला ५० टक्क्यांच्या मर्यादेत राहून आरक्षण दिले तर वेगळा प्रवर्ग करुन ते द्यावे. ते एनटी, व्हीजेएनटी प्रवर्गाप्रमाणेच टिकणारं आरक्षण हवे. अन्यथा आम्ही ते आरक्षण घेणार नाही, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले.

सध्या राज्यात ओबीसी कोट्यातून मिळणारे आरक्षण १९ टक्के आहे. यात मराठा समाजाचाही समावेश झाल्यास आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी नव्याने वाटेकरी येतील, अशी भावना ओबीसी समाजातील संघटनांची आहे.आमचा विरोध मराठा आरक्षणाला नसून ओबीसीतून त्यांना आरक्षण देण्याला आहे असंही ओबीसी समाजाचं म्हणणं आहे.सरकारने मानसिकता बदलली किंवा ओबीसीतून आरक्षण देण्याचा विचार केल्यास आम्ही जरांगे पाटील यांच्यापेक्षा पाचपटीने मोठी सभा घेऊ, असा इशारा राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे प्रमुख बबनराव तायवाडे यांनी माध्यमांशी बोलताना दिला आहे.

# कावळ्यांची संख्या

आधुनिक केसरी

आपल्या दरबारातील सरदार आणि मानकर यांची हुशारी तपासण्यासाठी बादशहा अनेक वेळा विचित्र वाटतील अशा प्रकारचे प्रश्न विचारायचा. या प्रश्नाचे त्याला अपेक्षित असलेले योग्य उत्तर मिळाले की तो खुश व्हायचा. बादशहाला हे समाधान बिरबल सर्वाधिक वेळा द्यायचा हे वेगळे सांगायला नको. असेच एकदा दरबारात सर्व जण बसलेले असताना बादशहाने सर्वांना विचारले, "आपल्या दिल्ली शहरात किती कावळे आहेत हे कोणी ताबडतोब सांगू शकेल का?" कावळ्यांची संख्या सांगणे कुणाला शक्य नव्हते. बरं कावळे मोजल्याशिवाय कावळ्यांची संख्या सांगता येणे शक्य नव्हते. एरवी विनाकारण कोणीही कावळे मोजणे शक्य नव्हते. त्यामुळे बादशहाने प्रश्न विचारला तेव्हा लगेच कावळ्यांची संख्या सांगणे दरबारातील कुणालाही सांगणे शक्य नव्हते. त्यामुळे बादशहाने प्रश्न विचारतात सर्वांच्या नजरा खाली झुकल्या. आता बिरबलाला हाच प्रश्न विचारण्याशिवाय बादशहाकडे पर्याय नव्हता. बिरबलाकडे पाहत बादशहाने विचारले काय बिरबल आपल्या दिल्ली शहरात किती कावळे आहेत ते सांगता येईल का 'अगदी सहज,' क्षणाचाही विलंब न लावता बिरबल म्हणाला. बिरबलाचे हे उत्तर ऐकून सर्व जण आश्चर्यचकित झाले. बिरबलाने कधी दिल्लीतील कावळे मोजले, असा सर्वांना प्रश्न पडला. 'सांग, बरं मग, दिल्लीत किती कावळे आहेत ते?' बादशहाने आज्ञा केली. 'हुजूर, आपल्या शहरात एकूण 48,713 कावळे आहेत. बिरबलाने शहरातील कावळ्यांची संख्या सांगितली हूजुरांना शंका असेल तर मोजून खात्री करून घ्यावी.' 'समजा, यापेक्षा शहरातील कावळ्यांची संख्या जास्त भरली तर?' बादशहाने शंका विचारली. तर दुसऱ्या शहरातून आपल्या कवळ्यांचे पाहुणे आले आहेत असे समजावे बिरबलाने लगेच उत्तर दिले. आणि समज कावळ्यांची संख्या तू म्हणतोस त्यापेक्षा कमी भरली तर बादशहाची दुसरी शंका 'सोपे आहे, बादशहाच्या दुसऱ्या संख्येचे निरसन करताना बिरबल म्हणाला, 'तर आपल्या शहरातील कावळे त्यांच्या नातेवाईकांना भेटण्यासाठी दुसऱ्या शहरात गेले असे समजावे.' बिरबलाच्या या उत्तराने सर्वांच्या चेहऱ्यावर हसू फुलले. बिरबलाला हरविणे खरेच अशक्य आहे याची बादशहाला आणखी एकदा खात्री पटली. **कौशल्य :** कावळ्यांची संख्या मोजण्यासाठी बिरबलाने येथे सरासार विचार करून एक संख्या सांगितली आहे. कारण कावळ्यांची संख्या मोजणे अवघड आहे. हे त्याला माहीत होते त्याच अडचणीचा फायदा घेत त्याने बादशहाला निरूत्तर केले.

# जीवन संपवणे हा समस्येवरचा उपाय नाही



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**आत्महत्यांच्या घटना रोखण्यासाठी जागतिक स्तरावर प्रयत्न सुरू आहेत.भारतातही या संदर्भात जनजागृती करण्याचे प्रयत्न विविध पातळ्यांवर केले जात असले तरी देशातून आत्महत्येची हृदयद्रावक प्रकरणे समोर येतच आहे. गुजरातमधील सुरत शहरात अशीच एक घटना घडली आहे. एका व्यावसायिकाने आधी आई-वडील, पत्नी आणि तीन मुलांना विष पाजले. यानंतर त्याने स्वतः विष पिऊन आत्महत्या केली. आर्थिक संकट हे आत्महत्येचे कारण असल्याचे मानले जात आहे.**

इंटिरियर डिझाईन आणि फर्निचरचा व्यवसाय करणाऱ्या एका व्यावसायिकाच्या कुटुंबाचे बाह्य ग्लॅमर पाहता, तो गंभीर आर्थिक संकटात अडकला आहे आणि इतके भयानक पाऊल उचलू शकतो याचा अंदाज कोणीही बांधू शकत नाही. आत्महत्या करण्यापूर्वी कुटुंबातील सर्व सदस्यांचा जीव घेण्याची ही पहिलीच घटना नाही. अशा घटना वारंवार समोर येत आहेत. कुटुंबातील सदस्यांच्या सुरक्षेची चिंता त्यांच्या मृत्यूचे कारण बनते, हे विडंबनात्मक आहे. आत्महत्या हा कोणत्याही समस्येवरचा उपाय नाही हे सर्वांनाच माहीत आहे, पण आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीला जीवनातून सुटणे हाच एकमेव उपाय आहे असे वाटते. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात संकटे येतात, या संकटांचे प्रकार वेगवेगळे असू शकतात, पण याचा अर्थ मृत्यूला कवटाळावे असे नाही.

कोरोनानंतर आर्थिक संकटामुळे आत्महत्यांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. एनसीआरबी च्या आकडेवारीनुसार, 2021 मध्ये भारतात एक लाख 64 हजारांहून अधिक



लोकांनी आत्महत्या केल्या आहेत. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो ( NCRB ) ने ऑगस्ट 2022 मध्ये भारतातील आत्महत्या मृत्यूंची आकडेवारी जाहीर केली आणि आकडेवारी धक्कादायक होती.

2021 मध्ये देशात एकूण 1,64,033 आत्महत्या झाल्या आहेत, जे एकूण संख्येच्या बाबतीत मागील वर्षाच्या तुलनेत 7.2% वाढले आहे.

आत्महत्येच्या दराच्या बाबतीत, भारतात 12 ( प्रति लाख लोकसंख्येचा ) दर नोंदवला गेला आहे आणि 2020 च्या तुलनेत 2021 मध्ये हा दर 6.2% वाढ दर्शवतो. महाराष्ट्रात सर्वाधिक आत्महत्या झाल्या असून त्यापाठोपाठ तामिळनाडू, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल आणि कर्नाटक या राज्यांमध्ये आत्महत्या झाल्या आहेत. देशातील एकूण आत्महत्यांपैकी 50.4% आत्महत्या या पाच राज्यांमध्ये होतात. आत्महत्येच्या दराच्या बाबतीत, अंदमान आणि निकोबार बेटांवर सर्वाधिक आत्महत्यांचे प्रमाण ( 39.7 ), त्यानंतर सिक्कीम ( 39.2 ), पुडुचेरी ( 31.8 ), तेलंगणा ( 26.9 ) आणि केरळ ( 26.9 ) यांचा क्रमांक लागतो. अहवालानुसार कौटुंबिक समस्या आणि आजार हे आत्महत्येचे प्रमुख कारण होते. 2021 मध्ये आत्महत्या करणाऱ्यांचे एकूण पुरुष-महिला प्रमाण 72.5:27.4 होते, जे 2020 ( 70.9:29.1 ) पेक्षा जास्त आहे. अशाप्रकारे, गेल्या वर्षी पुरुषांच्या आत्महत्येचे प्रमाण आणखी वाढले आहे.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आत्महत्या केलेल्या लोकांमध्ये मोठा वर्ग असा होता ज्यांच्याकडे स्वतःचा रोजगार होता. या प्रकारात एकूण 20,231 जणांनी आत्महत्या केल्या आहेत. एकीकडे नोकरी शोधणारा नको, तर नोकरी देणारा असावा, असा विचार रुजवला जात आहे, तर दुसरीकडे व्यापारी वर्ग आणि लहान स्वयंरोजगार करणाऱ्यांमध्ये आत्महत्येच्या वाढत्या घटना हा चिंतेचा विषय आहे. आत्महत्या करणारी व्यक्ती कोणत्याही वर्गाची असो, ती रोखण्यासाठी प्रत्येक स्तरावर प्रयत्न आवश्यक आहेत. शासन, समाज आणि कुटुंबाच्या पातळीवर या समस्येवर गांभीर्याने विचार व्हायला हवा. अशा लोकांना वेळीच ओळखून त्यांचे योग्य समुपदेशन केले तर ते निराशेच्या अंधःकारातून बाहेर पडून आशेचा किरण अनुभवतील आणि आत्महत्या करण्याचा विचार सोडून देतील.

# सेवामूर्ती ज्ञानव्रती डॉ. दशरथ बाबुराव साळुंखे उर्फ डी.बी. अप्पासाहेब



डॉ. जगदीश पाटील
संपर्क क्र. 8149498020

आधुनिक केसरी

**विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताची तळमळ जोपासून त्यांच्या प्रती आपुलकीची भावना ठेवत सातत्याने अध्ययन-अध्यापन करत राहणे आणि आपल्या विद्यार्थ्यांचे भविष्य कसे घडेल या दृष्टीने कायम प्रयत्न करत राहणे, अशी भूमिका ठेवून सोबतच सामाजिकता व साहित्यलेखनाचा छंद जोपासून समाजाशी नाळ जुळवून समरसतेची भूमिका आदरणीय डॉ. दशरथ बाबुराव साळुंखे उर्फ डि.बी. अप्पासाहेब यांनी घेतली आहे. डॉ. साळुंखे सरांचे मूळ गाव अमळनेर तालुक्यातील मारवड हे असून परिसर व कार्यक्षेत्रात डि.बी. अप्पा म्हणून ते परिचित आहात. त्यांचा जन्म गरीब शेतकरी कुटुंबात झाला. गावातच प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण सुप्रसिद्ध अशा प्रताप महाविद्यालयात घेतले. अभ्यासात हुशार विद्यार्थी म्हणून त्यांची सर्वत्र ओळख निर्माण झाली.**

महाविद्यालयीन जीवनापासूनच सामाजिक व सार्वजनिक कार्याची आवड असल्याने गणेशोत्सव, शिवजयंती, होळी, नूतन वर्ष स्वागत आदी विविध उपक्रमात ते उत्साहाने सहभागी होत असत. त्यांच्यात नेतृत्व गुण उपजतच असल्याने महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थी प्रतिनिधी, भाषा उन्नती मंडळ सेक्रेटरी अशा विविधांगी पदांवर त्यांनी यशस्वी कामगिरी केली. त्यांचे शिक्षण एम.ए., एम.एड्. पीएच.डी. झाले असून त्यांनी नवापूर जि.नंदूरबार येथील बी.एड्. महाविद्यालयात शिक्षणक्षेत्रातील सेवेचा श्रीगणेशा केला. तेथे आणि चोपडा येथील बी.एड्. महाविद्यालयात एकूण 14 वर्ष अध्यापकीय सेवा केली. त्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राजपत्रित अधिकारी वर्ग 2 म्हणून उच्च गुणवत्तेने त्यांची निवड झाली. निवडीनंतर बुलडाणा येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत अधिव्याख्याता म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर जळगाव, धुळे आणि पुन्हा जळगाव अशी एकूण 18 वर्षे अधिव्याख्याता म्हणून सेवा बजावली. शिक्षणक्षेत्रातील सेवेची एकूण 32 वर्षे पूर्ण केली. त्यांनी आपल्या कार्यकाळात मराठी, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र या विषयांचे प्रभावी व नाविन्यपूर्ण अध्यापन केले. आजही उत्तम, विद्याव्यासंगी व विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून त्यांची ओळख आहे. त्याचप्रमाणे शिक्षणक्षेत्रात विविध नवोपक्रम, महाराष्ट्रातील यशस्वी व प्रेरणादायी व्यक्तींच्या मुलाखती, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, शैक्षणिक वाद-संवाद, आपत्ती व्यवस्थापन, रसयात्रा, भित्तीपत्रक, शाळापूर्व तयारी अभियान, विद्या प्रवेश कार्यक्रम, आनंददायी शिक्षण, कृतियुक्त शिक्षण, मूलभूत वाचन-लेखन प्रकल्प, राज्यस्तर आदर्श शिक्षक पुरस्कार परिक्षण, बेटी बचाव उपक्रम, एक तास वाचनासाठी उपक्रम, अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर अशा अनेकानेक शासकीय योजना व उपक्रमांची त्यांनी आपल्या कारकिर्दीत प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी आपले योगदान दिले आहे. एवढेच नाही तर राज्यस्तरावर विविध प्रशिक्षण, संशोधन, लेखन यात सक्रीय सहभाग नोंदवून आपल्या कार्यकर्तृत्वाचा वेगळा ठसा उमटविलेला आहे. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांचे फार मोठे योगदान आहे. मारवड विकास मंच व गिरीशदादा मित्र मंडळ या सेवाभावी संस्थामध्ये त्यांनी कार्य केले आहे. तसेच वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, स्वच्छतेचा पांडुरंग रक्तदान शिबीर, शालेय गुणवत्ता संवर्धन, जलयुक्त शिवार, गरजू विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप,



दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण शैक्षणिक प्रयोग अशा विविधांगी उपक्रमात ते सातत्याने सहभाग होत असतात. त्यांचा लोकसंग्रह अफाट असून त्यांचे अनेक विद्यार्थी शिक्षण, पोलीस, महसूल यासह विविध विभागात उच्च पदावर कार्यरत आहेत. आजही हे विद्यार्थी सातत्याने त्यांच्या संपर्कात असतात. हिच खरी त्यांच्या आयुष्याची उपलब्धी आहे. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांना वाचन, लेखन व चिंतनाची आवड आहे. आई स्व.दमयंतीबाई व वडील स्व.बाबुराव बापूजी हे अल्पशिक्षीत होते. परंतु व्यावहारिक जीवनात ते पारंगत होते. त्यांना उपजतच ओवी, अभंग रचना, जात्यावरची गाणी इत्यादी लोकसाहित्य रचना सहज अवगत होती. आईवडीलांच्या या प्रतिभाशक्तीचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला दिसून येतो. त्यामुळे ते नेहमी कथा, काव्य लेखनातून अभिव्यक्त होताना दिसतात. विविध महाविद्यालयीन वार्षिक अंकांतून व दिवाळी अंकांतून त्यांचे लेख व कविता सातत्याने प्रकाशित होत असतात. त्यांनी आतापर्यंत विविध लेखकांच्या पुस्तकांना प्रस्तावना दिलेली असून समीक्षणात्मक लेखनही केलेले आहे. आशयसंपन्न कथा, काव्य व प्रवासवर्णनपर लेखन त्यांचे आजही सुरू आहेत. दर्जेदार अशा कवितांचा काव्यसंग्रह व कथांचा कथासंग्रह आणि प्रवासवर्णन आपण लवकरच प्रकाशित करून वाचकांसाठी ते उपलब्ध करून देणार आहेत. त्यांच्या कुटुंबाविषयी सांगायचे झाल्यास सुविद्य पत्नी प्रा.सौ. जयश्री साळुंखे मॅडम यांचेही शिक्षणक्षेत्रातील योगदान वाखाणण्याजोगे आहे. डी.एड् व बी.एड्. महाविद्यालयांमध्ये प्राचार्य व गणिताच्या उत्कृष्ट शिक्षिका म्हणून त्यांनी स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. त्यांना सौरभ आणि कौस्तुभ ही दोन मुले असून दोन्हीही उच्चशिक्षित आणि अत्यंत सुसंस्कृत व कुशाग्र बुद्धिमत्ता लाभलेली अशी सुपुत्रे आहेत. त्यांनी कालच संवाद साधताना सेवानिवृत्तीनंतर वाचन, लेखन, योग-प्राणायाम आणि पर्यटन अशी जीवनाची चतु:सुत्री राहिल असा मनोदय व्यक्त केला. सोबतच शिक्षणक्षेत्राशी निगडित राहून आमच्यासारख्या शिक्षकांना मार्गदर्शन करीत राहावे अशी त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त करीत असून त्यांच्या चतुःसूत्रीमध्ये या एका सूत्राची वाढ करून ती पंचसूत्री करावी, ही त्यांना नम्र विनंती आहे.

आपल्या 32 वर्षांच्या प्रदीर्घ सेवेची भूमिका समर्थपणे बजावून मंगळवार, दि. 31 ऑक्टोबर 2023 रोजी ते सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त आज रविवार, दि. ३ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वाजता जळगाव येथील हॉटेल रिगल पॅलेसमध्ये कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सेवामूर्ती ज्ञानव्रती डॉ. दशरथ बाबुराव साळुंखे उर्फ डि. बी. अप्पासाहेब यांना सेवापूर्तीच्या खूप खूप शुभेच्छा. तसेच सेवानिवृत्तीनंतर त्यांना निरोगी व आनंदी दीर्घायुष्य लाभो, हीच प्रभूचरणी प्रार्थना.

## लय भारी सुगरण



सौ. सविता अ. खंडगावकर, नांदेड.
संपर्क क्र. 90283 25973

आधुनिक केसरी




आपल्याकडे बऱ्याच वेळेला घरी फळे असतात आणि टी राहिली की खायचा कंटाळा येतो त्याच वेळेला टी फळे जर कापली आणि त्यामध्ये कस्टर्ड टाकला तर किती छान ना ! चला तर मग आज पाहुयात फ्रूट कस्टर्ड. फ्रूट कस्टर्ड हे एक मिष्टान्न आहे जी चिरलेले हंगामी फळे थंडगार कस्टर्ड सॉस मध्ये मिसळून बनवली जाते. कस्टर्ड ही एक पारंपरिक आणि सॉसी डिश आहे जी क्रीम व दुधाने तयार केला जाते. जास्तीत जास्त पाणी पिणे, फळे खाणे आणि आरोग्यदायी पेये घेणे योग्य ठरते. उष्णतेमुळे शरीरात डिहायड्रेशनची समस्या उद्भवू शकते, त्यामुळे आरोग्याची विशेष काळजी घ्या. आज आम्ही तुम्हाला अशाच एका रेसिपीबद्दल सांगत आहोत जी तुम्ही घरी सहज बनवू शकता.. १/२ लिटर दूध २ चमचे VANILLA कस्टर्ड पावडर ४ चमचे साखर विविध कापलेली फळे- सफरचंद, आंबा, द्राक्षे, डाळिंब, केळी, नाशवंती ई. सफरचंद – 1 कप सोललेली आणि चिरलेली पेरू – अर्धा कप चिरलेला डाळिंबाचे दाणे – १ कप आंबे – 1 कप सोललेली आणि चिरलेली द्राक्षे – 1 कप नट – * कप (मी काजू, अक्रोड आणि पिस्ता वापरले) खजूर – * कप चिरून सुलताना / किश्मीश – 3 टेस्पून तुटी फ्रूटी – 3 चमचे चेरी – 2 चमचे चिरून चूर्ण साखर – * 4 कस्टर्ड:मी उपलब्ध व्हॅनिला कस्टर्ड रेडीमेड वापरले आहे. जर तुमच्याकडे कस्टर्ड नसेल तर कॉर्न फ्लोअरमध्ये पिवळा फूड कलर आणि व्हॅनिला एसेन्स घाला आणि दुधात मिसळा. कस्टर्ड ताकासारखे घट्ट होईपर्यंत उकळवावे आणि आगीतून काढून टाकावे. किंवा थंड झाल्यावर आणखी घट्ट होते. **सार :** मी व्हॅनिला कस्टर्ड वापरला आहे पण त्यात काही मिश्रित फळ सार जोडले आहे. यामुळे कस्टर्डची चव वाढते. जर तुमच्याकडे मिक्स्ड फ्रूट एसेन्स नसेल तर तुम्ही अननसाचे ५-६ थेंब वापरू शकता.

**फ्रूट कस्टर्ड रेसिपी कृती** १. सर्वप्रथम दूध गरम करण्यास ठेवावे. येथे आपण १/२ लिटर दूध घेत आहोत. १ कप दुध बाजूला काढुन ठेवावे. सर्व दूध गरम करण्यास ठेवू नये.२. दूध गरम होईतोपर्यंत बाजूला ठेवलेलया दुधात २ चमचे कस्टर्ड पाऊडर मिक्स करून घ्या. आधी २ चमचे कस्टर्ड पाऊडर मिक्स करून घ्या जर वाटल दूध घट्ट नाही झाले तर अजून १ चमचा कस्टर्ड पाऊडर घालू शकता. ३. एक गोष्ट लक्षात घ्या की कधीही कस्टर्ड पाऊडर डायरेक्ट दुधात टाकू नका त्याने गटुळया होऊ शकतात. ४ . आता आपण गॅस वर ठेवलेल्या दुधात कस्टर्ड पाऊडर मिक्स केलेले दूध घाला . ५. त्या नंतर गॅस कमी यांचे वर ठेवावा . ६. आता आपण यात ४ TSP साखर घाला. ७. त्या नंतर दूध घट्ट झाले की गॅस बंद करवा. ८ . व ते दूध थंड होई पर्यन्त वाट बघवि व तोपर्यंत फळे चिरून घ्यावीत .

९ . दूध थंड आले की त्यानंतर त्यामध्ये चिरलेली फळे टाकावीत .

१० . त्यानंतर त्यामध्ये काजू व बदाम टाकून ते मिश्रण पूर्णपणे ढवळून घ्यावे .

११ . आणि मग छान असा सर्वांना सर्व करावा .

# कुणबी नोंदी सादर करण्यासाठी विशेष कक्षाची स्थापना

## कुणबी नोंदीचे अभिलेख सादर करा : विभागीय आयुक्त

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** कुणबी नोंदीचे अभिलेख सादर करण्यासाठी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी आज विभागीय समन्वय अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. तसेच जिल्हानिहाय समन्वय अधिकारी व विशेष कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. मराठा समाजातील ज्या व्यक्तींकडे कुणबी नोंदीचे अभिलेख अथवा पुरावे असतील त्यांनी संबंधित जिल्हा समन्वय अधिकारी यांचेकडे ते सादर करण्याचे आवाहन, विभागीय आयुक्त यांनी केले आहे. मराठा समाजातील व्यक्तींना मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्यासंदर्भात कार्यपद्धती विहीत करण्यासाठी मा.न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात मराठा समाजातील व्यक्तींकडे असलेल्या कुणबी नोंदीचे अभिलेख जमा करण्यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दृकश्राव्य माध्यमाद्वारे सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेवून निर्देश दिले. त्यानुसार नागपूर विभागासाठी विभागीय समन्वय अधिकारी म्हणून उपायुक्त (सामान्य) प्रदीप कुलकर्णी यांची नेमणूक करण्यात आली आहे. जिल्हा समन्वय अधिकाऱ्यांची नेमणूकही करण्यात आली आहे. यानुसार नागपूर जिल्ह्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी, भंडारा जिल्ह्यासाठी भूसंपादन अधिकारी आकाश अवतारे, चंद्रपूर जिल्ह्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, गोंदिया जिल्ह्यासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी प्रकाश पाटील, गडचिरोली जिल्ह्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी सुनिल सूर्यवंशी आणि वर्धा जिल्ह्यासाठी जिल्हा पुनर्वसन अधिकारी अंजली मरोड यांची जिल्हा समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. जिल्हानिहाय विशेष कक्षांची स्थापनाही करण्यात आली आहे. ज्या मराठा व्यक्तींकडे कुणबी नोंदी असतील त्यांनी संबंधित जिल्हा समन्वय अधिकारी किंवा विशेष कक्षाकडे कार्यालयीन वेळेत असे अभिलेख सादर करावे, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी केले आहे.



# रामकृष्ण वाघ महाविद्यालयाची नागपूर आकाशवाणी केंद्राला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांनाच अभ्यासक्रमातील विषय प्रत्यक्ष अनुभवायला मिळणे आणि या प्रात्यक्षिकातून विद्यार्थ्यांमध्ये संबंधित विषयाची आवड निर्माण व्हावी यासाठी रामकृष्ण वाघ कला व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभागाद्वारे विद्यार्थ्यांना नागपूर आकाशवाणी ला भेट देऊन आकाशवाणीच्या विविध विभागांची ओळख करून देण्यासोबतच वाचन संस्कृती या विषयावर एका कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले. ज्यात महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख प्रा. सायली लाखे पिदळी यांनी विद्यार्थ्यांना बोलते केले. अवांतर वाचनाचे महत्व व गरज या विषयावर आयोजित या कार्यक्रमात विविध प्रश्नोत्तरातून विद्यार्थ्यांपर्यंत वाचनाचे महत्व पटवून देण्यात आले. हा कार्यक्रम आकाशवाणी नागपूरच्या केंद्रावरून येत्या रविवारी ठिक ५ वाजता इंद्रधनुष्य या कार्यक्रमातून प्रसारीत करण्यात येणार आहे. आकाशवाणी नागपूर केंद्राचे कार्यक्रम अधिकारी मा. विजय राजपूत यांनी यावेळी प्रा. सायली लाखे- पिदळी यांनी विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या आकाशवाणी केंद्र भेटीच्या उपक्रमाचे कौतुक करीत विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनातच आकाशवाणी म्हणजे काय ? येथिल काम कस चालते ? रेकॉर्डिंग कस केल्या जातं ? अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

बि.ए. पदवी अभ्यासक्रमातील उपयोजित मराठी या भागात प्रसार माध्यमातील लेखन कौशल्य व त्या संबंधित अभ्यासक्रमाचा समावेश आहे. याच विषयाच्या अनुषंगाने मराठी विभागाद्वारे या आकाशवाणी भेटीचे आयोजन करण्यात आले होते. प्रतीक्षा बोपचे (बी.ए तृतीय वर्ष)यांनी स्वामी विवेकानंद यांचे बालपण तर, साक्षी आमधरे(एम. ए प्रथम वर्ष)ची विद्यार्थिनी यांनी स्त्रियांचे मानसिक आरोग्य संतुलनासाठी घ्यावयाची काळजी या विषयांवर रेकॉर्डिंग केले. छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे सचिव मा.डॉ. मारोती वाघ तथा संचालिका सौ. लता वाघ तसेच प्रभारी प्राचार्य पंकज झगडे यांच्या मार्गदर्शनाखीली आयोजित या नागपूर आकाशवाणी केंद्रभेट कार्यक्रमात मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेत संपूर्ण माहीती जाणून घेतली.

# १५ दिवसांसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) जिल्हयामध्ये मागील दिवसापासून सोशल मिडीयावर वास्तविधानावर इतर कारणावरून हिन्दू मुस्लीम या दोन समाजात वाद होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. आगामी काळात उपजिल्हा हिन्दु मुस्लीम किंवा दलीत सवर्ण वाद होवुन कायदा व सुवस्येचा प्रश्न निर्माण होवू नये तसेच आगामी काळात छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) जिल्हयात पोस्टरबाजी वरन हिंदु मुस्लिम समाजात ते निर्माण होवुन काही अनुचित प्रकार पडु नये तसेच संभाजीनगर जिल्हयात मराठा समाज धनगर समाज आरक्षणा वरुण विविध ठिकाणी मोर्चे, निदर्शने होत आहेत. म्हणून शस्त्र बंदी व जमाव बंदी लागू केली आहे.

# चंद्रपूरचा दीपक ठरला ब्रिटिश सरकारचा 'गोल्ड' मॅन !

## देशाचा सन्मान : लंडनमधील शैक्षणिक स्वयंसेवेची जागतिक दखल

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** युनायटेड किंगडम येथे जगभरातून



उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या तरुणांना शिक्षणासह ज्यांच्या कामाचा सामाजिक प्रभाव तेथील सरकारवर पडतो, त्यांना ब्रिटीश सरकारच्या फॉरेन कॉमनवेल्थ डेवलपमेंट विभागाकडून गौरवण्यात येते. यंदा जगभरातील १६८ देशातील १६०० स्कॉलर्समधून चंद्रपूरचा दीपक ब्रिटिश सरकारचा 'गोल्ड'मॅन ठरला आहे. जिल्ह्यातील गडचांदूर येथील लंडन येथे कायद्याचे उच्चशिक्षण घेणाऱ्या ॲड.दीपक यादवराव चटप या केवळ २६ वर्षीय भारतीय तरुण वकिलाला आंतरराष्ट्रीय संस्थांतील सामाजिक योगदानासाठी चेव्हनिंग गोल्ड व्हालंटरिंग पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. लंडनमधील आंतरराष्ट्रीय संस्थांतील प्रभावशाली शैक्षणिक स्वयंसेवा योगदानाची जागतिक स्तरावर दखल झाल्याने देशाच्या शिरपेचात मानाचा तूरा रोवला आहे. ॲड. दीपक चटप यांनी लंडनमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमादरम्यान सामाजिक न्याय, शांतता आणि मानवी हक्कांसाठी समर्पित आंतरराष्ट्रीय संस्थांसाठी स्वेच्छेने सुमारे १६२ तास काम केले. ब्रिटन सरकारच्या फॉरेन कॉमनवेल्थ डेव्हलपमेंट विभागातर्फे वर्षभर स्वयंसेवेसाठी असाधारण बांधिलकी दाखविणाऱ्या जगभरातील स्कॉलर्सतून हा पुरस्कार दिला जातो. नुकताच त्यांना हा सन्मान लंडन येथे प्रदान करण्यात आला. ॲड.दीपक चटप यांना गेल्या वर्षी ब्रिटीश सरकारने प्रतिष्ठेची 'चेवनिंग' शिष्यवृत्ती दिली होती, ज्यामुळे त्यांना लंडनमधील सोएस या जागतिक नामांकित विद्यापीठात कायद्याचे पदव्युत्तर शिक्षण घेतले. या संधीचे सोने करत दीपकने जगभरातील स्कॉलर्सतून आपली छाप सोडली. आदिवासीबहुल चंद्रपूर जिल्ह्यातील गडचांदूर येथील ॲड.दीपक चटप यांनी चंद्रपूर-गडचिरोलीसह राज्यातील सामाजिक प्रश्नांवर केलेले कायदेविषयक रचनात्मक काम समाजाला प्रेरणादायी ठरले आहे. संविधानिक मुल्ये, विधायक धोरणे, ग्रामीण युवकांची शैक्षणिक क्षमता बांधणी, हक्क व अधिकाराविषयी कृती युक्त भुमीका दिशादर्शक ठरली आहे. लंडन येथे उच्चशिक्षणानंतर देश-विदेशात मोठ्या पगाराच्या संधी असूनही शिक्षणाचा उपयोग समाजहितासाठी व्हावा, या हेतूने चंद्रपूर जिल्ह्यात परत येवून रचनात्मक काम उभे करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.








## कुणबी...!

माझ्या कुणबी बापाचे,
काळ्या मातीचे शेत.
दिनरात राबणे ही,
त्याची जगण्याची रीत.

जीव ओतून शेतात,
रोज करी मेहनत.
तेव्हा सालचंदी होई,
ती कष्टाची बरकत.

कसे तरी पिके येती,
त्यात होई गारपीट.
कुणब्याच्या घरामध्ये,
भाकरीला नाही पीठ.

काळ्या भुईची ममता,
असे कुणब्याच्या पोटी.
उभी हयात घालितो,
आस धरूनीया मोठी.

फळबागा- कुणब्यांना,
येती सदा साडेसाती.
या अस्मानी- संकटांनी,
पिके येत नाही हाती.

चारा- पाण्याच्या चिंतेने,
बाप बसतो मुकाट.
गंगा- यमुना डोळ्यात,
भरलेली काठोकाठ.

नेहमी उपाशी जगे,
अनामभूचा मालक.
माझा हा कुणबी बाप,
साऱ्या जगाचा पालक...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४.

## शुभमंगल

बाहुला रुसला
कोण्यात बसला
त्याला तर हवी
छानशी नवरी.....।।
सुंदरच हवी
गोरीपान हवी
सोनेरी केसांची
बाँबकटवाली........।।
ताईने आणली
नवीन बाहुली
पाहून हसला
नवरा बाहुला.......।।
गोरज मुहूर्त
बाल मित्र आले
अक्षदा टाकून
सुमंगल झाले........।।
दत्ता तरलगट्टी
पंढरपूर.

## .सरमाया

मुडकर देखा तो बीती
गलियोंने मुझको चौंकाया
पिघले मोमसा हर नुक्कडपर
मैने खुदही को पाया
जान गया के मै जल रहा हूं
शायद जबसे मै चल रहा हूं
हर इक मोडपे हर नुक्कड पे
कतरा कतरा पिघल रहा हूं
बुझ भी तो इक पल जाउंगा
बीते कल मे ढल जाउंगा
तब इन बुंदोंमे ही दूनिया
पायेगी मेरा सरमाया
जीन बुंदोमें हर नुक्कड पर
आज खुद ही को है पाया

गुरु ठाकूर.

## कांद्याचा भाव

कांद्याचा भाव वाढला पाहून
सर्वाचे डोळे ओलेचिंब झाले
किती चिंता आहे
बळीराजाची..?
आजकाच त्याचीच आठवण
काढू लागले

कांदा रडवतो म्हणातात
आम्हांला बळीराजा तर
आयुष्यभर रडतो
तेव्हा कोणाच्या डोळ्यात
पाणी येत नाही सारा जग स्वतः
स्वार्थी होऊन जगतो

कांद्याचा भाव वाढला पाहिजे
बळीराजाला न्याय
मिळायलाच पाहिजे
त्याच्या प्रत्येक मालात
भाववाढ होऊन बळीराजा
जगाला कळला पाहिजे

कांदा रडवतो म्हणतात सारे
पण, बळीराजाला आधार
देत नाहीवेतनावर, वेतन
मागण्यासाठी
भीक मागायला विसरत नाही

बळीराजाचे राज्य येवो
मगच बळीराजा कळेल जगाला
काल त्याला रडवून सोडले
आज कांदा रडवतो पैसे
वाल्यांना

सौ. संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

## आरक्षण




आरक्षण नाही तर सरकार नाही
सरकारच्या वाटेत उभा आता
मराठा काटा
नाही कुठला पक्ष,
नाही कुठला नेता
आमचं मत राहिलं थेट नोटा....
गावा गावात आता
राजकीय नेत्यांचा प्रवेश बंद
गावात चुकून जरी आला
नेता काळ्या वंगणाचा डबा
तयार आता
आता फक्त गावात प्रवेश बंद
केला नाही मिळालं आरक्षण तर
मतदानावर बहिष्कार आता
नाही कुठला पक्ष,
नाही कुठला नेता
आमचं मत राहिलं थेट नोटा....
एक लाख एक मराठा
द्यावाचं लागणार आरक्षणाचा
आम्हांला आमचा वाटा
कसं देत नाही
घेतल्या शिवाय माघार नाही
नाही कुठला पक्ष,
नाही कुठला नेता
नाहीतर आमचं मत राहिलं थेट
नोटा ....
मराठा आता झुकणार नाही
शेवटच्या श्वासापर्यंत लढत
राहणार मरण आलं तरी
घाबरणार नाही
सरकारच्या बोकांडी बसून
आरक्षण आता घेणार
आरक्षण नाही,तर सरकार नाही
नाही कुठला पक्ष ,नाही कुठला
नेता आमचं मत राहिलं थेट
नोटा....
किती ही बंडल फेका तुम्ही
हवं तर सगळे पक्ष खरेदी करुन
घ्या पण मराठ्याशिवाय तुमची
सत्ता नाही नाही कुठला पक्ष,
नाही कुठला नेता
आमचं मत राहिलं थेट नोटा....
लक्ष्मण वाल्डे-कन्नड
सर्व मराठा बांधवास समर्पित

## भुतं

तुमच्या आमच्या मानगुटीवर
अतृप्त इच्छांची भूतं...!
मोठेपणा आणि सन्मानाचं भूत
श्रेयाचं भूत.... वर्चस्वाचं भूत
अनावश्यक श्रीमंतीचं भूत ...!
जातिवादाचा सैतान... प्रतिष्ठेचा नाग
विषाचे जहरी फुत्कार सोडीत असतो ...!
राजकारणाचं भूत, सर्वात अद्‌भूत
सर्व मतदार उमेदवारांच्या थाटात
सर्वच पक्ष एकमेकांच्या गोटात ...!
सत्ता झाली दासी अन्
सामान्य जनतेची झाली मधमाशी !
सन्माननीय हुतात्म्यांच्या नावांच्या
रस्त्यांवरून, कधी गल्लीत तर दिल्लीत,
गजबजाटात माणसांचं ...भटकणं ..!
सत्ताधारी "विक्रमाच्या" मानगुटीवर
अतृप्तांचा "वेताळ" ...!
असतील शितं
तिथे जमतील भूतं.
माणुसकीच्या स्मशानात
पुन्हा पैशाच्या उत्पादनात रमली भूतं
© कवी विवेक जोशी
छत्रपती संभाजीनगर
मो.9850433178

## केलीत मी उद्याची...

केलीत मी उद्याची स्वप्ने तुम्हा बहाल
मज झोपडी बरी ही, घ्यावे तुम्ही महाल

होऊन धुंद गावे, गाऊन सुखवावे
सुखवून तृप्त व्हावे, हे एक मजसी ठावे

घ्या सूरही हवे तर, गाणे मलाच ठेवा
अंधारयात्रेतला या तो एकमेव ठेवा

ते हार ते तुरे अन् टाळ्या तुम्हास लाहो
एकांती, विजनी या मम काव्यस्त्रोत वाहो

काव्यात डुंबतो मी, काव्यात नाहतो मी
जगण्यात काही क्षण हे, स्वर्गास पाहतो मी

उद्धव भयवाळ
१९, शांतीनाथ हाऊसिंग सोसायटी
गादिया विहार रोड, शहानूरवाडी
छत्रपती संभाजीनगर ४३१००९
मोबाईल: ८८८८९२५४८८

## ओढ मातीची

ते प्रभातीचे रंग
सुमन अन फुलपाखरांचा संग
विहंगही आपुल्याच मस्तीत दंग
पाहण्या नयन आजही आतुरले ..
गायीचं गोठ्यात हंबरणं
आजीचं हरिपाठ गुणगुणणं
वात्सल्य, प्रेम हळूच झरणं
साठवण्या मन आजही आतुरले...
तो दुपारचा प्रहर
मंद झुळूक, शितल छायेचा डवर
जोडीला चटणी अन भाकर
खाण्या मन आजही आतुरले....
मी तू पणा कुठेच नसे
फाटक्या संसारात हास्य असे
पसाभर दानातही पुण्य दिसे
ती कुटी उघडण्या मन आजही आतुरले..
तो मायेचा डोईवरचा हात
चांदण्यात जागवलेली रात
दुःखातही टाकलेली कात
धडा गिरवण्या मन आजही आतुरले..
कुठे माळावरचा उनाड वारा
मृदगंधित पाऊस धारा
मोहरलेली, शृंगारीत धरा
ते क्षण झेलण्या मन आजही आतुरले...
कवयित्री -©रंजना सानप
मायणी (सातारा )
मोबाईल क्रमांक -9049548323



## स्वप्नांची रांगोळी

विस्कटली देवा सारी
गोड स्वप्नांची रांगोळी
सप्तरंगी स्वंप्ने सारी
स्वप्नांमध्येच विरली

उभ्या आयुष्याची होता
भग्न वैराण रे माती
लागे काटे वेडगळ
रुक्ष बाभळीच्या देठी

जीवनाच्या संग्रामात
हार वाट्याला रे आली
शोध घेतांना फुलांचा
काटे चोरून बोचली


सारे उन्हाळेच का रे
देवा लिहिले तू भाळी
दुःख एकच जीवनी
नाही भेटली सावली

आता सरली चाळीशी
आस उरी जगण्याची
संसाराच्या मायेमध्ये
घालमेल रे जीवाची
@ ज्ञानेश्वर गायके कन्नड

## डोंगर दऱ्या

अवती भवती डोंगर दऱ्या
साठवून घेऊ
डोळ्यांत साऱ्या
सळसळ करी
हिरवे पानखळका घेई
हरणी कान वारा फिरे
नभात भरभर ढग उडवी
पाऊस झरझर कडे कपाऱ्या
उधळी गंध पाखरे नभान
उडती स्वच्छंद गवत फुलांची
भरे सभा डोंगर दादा
सदा उभा प्राणी तुडवी
जंगल वाटा पायात मोडे
रिंगण काटा दगड गोटे
निर्झर झरे आनंद साऱ्या
गगनात भरे
गुलाब बिसेन, गोंदिया
मो. नं. 9404235191





## निसर्ग

धरती आपुली सुंदर सुंदर
हिरवळ आहे चोहीकडे दिसते
का कोठे वनराई ? काँक्रिटची
जंगले इकडे तिकडे!
संथ वाहणाऱ्या सुंदर नद्या
मोजा त्यातील प्लास्टिकच्या
बाटल्या उंच उंच रम्य डोंगरावर
खाणींच्या नक्षी कोणी
रेखाटल्या?
रस्त्याकडील उभे उंच उंच वृक्ष
पानांचा रंग तांबडा की
हिरवा ?
कोठे गेला तो सांजवेळी
जाणवणारा थंड थंड गारवा ?
छाया प्रमोद पाटील,
वास्को, गोवा.



## तुझ्या आठवणीत..

तुझ्या आठवणीत..... मी.
तुझ्यात इतकी गुंतले मी....,.
सावरण्याची इच्छाच नाही !
क्षणाक्षणाला तुझ्याच
आठवणी,
अस्तित्वाची माझ्या मलाही
जाण नाही.
रोजच तुझ्यात गुंगते मी....
का पण काही कळत नाही!
समजवणारे तर समजावुन
थकले,
मलाच बहुतेक नै कलुन
घ्यायचे नाही.
तु तर तमाखुशीत अशीन.....
मी माझी जगदी आहे!
दररोज मनात समते सारखी,
ती कमी फक्त तुझी आहे"..

## शेतकरी

तळपता सूर्य डोक्यावर घेऊनी
जेवताना कांदा भाकर खाऊनी
तापलेल्या मातीला घामाने
भिजवूनी पिक निर्माण करतो
तो शेतकरी शरीरात असे
काहीतरी जे शरीरात ऊर्जा
निर्माण करी सगळे त्याला
अन्नधान्य म्हणती जरी ऊर्जा
तिच निर्माण करी शेतकरी
शेतीसाठी हा कर्ज काढी
कर्जासाठी जाई सावकाराच्या
दारी निसर्गही कधी कधी कोपे
भारी धान्याची सर्व नासाडी
करी शासनही अशावेळी
मदत न करी मग शेतकरी
आत्महत्या करी "कधीतरी
मध्येच सरकारला जाग येई
एखाद्या पिकाला हमीभाव देई
आश्वासन असे जे कधी पूर्ण न
होई अशामुळेच रोज शेतक-
यांचा जीव जाई !!!
मटर कविता यांना समर्पित
आहे
नितीन अशोक साळवी -
९८९२०१९९०२

## ओंजळीचे रान

ओंजळीचे रान माझे चिमटीचा
पेर होता घेतलेला घास माझा
फक्त माझा शेर होता.
मी कुणाचा दास नाही ना
कुणाचा बडवा ते विषाच्या
घागरी मी अमृताचा गडवा
पेरतो मी सदगुणांना भोवतीने
भोवताली दुर्गुणांचे वेड त्यांना
सदगुणांना कोण वाली?
दुर्जनांचा हा तमाशा सज्जनांचा
गाव कोठे भोक नाही एक
जिला ऐसी येथे नाव कोठे ?
वाचवू मी कसा है.
बुडणारे जग सारे संपले बध
बळ माझे ईश्वरा तू धाव घे रे,
विजय शेंडगे, पुणे



## लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**




पुरुषाने स्त्रीला चॉकलेट भेट देण्याचं गूढ काय आहे?

तर हे रोमँटिक गिफ्ट आणि स्वीट आहे. ज्यामध्ये भरपूर प्रमाणात PEA (फिनाइल इथेनाल अमाइन) असते. म्हणून प्रेमात पडण्यास हे मदत करते. (PEA हे एक नैसर्गिक रसायन असून, ते प्रेमाचे रेणू तयार करते.) पण अति तिथे माती म्हणतात तसे, जास्त चॉकलेट खाल्ले तर डोकेदुखी होते. चॉकलेटप्रमाणे स्ट्रॉबेरी आणि मसाल्यांच्या पदार्थांमध्येही PEA असते.

**फिमेल सेक्स हार्मोन्स म्हणजे काय ?**




आता जाणून घेऊया स्त्री शरीरातील हार्मोन्सबद्दल. स्त्री जेव्हा वयात येते तेव्हा तिच्या शरीरात अनेक बदल घडतात. जसे की मासिक पाळी येणे, बीजांड व अंडाशय तयार होणे, शरीरात लव येणे, स्तनांची वाढ होणे अशा शारीरिक बदलांबरोबरच याकाळात स्त्रीमध्ये मानसिक बदलही घडत असतात. यामागे कारण असतात हार्मोन्स. स्त्रियांमध्ये इस्ट्रोजन, प्रोजेस्टेरॉन, टेस्टोस्टेरॉन, प्रोलॅक्टिन, सिरम एफ.एस.एच., सिरम एल. एच. असे हार्मोन्स असतात. टेस्टोस्टेरॉन हे पुरुष हार्मोन आहे. मात्र तरीदेखील ते स्त्रीमध्ये आढळते आणि त्याला कारण आहे बीजांड (ओव्हरीज) तयार करण्याची प्रक्रिया. तसेच इस्ट्रोजन तयार करण्यासाठी सुद्धा त्याचा वापर होतो. याचं स्त्री-शरीरातलं प्रमाण जर जास्त असेल तर ते उत्तेजना वाढवतं म्हणून रजोनिवृत्तीनंतर याची मात्रा कमी झाल्यामुळे भावनादेखील कमी होतात. पाळी गेल्यानंतर अनावश्यक केस आणि आवाजात बदल होणे या गोष्टी घडतात. लेझर शस्त्रक्रियेच्या माध्यमातून यावरही उपाय आहेच.



डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

इस्ट्रोजनचं स्त्री शरीरातलं कार्य काय असतं ?

इस्ट्रोजन नावाचे हार्मोन मासिक पाळी, अंगाची वाढ व गर्भाशयाची वाढ करून त्याला जनन प्रक्रियेसाठी क्रियाशील बनवते. रजोनिवृत्ती जवळ आली की इस्ट्रोजन कमी होत जातात. आणि हळूहळू पाळी बंद होते. यामुळे कोरडेपणा, भावना कमी होणे या गोष्टी होतात आणि त्यामुळे स्त्रियांना चिडचिड होणे, निद्रानाश, मानसिक तणाव, अशा समस्यांना सामोरे जावे लागते. म्हणून हार्मोन्सचे संतुलन योग्य राखणे अत्यंत महत्त्वाचे असते. आता समस्या... स्त्री शरीरातली इस्ट्रोजनची पातळी कमी झालीच तर यावर इस्ट्रोजन व प्रोजेस्टेरॉन थेरपीचा उत्तम पर्याय उपलब्ध आहे आणि तो करून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. कारण या हार्मोनची पातळी कमी होण्याचा आणि लैंगिक भावनांशी थेट संबंध आहे. अंगातला कोरडेपणा घालवण्यासाठी विविध क्रीम्स, गोळ्या उपलब्ध आहेत. रजोनिवृत्तीनंतर भावना पुनरुज्जीवित करण्यासाठी टेस्टोस्टेरॉन थेरपी उपलब्ध आहेच. त्याचा लाभ करून घेता येईल.

# त्यांनी जगाला हसविले पण त्यांचे अश्रू कोणी पुसले ?

आधुनिक केसरी

चित्रपट नवा असो किंवा जुना त्याचा विषय चांगला असेल तर असा चित्रपट प्रेक्षकांच्या मनाला भिडतो अथवा त्यांचे मन हेलावून टाकतो आणि त्या चित्रपटातील कलावंत प्रेक्षकांच्या स्मरणात राहतात. चित्रपटात काम करणाऱ्या प्रत्येक कलावंताचे नाव प्रेक्षकांना ठाऊक असतेच असे नाही. काही कलावंतांना प्रेक्षक भले नावाने ओळखत नसले तरी त्यांच्या अभिनयामुळे ते कलावंत प्रेक्षकांच्या चांगलेच स्मरणात राहतात. अशाच एक अभिनेत्री होत्या मनोरमा ! मनोरमा यांनी नायिका म्हणून आपली चित्रपट कारकीर्द सुरू केली होती. परंतु पुढे पुढे वय जसे वाढत गेले तसे त्यांच्या शरीराचे आकारमानही वाढत गेले ! पण त्यांनी अभिनयाच्या क्षेत्रातून माघार न घेता त्या चरित्र अभिनेत्री बनल्या आणि आपले वैशिष्ट्य कायम राखले. आपल्या ६० वर्षांच्या प्रदीर्घ अभिनय-कारकिर्दीत त्यांनी विनोदी प्रकारच्या तसेच खाष्ट स्त्रीच्या भूमिका केल्या. कपाळाला आठ्या घालून आपले डोळे त्या गरगर फिरवीत तेव्हा त्यावेळी त्यांच्यासमोर कितीही मोठा कलावंत का असेना पण प्रेक्षक त्यांच्याकडे आणि त्यांच्या अभिनयाकडे काणाडोळा करूच शकत नसत. मनोरमा आपल्या चेहऱ्यावरील हावभाव आणि देहबोली याद्वारे प्रेक्षकांना आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देत असत. मनोरमा यांचा जन्म १६ ऑगस्ट, १९२६ या दिवशी अखंड भारतातील लाहोर शहरात (आता पाकिस्तानात) झाला. त्यांचे मूळचे नाव एरिन आयझॅक डॅनिअल असे होते. मनोरमा यांचे पिता भारतीय ख्रिस्ती होते तर माता मूळची आयर्लंडची (आयरिश) होती. त्या आपल्या आई-वडिलांचे एकुलते एक अपत्य होत्या. त्यांचे शालेय शिक्षण लाहोरमधेच झाले. शिक्षण चालू असतानाच त्यांनी शास्त्रीय नृत्याचे प्रशिक्षण घेतले आणि त्यासमवेतच संगीताचेही विधिवत शिक्षण प्राप्त केले. त्या नवव्या इयत्तेत शिकत असताना त्यांच्या शाळेत एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रतिष्ठित पाहुण्यांसमोर लहानग्या मनोरमाने आपली नृत्यकला सादर केली. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या मान्यवरांमधे प्रसिद्ध चित्रपट निर्माते रूप के. शौरी यांचाही समावेश होता. बालिका मनोरमाच्या नृत्यामुळे शौरी कमालीचे प्रभावित झाले आणि त्यांनी आपल्या आगामी चित्रपटात तिला संधी देण्याचे तिथल्या तिथे ठरवून टाकले. पण झाले असे, की बालिका एरिनचे `मनोरमा' असे नवे नामकरण करणारे निर्माते शौरी आपला नवा चित्रपट निर्माण करण्यापूर्वीच त्यांचे एक निर्माते मित्र दलसुख एम. पंचोली यांनी मनोरमाला आपल्या `खजांची' या चित्रपटासाठी करारबद्ध करूनही टाकले ! `खजांची' हा चित्रपट १९४१ साली प्रदर्शित झाला आणि लोकप्रिय होऊन आर्थिकदृष्ट्याही यशस्वी झाला. त्या काळातील प्रख्यात अभिनेते चंद्र मोहन त्यांच्या इतर चित्रपटांमधील भूमिकेसाठी मनोरमा यांच्या नावाची शिफारस करू लागले. त्यानंतर मनोरमा यांनी अनेक चित्रपटांचे करार केले ; परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताची फाळणी होणार असल्याच्या बातम्या येऊ लागल्याने वातावरण अत्यंत तणावपूर्ण बनल्याने त्यांचे ते चित्रपट प्रदर्शितच होऊ शकले नाहीत ! भारत स्वतंत्र होण्यापूर्वी काश्मिरी पंडित राजन हक्सर यांच्याशी मनोरमा विवाहबद्ध झाल्या होत्या. देश स्वतंत्र झाल्यावर त्या पतीबरोबर मुंबईला आल्या. मुंबईत आल्यावर राजन हक्सर चित्रपट निर्माते बनले आणि त्याचबरोबर चित्रपटांमधे भूमिकाही करू लागले. मनोरमा यांनी अभिनय क्षेत्रात थोडाफार संघर्ष केल्यावर त्यांना `लच्छी' या पंजाबी चित्रपटात भूमिका मिळाली. १९४९ साली प्रदर्शित झालेला हा `लच्छी' चित्रपट बराच चालल्याने मनोरमा यांच्याकडे भूमिका चालून येऊ लागल्या. १९५० सालातील `हंसते आंसू' आणि १९५३ सालातील `परिणीता' या दोन चित्रपटांमुळे निर्माते-दिग्दर्शकांना त्या आपल्या चित्रपटात हव्यातच असे वाटू लागले. एकापेक्षा एक वरचढ चित्रपटांमधे मनोरमा दिसू लागल्या. हेमा मालिनी यांची दुहेरी भूमिका असलेल्या रमेश सिप्पी दिग्दर्शित `सीता और गीता' या चित्रपटातील `कौशल्या चाची' ही त्यांची व्यक्तिरेखा त्यांना फार दमदार वाटत असे. देव आनंद नायक असलेल्या अमरजीतदिग्दर्शित `गॅम्बलर' या चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या वेळी चित्रीकरणात भाग घेणाऱ्या आपल्या सहकलावंतांना त्या युक्तीच्या चार गोष्टी सांगत असत.



सहकलावंतांना त्या सांगावयाच्या, की मोठ्या कलावंतांपुढे चरित्र कलाकारांची प्रेक्षक दखल घेत नाहीत. म्हणून नायक-नायिका यांच्यासमवेत एखादा प्रसंग (सीन) चित्रित होत असताना चेहऱ्यावरच्या हावभावांबरोबरच सतत काहीतरी हालचाल करीत राहा ज्यायोगे नायक-नायिका यांच्याबरोबरच प्रेक्षक तुम्हालाही व्यवस्थित पाहतील आणि तुमचा चेहरा त्यांच्या लक्षात राहील. अभिनयाचे हे तंत्र दुसऱ्यांना समजावून सांगणाऱ्या मनोरमा आपल्या अभिनयाच्या वेळीही हे तंतोतंत पाळीत असत. `घर की इज्जत' या चित्रपटात मनोरमा यांनी दिलीप कुमार यांच्या बहिणीची भूमिका केली होती. परंतु जस जसे त्यांचे वय वाढत गेले तस तसे त्यांचे वजनही बरेच वाढले. पण निराश न होता त्या चरित्र अभिनेत्री बनल्या आणि हास्यप्रधान तसेच काहीशा बदफैली स्त्रीच्या भूमिका करू लागल्या. त्यांची चित्रपट कारकीर्द व्यवस्थित सुरू होती आणि पती राजन हक्सर यांच्याबरोबर त्यांचे सुखाचे वैवाहिक जीवन सुरू असताना अचानक दुधात मिठाचा खडा पडला. राजन हक्सर यांच्याबरोबर त्यांचा घटस्फोट झाला. ते दोघे विभक्त झाले खरे पण तरीही त्यांचे परस्परांमधील संबंध चांगलेच राहिले. मनोरमा यांनी अभिनय क्षेत्रातील आपल्या ६० वर्षांच्या कारकिर्दीत हिंदी चित्रपटांबरोबरच अनेक पंजाबी चित्रपटांमधेही भूमिका केल्या. सुप्रसिद्ध दिग्दर्शिका दीपा मेहता यांचा २००५ साली प्रदर्शित झालेला `वॉटर' हा चित्रपट त्यांच्या चित्रपट कारकिर्दीतील अखेरचा चित्रपट ठरला. `वॉटर' या चित्रपटातील `मधुमती' ही व्यक्तिरेखा साकारण्यासाठी मनोरमा याच दीपा मेहता यांची पहिली आणि शेवटची पसंती होती. काही कारणास्तव दीपा मेहता यांना एकाएकी `वॉटर'चे चित्रीकरण मधेच थांबवावे लागले. त्यानंतर त्यांना सगळेच नवे कलावंत घेऊन `वॉटर'चे चित्रीकरण नव्याने सुरू करावे लागले होते. पण या सगळ्या घटनांमधील एक ठळक घटना म्हणजे दीपा मेहता यांनी सगळे कलावंत बदलले पण बदलले नाही ते अभिनेत्री मनोरमा यांना आणि त्यांची व्यक्तिरेखा मधुमतीला ! मनोरमा यांनी आपल्या अभिनयाच्या कारकिर्दीत `परिणीता', `चाचा झिंदाबाद', `एक फूल दो माली', `पवित्र पापी', `मेरे हुजूर', `दो कलियां', `बॉम्बे टू गोवा', `सीता और गीता', `मेहबूब की मेहंदी', `धरम कांटा', `लावारिस' या आणि अन्य चित्रपटांमधे भूमिका केल्या. त्याचप्रमाणे दूरचित्रवाणीवरील काही मालिकांमधेही त्यांनी भूमिका केल्या. आपल्या आगळ्या वेगळ्या अभिनयाने प्रेक्षकांना हसविणाऱ्या मनोरमा यांच्या आयुष्याचा अंतिम काळ मात्र फारच दुःखकारक आणि तितकाच क्लेशदायक ठरला. पती राजन हक्सर यांच्याबरोबर काही वर्षांपूर्वी झालेला घटस्फोट आणि कन्या रीता हक्सर परदेशात स्थायिक झाल्यामुळे व्यक्तिगत जीवनात त्या पूर्णपणे एकाकी पडल्या होत्या. `वॉटर' हा चित्रपट प्रदर्शित झाल्यावर दोन वर्षांच्या कालखंडानंतर २००७ साली अचानकपणे त्यांची प्रकृती बिघडली. अर्धांगवायूचा जोरदार झटका येऊन त्यांच्या चेहऱ्यावर जसा गंभीर परिणाम झाला तशीच त्यांची वाचाही गेली. लाचार झालेल्या मनोरमा यांना बरेच काही सांगावयाची इच्छा असे ; पण त्यांच्या तोंडातून एक शब्दही बाहेर पडू शकत नव्हता. जवळ जवळ एक वर्ष त्यांनी अशा लाचार व परावलंबी अवस्थेत काढले. अखेर १५ फेब्रुवारी, २००८ या दिवशी आपली कर्मभूमी मुंबईत वयाच्या ८१ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांची शोकांतिका म्हणजे त्यांच्या अंतिम समयी एका नोकराशिवाय त्यांचे आपले असे कोणीच उपस्थित नव्हते !

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642

आधुनिक केसरी

**शेतकरी कुटुंबातील तरुणया व्यावसायातील अनिश्चिततेमुळे निराश झाले आहेत. दररोज अनेक शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही. पुढच्या पिढीमध्ये बहुधा शेतकरी उरतो की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. कोरोना साथीच्या काळात शेती हा एकमेव क्षेत्र राहिला ज्या मध्ये वाढ नोंदविली गेली आहे . खरीप हंगामातही भारताने भरघोस पीकाचे उत्पन्न नोंदवले आहे. त्याच वेळी, देशातील शेतकरी देखील आपल्या स्वत: च्या प्रमुख मागण्या साठी दील्लीच्या सीमेवर आंदोलन करीत आहे. या आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्याची मागणी काय आहे?**

त्यांना फक्त त्यांच्या उत्पादनास किमान किंमतीचे आश्वासन हवे आहे. अर्थात, अलिकडच्या इतिहासात प्रथमच शेती,व शेतकरी हे राष्ट्रीय चर्चेचा विषय झाले आहेत. देशातील प्रत्येक चौथा मतदार हा एक शेतकरी आहे, जो आर्थिक संकटात सापडलेला आहे.

भारत प्रामुख्याने ग्रामीण भागातून शहरी अर्थव्यवस्थेकडे जात आहे. यामुळे लोकांचा व्यवसाय आणि आकांक्षा देखील बदलतात. भारताची शेतीशी संबंधित लोकसंख्या पूर्वीसारखीच राहील किंवा ती बिगर शेती व्यवसायात जाईल का ? याची चिंता आहे. बरेच काही ग्रामीण-शहरी परिस्थितीवर अवलंबून असेल. जनगणनेच्या व्याख्येनुसार, नगरविकास शहरी घोषित केले जातात (नगरपालिका, महानगरपालिका, छावणी मंडळ आणि अधिसूचित नगरपालिका क्षेत्र समिती वगळता) ज्यात कमीतकमी लोकसंख्या 5,000 असते आणि बिगर शेती कार्यात किमान पुरुष लोकसंख्येपैकी 75 टक्के लोकसंख्या असते. तसेच लोकसंख्येची घनता प्रति चौरस किमीवर किमान 400 लोक असावी. अशा वस्त्यांना नगरे देखील म्हणतात. 2001 ते 2011 च्या जनगणनेनुसार अशा शहरांची संख्या 1362 वरून 3894 वर गेली आहे. हे सूचित करते की ग्रामीण भागातील लोक शेती सोडत आहेत किंवा बिगर शेतीविषयक जीवनात सामील होत आहेत. 2011 च्या जनगणनेत इतिहासातील प्रथमच ग्रामीण भागातील लोकसंख्या वाढीची नोंद झाली असून बरेच शेतकरी अल्प भु धारक असूनही शेती करीत नसल्याचे संकेत मिळत आहेत. हे देखील दर्शविते की भारत मोठ्या बदलाच्या मार्गावर आहे. जर आपण आर्थिक बाबी आणि रोजगाराच्या दृष्टीकोनातून पाहिले तर ग्रामीण भारत आता शेतीप्रधान नाही. एनआयटीआय आयोगाच्या संशोधन पत्रकात अर्थतज्ज्ञ रमेश चंद यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेतील बदलांचे विश्लेषण केले आहे. त्यांनी आपल्या निष्कर्षात म्हटले आहे की २2004- 5 पासून भारत एक बिगर शेती प्रधान अर्थव्यवस्थेचा देश बनला आहे. शेतकरी शेती सोडत आहेत आणि बिगर शेतीच्या रोजगारामध्ये मध्ये जात आहेत. त्यांनी घेतलेला हा आर्थिक निर्णय आहे कारण शेतीपेक्षा ईतर नंतरच्या पर्यायांपेक्षा ते अधिक पैसे कमवतात. शेतकऱ्याचे उत्पन्न बिगर-शेतक-याच्या पंचमांश्याच्या आसपास आहे. 1991 -92 मध्ये झालेल्या आर्थिक उदारीकरणा नंतर हा संरचनात्मक बदल झाला आहे . रमेश चंद यांच्या संशोधनात असे दिसून आले आहे की 1993-94 ते 2004- 5 दरम्यान कृषी क्षेत्रातील विकास दर 1.87 टक्क्यांनी घसरला तर बिगर शेती अर्थव्यवस्थेतील विकास दर 7.9 टक्क्यांपर्यंत वाढला. ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये शेतीच्या योगदानामध्ये ही घसरण झाली. 1993- 94 मध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेतीचे योगदान 57 टक्के होते, तर 2004-05 मध्ये ते केवळ 39 टक्के इतके खाली आले होते. इतर उत्पन्न शेतीच्या उत्पन्नापेक्षा वेगाने वाढत आहे. 1980 च्या दशकाच्या मध्यातील कृषी आणि बिगर शेती उत्पन्नामधील फरक 1 :3 होता तो 2011-12 मध्ये 1: 12 च्या प्रमाणात वाढला आहे. 2004-05 पर्यंत ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीपेक्षा अधिक बिगर शेती जात आहे आणि हा ट्रेंड अजूनही सुरू आहे. इंटरनेशनल फंड फॉर एग्रीकल्चरल डेवलपमेंट च्या प्रसिद्ध झालेल्या "कृषी विकासासाठीच्या 2019 ग्रामीण विकास अहवाला" मध्येच, शेतकऱ्यांची घटती लोकसंख्या आणि कृषी स्रोतांकडून मिळणाऱ्या उत्पन्नाविषयी ग्रामीण भागातील बेरोजगारीला एक नवीन आयाम जोडला गेला आहे. अहवालात लोकसंख्येचा अंदाज तसेच जागतिक स्तरावर ग्रामीण भागातील तरुणांचे आर्थिक भविष्य मोजणारे अनेक अभ्यास गट समाविष्ट आहेत. जगभरातील ग्रामीण भागातील तरुणांची संख्या वाढत असल्याचे या अहवालात निष्कर्ष काढण्यात आले आहेत. विशेषतः आशिया आणि आफ्रिका विकसनशील आणि विकसनशील देशांमध्ये हे प्रमाण खूप आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील लोकसंख्येमध्ये ही वाढ अशा वेळी झाली आहे जेव्हा या भागात प्रभावी आर्थिक वाढ किंवा विविध उपजीविकेचे साधन नाही. आता प्रश्न पडतो की त्यांना रोजगार कोठे मिळेल? याचा विचार करणे गरजेचे आहे कारण सुमारे तीन चतुर्थांश ग्रामीण तरुण अशा देशात राहतात जिथे कृषी मूल्यवर्धन सर्वात कमी आहे. अहवालात दावा करण्यात आला आहे की, "या देशांतील कृषी कार्यात भाग घेऊन तरुणांना दारिद्र्यातून बाहेर पडून जाणे खूप कठीण आहे. बरेच लोक अधिक चांगले राहण्यासाठी इतर भागात जातील. हाच ट्रेंड भारतातही पाळला गेला आहे. " देशात बेरोजगार ग्रामीण भागातील बरीच टक्के लोक उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या राज्यात आढळतात. प्रामुख्याने शेतीशी निगडित राज्यांमध्ये तरुण लोकसंख्या शेतीपेक्षा वैकल्पिक उदरनिर्वाहाचे स्त्रोत शोधत आहे. आफ्रिकी देशांच्या तुलनेत भारतात बिगर शेती रोजगाराची पातळी खूपच जास्त आहे. त्याच बरोबर, अभ्यासामध्ये असा युक्तिवाद केला गेला आहे की कृषी क्षेत्रात नवीन नोकरदारांना जागा देण्याची बरीच क्षमता आहे. ग्रामीण भागातील जवळजवळ 67 टक्के लोकसंख्या अशा भागात जिथे शेतीची शक्यता आहे तेथे राहतात.

# नाशिक जिल्ह्यातील धरण समूहातून पाणी सोडण्यात येऊ नये


## भंडारदरा, प्रवरा पाणी हितसंवर्धन समितीची फडणवीसांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** मेंढेगिरी समितीचे निकष पुर्ण करण्यासाठी गोदावरी, प्रवरा व मुळा धरण समुहातून सोडण्यात येणारे पाणी अत्यंत कमी असल्याने पाण्याचा अपव्यय होण्याची शक्यता गृहीत धरुन, तसेच धरणांच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न गांभीर्याने विचारत घेवून नगर आणि नाशिक जिल्ह्यातील धरण समूहातून पाणी सोडण्यात येवू नये, अशी मागणी भंडारदरा, प्रवरा पाणी हितसंवर्धन समितीच्या वतीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

गोदावरी मराठाडा पाटबंधारे विकास महामंडळाने पाणी सोडण्याच्या काढलेल्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर या समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबई येथे सह्याद्री अतिथीगृहात उपमुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेवून निवेदनाद्वारे पाणी न सोडण्याची मागणी केली आहे. भंडारदरा-प्रवरा पाणी हितसंर्वधन समितीचे अध्यक्ष व प्रवरा बँकेचे चेअरमन डॉ.भास्करराव खर्डे पाटील यांच्या नेतृत्वाखाली हितसंर्वधन समितिचे सदस्य डॉ.विखे पाटील कारखान्याचे चेअरमन कैलासराव तांबे, प्रवरा बॅंकेचे व्हा. चेअरमन मच्छिंद्र थेटे, ॲड.सोपान गोरे, सुभाष अंत्रे, निवृत अभियंता उतमराव निर्मळ, प्रकाश खर्डे, प्रमोद राहाणे आदी यावेळी उपस्थित होते.

या संदर्भात समितीच्या सदस्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून नगर जिल्ह्यातील धरणाच्या पाणी साठ्याची सद्यस्थितीची माहीती दिली., उर्ध्व धरणाच्या पाणलोट क्षेत्रात यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस झालेला असल्याने केवळ मागील पाणीसाठा शिल्लक राहील्यामुळेच धरणं पुर्ण क्षमतेने भरली. धरणाच्या लाभक्षेत्रातही सरासरी पेक्षा कमी झालेला पाऊसाबाबतही शिष्टमंडळाने अवगत केले. यंदाचा खरीप हंगामही वाया गेला. आता खरीप हंगामातही पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात जाणवणार असल्याने कृषि व्यपस्था व पशुधनाच्या संदर्भातील प्रश्न अधिकच बिकट होणार असल्याचे गांभीर्य शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्र्याच्या निदर्शनास आणून दिले. केवळ कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या हेतूने व दबावाने पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यापेक्षा उपलब्ध पाणी साठ्याचा



कार्यक्षम वापर करुन, एक टिएमसी पाण्यात उध्वभागात किती सिंचन केले जाते व जायकवाडी धरणात एक टिएमसी पाण्यात किती क्षेत्र सिंचित होते याबाबतही तुलनात्मक विचार करण्याची गरज या निवेदनात व्यक्त करतानाच जायकवाडी जलाशयातून केला जाणारा अनियंत्रित उपसा व कालव्यांमधून होणारी गळती यामुळे वाया जाणा-या पाण्याकडेही लक्ष देण्याची आवश्यकता या समितीच्या वतीने निवेदनाव्दारे व्यक्त करण्यात आली आहे. घाटमाथ्यावरील पाऊस पुर्णपणे थांबलेला आहे. त्यामुळे आता वरच्या धरणात पाण्याची आवक होण्याची कोणतीही शक्यता नाही. त्यामुळे उर्ध्वभागात तीव्र टंचाईच्या काळात पाणी उपलब्ध होणार नाही. याउलट जायकवाडी धरणात २६ टिएमसी मृत पाणीसाठा उपलब्ध असल्याने यासाठ्यातून पाणी उपलब्ध होवू शकते, यापूर्वीही असा वापर केलेला आहे याकडे लक्ष वेधून समितीने महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरणाकडून न्यायायालयाच्या निर्देशाप्रमाणे कोणत्याही अटी व शर्थीचे पालन न करता केवळ पाणी सोडले जात असल्यामुळे नगर, नाशिकच्या शेतक-यांवर एकप्रकारे अन्यायच होत असल्याची बाब निवेदनातून समितीने अधोरेखीत केली. समन्यायी पाणी वाटपाचा आग्रह धरणे म्हणजे पाण्याच्या उधळपट्टीला एकप्रकारे प्रोत्साहन देण्यासारखी असल्याची बाबही मांडली असल्याची माहीती समितीचे अध्यक्ष डॉ भास्करराव खर्डे पाटील यांनी दिली.याबबात न्यायालयातही दाद मागण्याची समितीची तयारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



# पाण्याची नासाडी होणार नाही याची शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी : कोकाटे

## टिटवी तलावाचे कॅनॉलद्वारे पाणी सोडण्यात आले

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** दि.३/११/२०२३ ला मुंगसाजी माऊली पाणी वापर संस्था, टिटवी १.नं. १/१ यांचे मार्फत टिटवी तलावाचे कॅनवल मधुन कास्तकारांना हरबराउने पिकांना पाणी सोडण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष भगवान कोकाटे मुंगसाजी पाणी वापर संस्थेचे अध्यक्ष हे होते तर प्रमुख पाहुणे एस.एन. नवले उपविभागीय अधिकारी पाटबंधारे मेहकर होते.

टिटवी तलावातील पाणी वापर संस्थेकडे ५०० हेक्टर क्षेत्र ओलीतासाठी हस्तांतरीत करण्यात आले आहे. पण दिवसेंदिवस पावसाळा कमी अधिक प्रमाणात होत असल्यामुळे यावर्षी १०० हेक्टर क्षेत्र कमांड एरीयामधील ओलीत होऊ शकते त्यामुळे कास्तकारांना हरभरा, उभे पिके तुर, शाळु, इत्यादी पिकांना फायदा होणार आहे. कमी पाण्यात जास्तीजास्त शेतकऱ्यांनी पाण्याची काटकसर करुन शेती ओलीत करावी व पाण्याची नासडी होऊ देऊ नये असे आवाहन यावेळी भगवान राव कोकाटे अध्यक्ष मुंगसाजी पाणी वापर संस्था यांनी केले. तर यांनी कास्तकारांनी पाण्याचा योग्य वापर करावा व जास्तीजास्त सिंचन कसे होईल याकडे लक्ष द्यावे असे आव्हान नेवले यांनी कास्तकारांना केले प्रमुख पाहुणे यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर कॅनवलच्या गेटचे चाक फिरऊन पाणी सोडण्यात आले यावेळी भगवानराव कोकाटे अध्यक्ष पाणी वापर संस्था टिटवी ,एस.एन. नवले उपविभागीय अधिकारी पाटबंधारे मेहकर,ए.वि. शिंदे,एस.सी.गावीत शाखा अभियंता, अभिनव सातव कनिष्ठ अभियंता, सुर्वे वरिष्ठ लिपीक, तसेच संस्थेचे पदाधिकारी पंढरी कोकाटे, परशराम कोकाटे, फकिरा तनपुरे, संतोष राऊत, राजु बोरा, भगवान राऊन, तुकाराम तनपूरे, सांगळे कालवा निरीक्षक, रतन कोकाटे पाटकरी इत्यादी ग्रामस्थ हजर होते.

# हंसराज अहीर व तालुका प्रशासनाच्या मध्यस्थीने परसोड्यातील उपोषण मागे

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** परसोडा लिज क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या न्याय



मागणीची आरसीसीपीएल कंपनीद्वारा अवहेलना होत आहे ही वस्तुस्थिती आहे. पेसा कायद्याचे सऱ्हासपणे उल्लंघन होत आहे. यापरीसरातील जमिनींचे सरसकट अधिग्रहण व्हावे अशी प्रमुख मागणी असतांना दलालांकरवी जमिनी घेवून कमिशनबाजीच्या माध्यमातून त्या कंपनीला विकल्या जात आहेत. हा या लिज क्षेत्रातील शेतकऱ्यांवर अन्याय असल्याने या प्रमुख मागणीसह अन्य महत्वपूर्ण मागण्यांसाठी नेमीचंद काटकर यांनी बेमुद्दत अन्नत्याग आमरण उपोषण दि. 16 ऑक्टोंबर पासुन सुरू केले होते. या आंदोलनाची दखल घेवून दि. 02 नोव्हे. 2023 रोजी जोपर्यंत सरसकट अधिग्रहणाचा निर्णय होत नाही तोपर्यंत उत्खनन थांबविण्याचा निर्णय जिल्हाप्रशासनाने घेतल्याने हे उपोषण हंसराज अहीर यांच्या पुढाकाराने मागे घेण्यात आले असले तरी जोपर्यंत लोकांच्या मर्जीनुसार निर्णय होणार नाही तोपर्यंत हा लढा कायम राहील इथल्या मागासवर्गीय, दलित, आदिवासी शेतकऱ्यांच्या सोबत राहू त्यांना न्याय मिळेपर्यंत संघर्षाची भूमिका कायम राहील असे आश्वासन राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी उपोषणकर्त्यांना दिले. या प्रसंगी जिल्हाप्रशासनाच्या वतीने कोरपनाचे तहसीलदार, ठाणेदार, माजी आ. संजय धोटे, माजी आ. सुदर्शन निमकर, खुशाल बोंडे, राजु घरोटे, शिवाजी सेलोकर, रामा मोरे, किशोर बावने, रमेश मालेकर, नारायण हिवरकर, अमोल आसेकर, गंगाधर कुटावार, अरूण मैदमवार, सतिष गोंडलावार, उपसरपंच सतिष काटकर, रामभाऊ कोहचाडे, सखाराम तलांडे, कार्तिक गोन्लावार, सतिष तंगडपल्लीवार, संजय सोडमवार, साई जंगमवार, दुर्वास काटकर, संतोष डोणेवार, सचिन सिडाम, दिनेश आत्राम, बालकुमार कामडे, शंकर डोणेवार, मंगेश नगराळे, मिलींद काटकर यांची व चुनखडी लिज क्षेत्रातील परसोडा, कोठोडा (बु.), रायपूर, गोविंदपुर, कोठोडाखुर्द, पाउंडगुडा, मांगरूड, दुर्गाडी या गावातील शेकडो ग्रामस्थांची उपस्थिती होती.

हंसराज अहीर यांनी सांगीतले की दोन महिन्यांपूर्वी या प्रश्नी ओबीसी आयोगाने सुनावणी घेतली होती. त्याचे उत्तर आयोगाला अप्राप्त आहे. आता परसोडा चुनखडी लिज क्षेत्रातील मागासवर्गीय व अन्य शेतकऱ्यांच्या या प्रलंबित प्रश्नाला घेवून आयोग येत्या 15 दिवसात पुढील सुनावणी नागपूर विभागीय कार्यालयात आयुक्त, जिल्हाधिकारी, मायनिंग अधिकारी, आयोगाचे अधिकारी व सर्व संबंधितांच्या उपस्थितीमध्ये घेणार असुन यामध्ये एकमुस्त 756.14 हेक्टर जमिनीच्या अधिग्रहणाचा सर्वसमंतीने निर्णय घेतला जाईल तसे न झाल्यास मायनिंग सुरू करण्याविषयी जिल्हाधिकारी न्यायोचित निर्णय घेतील असे सांगतांनाच अहीर यांनी याबाबत प्रयत्न करण्याचे यावेळी उपस्थित शेतकऱ्यांशी चर्चा करतांना स्पष्ट केले. लिज क्षेत्रातील शेतकऱ्यांची सरसकट शेतजमिनींच्या अधिग्रहणाची मागणी असतांना कंपनी 15 ते 30 वर्षापर्यंत टप्याटप्याने अधिग्रहण करण्याची भूमिका स्वीकारत असेल तर ती संयुक्तिक नसून शेतकऱ्यांच्या भावनांशी कंपनी प्रबंधनाने खेळू नये असेही हंसराज अहीर म्हणाले. या प्रकरणात जमिन अधिग्रहणाबरोबरच रोजगार, रस्ते, प्रदुषण व इतरही अनेक प्रश्न असल्याने यासंदर्भात समोपचाराने प्रश्न मार्गी लागावा अशी आपली भूमिका असल्याचेही ते म्हणाले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# नवजात बालकांच्या शस्त्रक्रियांना विम्याचे कवच

## डॉ. भागवत कराड : आयपीएस कॉन २०२३ चे उदघाटन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** नवजात बालकांवरील शस्त्रक्रिया अद्याप विम्याच्या कक्षेत आलेल्या नाहीत. विमा कंपन्याशी बोलून या शस्त्रक्रियांना विम्याचे कवच मिळवून देण्याचा प्रयत्न करू त्यासाठी राष्ट्रीय संघटनेने चर्चेसाठी यावे असे आवाहन आयएपीएस कॉन २०२३ च्या संयोजन समितीचे अध्यक्ष आणि केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी केले.

आयएपीएस कॉन २०२३ या बालशल्यचिकित्सक आणि बालमूत्ररोग शल्यचिकित्सकांच्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. शहरात प्रथमच राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते आज परिषदेचे उद्घाटन झाले. जिल्हास्तरावर शल्यचिकित्सकांच्या जागा निर्माण करण्यासाठी प्रत्येक राज्याच्या आरोग्य खात्याबरोबर बोलून हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करू असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.




संयोजन समितीचे सचिव डॉ. आर.जे.तोतला यांनी प्रास्ताविक करताना माननीय केंद्रिय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी या शहरात पेडीयाट्रीक सर्जरीचे रोपटे लावले. आता त्याचा वृक्ष झाला आहे. त्यांच्याच प्रयत्नातून शहरात पहिली आयएपीएस कॉन ही राष्ट्रीय परिषद घेण्याचा मान मिळाला आहे. पेडीयाट्रिक सर्जरी आणि पेडीयाट्रिक युरोलॉजी सर्जरी ही सुपरस्पेशालीटी शाखा आणखी विकसीत करण्यासाठी राष्ट्रीय परिषद ही परिषद नक्कीच प्रभावी ठरेल अशी अपेक्षा व्यक्त केली. परिषदेच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या समरणिकेचे तसेच डॉ. संतोष तोतला यांनी अनुवादित केलेल्या बच्चो की जन्मजात विकृती एवं शल्यचिकित्सा पुस्तकाचे प्रकाशनही यावेळी मान्यवरांच्या हस्ते झाले.

दरम्यान आज सकाळपासून विविध सत्रांना सुरवात झाली. बालकांमधील ट्यूमर, रोबोटीक सर्जरी, शस्त्रकियानंतरचे व्यवस्थान अशा विविध विषयांवर संधोधनपर निबंध सादर झाले. मृदुला रोहतागी ओरिएशन आजचे आकर्षण होते. तसेच डॉ. आर.के. गांधी, डॉ.टी.दोराई राजन , डॉ.के.सी.सोगाई यांच्या नावाने दिली जाणारी सुवर्णपदके तसेच डॉ.अमल के.बोस जीवनगौरव पुरस्कार आणि आयएपीएस फेलोशिप देण्यात आली. डॉ. संतोष तोतला आणि डॉ. उमा महाजन यांनी सूत्रसंचलन केले. आय ए पी एस चे अध्यक्ष डॉ. दसमित सिंग खोखर, सचिव डॉ. संजय राव, डॉ. रमेश बाबू यांच्यासह उद्घाटन समारंभाला संयोजन समितीचे डॉ. रमेश बजाज, डॉ. सय्यद कैसरोददीन डॉ.मुख्तदिर अन्सारी, डॉ. विद्यानंद देशपांडे, डॉ. पिनाकीन पुजारी, डॉ. रामदास नागरगोजे, डॉ. प्रदीप राठोड, डॉ. संदिप हंबरडे, डॉ, अर्जून पवार, यांच्यासह शहरातील मान्यवर डॉक्टरांची उपस्थिती होती.

# खुलताबाद तालुका दुष्काळातून वगळला

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** यंदा अपुरा पाऊस वा सरासरीच्या अर्धेही ५०% टक्के पाऊस झाले नाही.खरिप पिक हंगामाबरोबरच रब्बी पिक हंगामही यंदा शेतकऱ्यांच्या हाती येत नाही.व अपुऱ्या पावसामुळे खरिप पिकांना फटका बसला आहे व तालुक्याची ४८पैसेवारी असताना सरकार कडुन खुलताबाद तालुका दुष्काळातून वगळले असल्याने शेतकऱ्यांत निराशा रोष संताप पसरला आहे. यंदा जूनपासून पावसाला सुरवाती झाली खरी परंतु सुरवाती पासूनच पावसात जोर नव्हता जेमतेम पावसावरच खरिप पिकांची वाढ झाली. आज उद्या पाऊस येईल या भरवाशावर पावसाळा संपला. अपुऱ्या पावसामुळे यंदा नदी नाले ओढे तलाव कोरडेच पडून आहे. जुनमधेच पावसाने अखडतं घेतल्याने मुग उडीद चवळी पेरा ला उशीर झाला त्यातही पावसाने हुलकावणी दिल्याने मुग उडीद चवळी



हातीच आले नाही. तर मका कापूस सोयाबीन बाजरी भुईमूगची तुर अपुऱ्या पावसामुळे वाढ झाली नाही. जेमतेम पाऊस त्यात ऐनवेळा म्हणजे फुलाऱ्यात कणसात दाने भरता वेळा व फुल कैऱ्या वेळा पावसाने खंड दिल्याने खरिप पिकाची वाट लागली व महागडी बि बियाणे खते औषधी मजुरी खर्च करून ही शेतकऱ्यांच्या हाती काहीच येत नसल्याने शेतकरी मेटाकुटीला आला.वर्ष २०२३-२४ खरिप व रब्बी पिक हंगामाची तहसीलदार मंडळ अधिकारी तलाठी बीडीओ ग्रामसेवक कृषी अधिकारी कृषी सहायक यांनी वेळोवेळी माहिती अहवाल केलेला आहे. मेटाकुटीला व हतबल परेशानच्या स्थीतीत बळीराजा असताना त्याला दुष्काळ जाहीर झाले तर काही हाती पडेल असी आशा होती. जर दुष्काळ जाहीर झाले तर कमीतकमी सवलती मिळतील असी आशा असतांना त्यां आशावर पाणी फिरले व जिल्ह्यात दोनच तालुके छत्रपती संभाजी नगर व सोयगाव दुष्काळी म्हणून जाहीर झाले व खुलताबाद तालुक्यातील शेतकऱ्यांचे तोंडाचे पाणी पळाले व सर्वत्र निराशा रोष संताप पसरला आहे.



# पत्रकार अविनाश घोगरे यांना राज्यस्तरीय सावित्रीज्योती पत्रकार सन्मान पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** निर्वाण फाऊंडेशन, नाशिक यांच्या वतीने दिले जाणारे सावित्रीज्योती सन्मान २०२३ च्या सावित्रीज्योती राज्यस्तरीय पुरस्कार व क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले जीवनगौरव पुरस्कारांचा वितरण सोहळा रोटरी कम्युनिटी हॉल, नाशिक येथे रविवार, दिनांक २९ ऑक्टोबर २०२३ रोजी दिमाखात पार पडला. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून वेगवेगळ्या क्षेत्रात काम करून आपली ओळख निर्माण करणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात आले.'पुरस्कारातून पुढच्या पिढीला प्रेरणा मिळते', त्यामुळेच या पुरस्कार सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील 25 क्षेत्रांतून पुरस्कारासाठी निवडलेल्या मानकऱ्यांना सह यात जालना जिल्ह्यातील घनसावंगी येथील दै. पुढारीचे पत्रकार अविनाश घोगरे यांना राज्यस्तरीय सावित्रीज्योती पत्रकार सन्मान पुरस्कारी सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात मानाचा फेटा, सन्मानचिन्ह आणि मानपत्र या स्वरूपात देऊण सन्मान पुरस्कार अभिनेत्री सायली पाटील. उदद्योगपती मकरंद साळी सह यांच्या हस्ते थाटात प्रदान करण्यात आले. समाजातील शेवटच्या माणसाचा आणि त्याच्या कामाचा सत्कार होणे गरजेचे आहे. हेच काम निर्वाण फाउंडेशन करीत आहे, असे प्रतिपादन अभिनेत्री सायली पाटील यांनी केले. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यांतून वेगवेगळ्या क्षेत्रात काम करून आपली ओळख निर्माण करणाऱ्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात आले.यावेळी अभिनेत्री सायली पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पगारे, पोलीस निरीक्षक बाळासाहेब दुकाळे, मिसेस इंडिया इंटरनॅशनल शिल्पी अवस्थी, लेखक संजय भारतीय प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तसेच, संस्थेचे अध्यक्ष नीलेश आंबेडकर, संस्थेचे उपाध्यक्ष सचिन धारणकर, संस्थेचे सचिव राहुल सोनावणे व संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन कल्याणी जाधव यांनी केले.

# रेशन कार्डधारकांना धान्याऐवजी थेट रोख; कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन

## जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** शेतकरी योजनेतील शिधापत्रिका धारकांना अन्न धान्य ऐवजी थेट बँक खात्यात रोख जमा करण्याची 'रक्कम हस्तांतरण 'योजना नवीन वर्षापासून सुरु करण्यात येत असून त्यासाठी दि.७ नोव्हेंबर प्रत्येक रास्तभाव दुकानात कागदपत्रे जमा करण्याची एक दिवसीय शिबिर आयोजन करण्यात आली आहे याचा लाभ शिधापत्रिका धारकांना घ्यावे असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी केले आहे. शासन निर्णय २८फेब्रुवारी २३, अधिनियम २०१३अनुवय समाविष्ट न झालेले एपीएल केशरी शिधापत्रिका धारक शेतकरी लाभार्थीना नवीन वर्ष जानेवारी २०२४ पासून प्रतिमहा अन्न धान्य ऐवजी प्रतिमहा १५०/-रुपये लाभ रक्कम हस्तांतरण थेट रोख रक्कम बँके खात्यात योजना सुरु करण्याचे आयोजन असुण त्यासाठी शेतकरी एपीएल केशरी शिधापत्रिका धारकांच्या कागदपत्रांसाठी दि.७रोजी रास्तभाव दुकानात एक दिवसीय शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.यात कुटूंबातील सर्वांचे आधारकार्ड व महिला सदस्यांचे बॅंक खात्याची प्रत शिबिरात जमा करावयाची आहे. या शिबीर तथा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हापुरवठा अधिकाऱ्यांनी केले.

# फुलंब्री तालुक्यातील सर्व आंदोलने स्थगित

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यात मराठा समाजाच्या आरक्षणासाठी चालू असलेली सर्व आंदोलने मागे घेण्यात आली असून मनोज जरांगे पाटील पुढील आंदोलनाची जशी दिशा ठरवतील त्याप्रमाणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे फुलंब्री येथील महात्मा फुले चौकातील साखळी उपोषणस्थळी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने घेण्यात आलेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला.

फुलंब्री तालुक्यात मराठा आरक्षणासाठी मनोज पाटील जरांगे यांना पाठिंबा देत विविध आंदोलने करण्यात आली. मनोज जरांगे यांचे उपोषणाचे दुसरे पर्व २५ तारखेपासून सुरू झाले होते. याच माध्यमातून फुलंब्री तालुक्यात सर्कलनिहाय साखळी उपोषण करण्यात आले होते. अनेक ठिकाणी आमरण उपोषणही सुरू होते. मनोज जरांगे यांनी त्यांचे उपोषण मागे घेतल्यानंतर फुलंब्री तालुक्यातील सुरू असलेल्या साखळी व आमरण उपोषण मागे घेण्यात आले. यामध्ये आळंद, बाबरा, गणोरी, फुलंब्री, पाल फाटा येथे साखळी उपोषण सुरू होते, तर आळंद, निधोना या गावांत आमरण उपोषण सुरू होते. शुक्रवारी तहसीलदार डॉ. कृष्णा कानगुडे यांनी साखळी उपोषणाला भेट देऊन शासनाला मराठा आंदोलनाच्या भावना पोहोचवणार असल्याचे आश्वासन दिले. मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशाने पुढील आंदोलन करण्यात येणार असल्याचे या बैठकीत निर्णय घेण्यात आला.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# आमदारकी करणं सोपं, आर्थिक संस्था चालवणं अवघड : आ.आसगावकर

## निरेतील शिवशक्ती संस्थेचं आमदारांकडून कौतुक; ज्येष्ठांचा सन्मान सोहळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**निरा-शिवतक्रार :** संस्थेचा इतिहास राजेंद्र बरकडे यांनी थोडक्यात सांगितला असला तरी कारकीर्द मोठी आहे, असे म्हटले तरी वावगं ठरणार नाही. इतकं भव्य काम ह्या जोडीने केलेलं आहे.दोघेही पती पत्नी अगदी हृदयापासून समाजात व्यक्त होत आहेत. समाजासाठी आम्ही काय काय केलं. हे सांगताना सुद्धा कुठल्याही प्रकारचा अहंमभाव नाही. हे एक आपलं कर्तव्य आहे.हे समजून खऱ्या अर्थाने त्यांनी केलं. गावचा विकास असेल,भागाचा विकास असेल हे ध्येय ठेवून काम करत असताना ज्यावेळी लोकं काम करतात. त्यावेळी खऱ्या अर्थाने लोकं त्यांना वेडे म्हटले जाते, असे मला वाटतय आणि हे वेडेपण ह्या नवरा बायकोच्या अंगी आहे. असं निदर्शनास येतं.दहा कोटीची पतसंस्था उभा करायची.हे खुप अवघड काम आहे.आज आम्ही आमदारकी करणं सोप्पं आहे.परंतु आर्थिक संस्था चालवणं खूप अवघड आहे, असे प्रतिपादन आमदार जयंत आसगावकर यांनी राजेंद्र बरकडे आणि सविता बरकडे या दांपत्यांचे कौतुक करताना म्हटले. निरा शिवतक्रार ता.पुरंदर येथे शिवशक्ती धर्मदाय सामाजिक विकास सेवा संस्था महाराष्ट्र राज्य व शिवशक्ती ग्रामीण बिगर सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जेष्ठ नागरिक सन्मान सोहळा व आदर्श शिक्षक सन्मान सोहळा आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमातून आमदार जयंत आसगावकर बोलत होते.यावेळी शिवशक्ती धर्मदाय सामाजिक विकास सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र बरकडे, सविता बरकडे, निरा-शिवतक्रारचे उपसरपंच राजेश काकडे, पिसुर्टीचे उपसरपंच दत्तात्रय बरकडे, प्रदीप बरकडे, संजय चोरमले, दीपक बरकडे, संस्था संचालक सुहास काकडे, विद्या क्षीरसागर,आप्पा काळे आदी मान्यवरांसह इतर उपस्थित होते.

आ.जयंत आसगावकर पुढे म्हणाले की,आर्थिक संस्था चालवायची म्हणजे वाईट पणा घ्यावा लागतो. वाईट पणा घ्यायची तयारी असेल तरच पतसंस्था चालू शकते.कारण लोकांच्या गरजा प्रचंड असतात.




माणूस हा गरजेसाठी तुमच्या कडे येत असतो.त्याची गरज नाही निघाली की,तो त्याची नाराजी व्यक्त करत असतो. राजेंद्र बरकडे यांनी त्यांचे उपक्रम चांगले सुरू ठेवलेले आहेत. समाजासाठी जे चांगले काम करायचे आहे ती धडपड आहे. पतसंस्थेत सुद्धा १० कोटीच्या ठेवी आहेत.चांगल्या प्रकारे लोकांची विश्वासाहर्ता असल्या मुळेच एवढया मोठ्या प्रमाणात ठेवी गोळा होत आहेत.

राजेंद्र बरकडे म्हणाले की, शिवशक्ती धर्मदाय सामाजिक विकास सेवा संस्था शाळा बाह्य मुलांसाठी व वंचित गोरगरीब मुलांच्या शिक्षणासाठी काम करते तसेच जेष्ठ नागरिक सन्मान, सैनिक सन्मान,आदर्श शिक्षक सन्मान, वृक्षारोपण असे अनेक उपक्रम संस्था राबवत असताना संस्थेने गेली २० वर्षे सातत्य राखले आहे.यावेळी राजेश काकडे म्हणाले की,पक्षाची पॉलिसी ठरविण्याचं काम शिक्षक आमदारांकडून केलं जात असतं.शिक्षक हा समाजाच्या तळागाळामध्ये जाऊन काम करत असतो.पक्षाची जर जबाबदारी समर्थपणे पेलवायची असेल तर ती शिक्षक आमदाराकडे असते. कारण समाजाच्या ज्ञानी लोकांमध्ये ते काम करत असतात. आसगाव साहेब आपण आलात सगळ्यांच्या वतीने आपलं मनापासून स्वागत करतो. ज्येष्ठ नागरिकांचं, खरं तर असे कार्यक्रम नेहमी प्रत्येक आठवड्यामध्ये कुठला ना कुठला कार्यक्रम या संस्थेच्या वतीने घेतला जातो. खूप चांगलं काम राजेंद्र बरकडे आणि सविताताई बरकडे यांच्या माध्यमातून घडत आहे. यावेळी जेष्ठ नागरिक, शिक्षक यांनी सुद्धा मनोगते व्यक्त करत संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक संस्थेच्या सचिव सविता बरकडे यांनी केले तर सुत्रसंचलन नम्रता कामतकर यांनी केले. आभार सतिश काळे यांनी मानले.

# विधवा महिलांना दिवाळीपूर्वी संजय गांधी योजनेचा लाभ द्यावा

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** शहरातील संजय गांधी निराधार योजनेचे सुमारे तीन महिन्याचे अनुदान वृद्ध अपंग दिव्यांग विधवा परित्यक्ता यांना न मिळाल्यामुळे त्यांचे फार हाल होत होत. काही लाभार्थींना आ.फारुख शाह यांच्याकडे याबाबत तक्रार सुद्धा केलेली होती. त्या अनुषंगाने आ.फारुख शाह यांनी जिल्हाधिकारी तत्काळ दिवाळी पूर्व यांना अनुदान मिळावे अशी मागणी केलेली होती त्याला अनुसरून आ.फारुख शाह यांनी मुख्यमंत्री यांना सुद्धा याबाबत कल्पना दिलेली होती. त्याला योग्य प्रतिसाद देत मुख्यमंत्री महोदयांनी तात्काळ संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान उपलब्ध करून वाटप करण्याचे सूचना दिल्या. आ.फारुख शाह यांच्या प्रयत्नामुळे धुळे शहरातील संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थ्यांना एक तारखेपासून अनुदान वितरित करण्यात येत आहे. तसेच संजय गांधी निराधार योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असून लोकांना वेळेवर अनुदान उपलब्ध होत नाही तसेच दलालांशिवाय काम होत नाही त्यामुळे वंचित गरीब दिव्यांग व वृद्ध नागरिकांना या योजनेचा संपूर्ण लाभ घेता येत नाही ही सुद्धा तक्रार करण्यात आलेली आहे एक तारखेपासून धुळे शहरातील संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना त्यांच्या बँकेच्या खात्यात अनुदान येत असून त्याबाबत तहसीलदार पाटील यांनी सुद्धा हे अनुदान लाभार्थ्यांनी घ्यावे असे आवाहन केलेले आहे धुळे शहर आ.फारुख शाह यांच्या विकास कामांबरोबर सामाजिक बांधिलकी म्हणून गरिबांची त्यांना हक्काचे व शासनाचे हक्क मिळावे म्हणून कायम लढा सुरू असतो त्याचीच परिणीती म्हणून आज लोकांना अनुदान उपलब्ध होत आहे तसेच धुळे शहरातील विधवापरिक तक्ता यांना अन्नधान्य उपलब्ध व्हावे व शासनाच्या योजनेच्या लाभ व्हावा म्हणून आ.फारुख शाह हे प्रयत्नशील आहेत.

# दुष्काळी तालुके जाहीर करताना सरकारचा दुजाभाव

## घनसावंगी तालुका यादीमधून वगळल्याने आश्चर्य

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** मुंबई येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील १५ जिल्ह्यांमधील गंभीर दुष्काळ असणारे २४ व मध्यम स्वरूपाचा दुष्काळ असणाऱ्या १६ तालुक्यांचा समावेश राज्यातील दुष्काळी तालुक्यांच्या यादीत करण्यात आला असताना सदर तालुके समाविष्ट करताना राजकीय दबाव वापरुन मोठ्या प्रमाणावर दुजाभाव करण्यात आला आहे. सदर यादीमध्ये वर्षानुवर्ष दुष्काळी समजल्या जाणाऱ्या घनसावंगी तालुक्याचा समावेश नसल्याने घनसावंगी दुष्काळाबाबत सरकार अनभिज्ञ आहे असून सदर निर्णयाबाबत ऐन दिवाळीच्या काळात घनसावंगी तालुक्यातील मायबाप जनतेच्या वतीने शासनाने घनसावंगी तालुकाचा दुष्काळी यादीमध्ये समाविष्ट करावा. राजकीय नेत्यांच्या दबावामुळे दुष्काळी यादीत समाविष्ट करण्यात आले आहे. सदर प्रश्नावर बोलण्यास कुणीही तयार नाही. तालुक्यातील जनतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असणाऱ्या दुष्काळ प्रश्नी तातडीने दुष्काळी तालुक्यांचा यादीत समावेश करून जनतेला दिलासा द्यावा. सदर प्रश्नाबाबत सरकारने लवकरात लवकर योग्य निर्णय घ्यावा. घनसावंगी तालुका दुष्काळी यादीमध्ये समाविष्ट न झाल्यामुळे या सवलती लागू होणार नाही. जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू वीज बिलात ३३.५ टक्के सूट, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोहयोअंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावांत शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे चारा छावण्या. यापासून घनसावंगी तालुका वंचित राहणार आहे.

तालुक्यातील जनतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असणाऱ्या दुष्काळ प्रश्नी घनसावंगी तालुक्याचा तातडीने दुष्काळी तालुक्यांचा यादीत समावेश करून जनतेला दिलासा द्यावा. अशी मागणी शेतकरी वर्गाकडून व शेतकरी संघटना कडून केली जात आहे.



# ग्रामीण रुग्णालयात आयुष्यमान भवः अंतर्गत आरोग्य मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** खुलताबाद येथील ग्रामीण रुग्णालयात भारत सरकार प्रणित आयुष्यमान भवः योजना अंतर्गत रुग्णांची विविध आजारांची आरोग्य तपासणी मेळावा घेण्यात आला . ग्रामीण रुग्णालयात आयुष्यमान भवःयोजना अंतर्गत आरोग्य मेळाव्याचे उद्घाटन नगराध्यक्ष अॅड एस एम कमर यांच्या हस्ते करण्यात आले . यावेळी वैद्यकीय अधिकारी यांनी या आरोग्य तपासणी मेळाव्यात ३४७ रुग्णांची विविध आजारांची तपासणी करण्यात आली.

या आरोग्य तपासणी मेळावा उध्दाटन पर मेळाव्यात नगराध्यक्ष अॅड एस एम कमर यांनी सांगितले भारत सरकार प्रणित आयुष्यमान भवःअंतर्गत आरोग्य तपासणी मोठ्या प्रमाणात तालुक्यातील लोकांनी लाभ घ्यावा. तसेच या योजनेअंतर्गत विविध रोगाची तपासणी करण्यात येत यांचा लाभ घ्यावा. ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी यांनी आलेल्या रुग्णांची तात्काळ तपासणी करून घ्यावी जान्येकरुण रुग्णांची हलवेलना होणार नाही. यावेळी आयुष्यमान भवःअंतर्गत आरोग्य मेळावा जिल्हा चिकित्सक डॉ .दयानंद मोतीपवेक यांचे मार्गदर्शनाखाली घेण्यात आला या आरोग्य तपासणी मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय येथील इजिप्शियन डॉ.मुक्ताराम चाटे, बाळरोगतंज्ञ डॉ. रिषिता बालम, डॉ.सुवर्णा नीकम, दंतशल्यचिकित्सल डॉ. मुजीब शेख,या वैद्यकीय अधिकारी यांनी रुग्णांनी तपासणी करून उपचार केले. यावेळी खुलताबाद येथील शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ वैशाली बोधनकर, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ किरण शिंदे, वैद्यकीय अधिकारी डॉ .गिरीधर बोडंले. परिसेविका भारती वाघ व वैद्यकीय रुग्णालयात कर्मचारी यांनी आरोग्य तपासणी मेळावा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.






| उपक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता | कालावधी | पात्रता | वय |
|---|---|---|---|---|
| GNM | ४० | ३ वर्ष | १२ वी पास (विज्ञान,कला,वाणिज्य) | १८ ते ३४ वर्ष |
| ANM | २० | २ वर्ष | १२ वी पास (विज्ञान,कला,वाणिज्य) | १८ ते ३४ वर्ष |